"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"
॥ कर्मवीर ॥




रयत शिक्षण संस्थेचे,

# सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

## (अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय)


Affiliated to Shivaji University, Kolhapur.
A+ Grade Accreditation by NAAC with 3.63 CGPA,
An ISO 9001:2015 Certified College
RUSA Beneficiary & NAAC Designated Mentor College
Junior College 'A' Grade

Website : www.sgm.edu.in  Email : sgmkarad@yahoo.com





नवस्वप्नांची पहाट झाली,
विज्ञान-तंत्रज्ञान गगनाला भिडले ।
उद्योग-विकासाची नवी भरारी ,
सशक्त भारताची स्वप्ने उरी ।
खेळाच्या रणांगणी आम्ही दिमाखदार,
कला-साहित्याच्या सानिध्यात,
नवसंस्कृतीचा ध्यास ॥









# सद्गुरू

२०२४-२५

# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७ वा जयंती सोहळा




कर्मवीर जयंती सोहळ्या प्रसंगी मान्यवरांचे स्वागत करताना प्रिं.डॉ.मोहन राजमाने




कर्मवीर जयंती प्रसंगी अहवाल वाचन करताना प्रा.डॉ.दिलीपकुमार कसबे



पद्मभूषण डॉ .कर्मवीर भाऊराव पाटील यांचे 'जीवन आणि कार्य'
कर्मवीर जयंती विशेषांक दिशा भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना मान्यवर




कर्मवीर अण्णांच्या जीवनकार्याविषयी विचारांना उद्‌गार देताना प्रमुख पाहुणे
मा.डॉ.अच्युत गोडबोले लेखक व संगणक तज्ज्ञ




कर्मवीर अण्णांच्या जयंतीप्रसंगी अण्णांच्या स्मृतींना उजाळा देताना
मा.डॉ.अनिल पाटील - संघटक, रयत शिक्षण संस्था, सातारा




कर्मवीर जयंती सोहळ्यात उपस्थित मान्यवरांचे आभार मानताना
उपप्राचार्य, नेताजी सूर्यवंशी

सद्गुरू सन २०२४-२५

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड
(अधिकार प्रदत्त स्वायत्त)





रयत शिक्षण संस्थेचे,

# सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड (अधिकार प्रदत्त स्वायत्त)

**संपादन समिती : सन २०२४-२०२५**

- **अध्यक्ष**
  प्राचार्य डॉ.मोहन राजमाने

- **प्रमुख संपादक**
  प्रा.डॉ.रमेश पोळ

- **विभागीय संपादक (बिंब)**
  प्रा.डॉ.प्राजक्ता निकम
  प्रा.डॉ.सचिन जाधव
  प्रा.विद्या पाटील
  प्रा.अनंत निकम
  प्रा.प्रदीप नलवडे (प्रतिबिंब)

- **सहाय्यक संपादक**
  प्रा.डॉ.अबुलकलाम सुतार
  प्रा.डॉ.सतिश पार्टे
  प्रा.डॉ.सर्जेराव चिले
  प्रा.डॉ.कोमल कुंदप
  प्रा.दिनेश माळी
  प्रा.भिमाशंकर गायकवाड
  डॉ.अरूणकुमार सकटे
  प्रा.महेश गायकवाड
  प्रा.रेवणसिद्ध पाटील
  प्रा.सुरेश नांगरे
  प्रा.शुभांगी पाटील
  प्रा.उद्धव शेडगे
  प्रा.संगीता जाधव
  प्रा.डॉ.तायराशगुप्ता बागवान
  श्री.भरत पवार



'सद्गुरू' नियतकालिक । सन २०२३-२०२४

- **रेखाचित्रे**
  श्री.सुशांत चव्हाण

- **मुखपृष्ठ** : प्रा.डॉ.सुरेखा पाटील
- **मांडणी** : प्रा.डॉ.कोमल कुंदप

- **मुद्रक**
  प्रिंट ओम ऑफसेट
  २६९ ब/२, दौलतनगर, सातारा.
  फोन. ८८०५८७७९००

- **अक्षरसंधान**
  टाईप इनोव्हेटर्स मोती चौक, सातारा.

# अध्यक्षीय



बहुजन समाजाला ज्ञानाची संजीवनी देणारे, सामूहिक शिक्षणाचा प्रसार करणारे, शिक्षणाची गंगा महाराष्ट्राच्या झोपडीपर्यंत पोहचवणारे 'आधुनिक भगीरथ' म्हणजेच तीर्थरुप कर्मवीर भाऊराव पाटील होय. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्मवीर अण्णांनी पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. 'सद्‌गुरु' हे महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक. यानिमित्ताने महाविद्यालयाच्या वार्षिक प्रगतीचा आलेख, विद्यार्थ्यांचा हा शब्दाविष्कार आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

आधुनिक शिक्षणप्रणाली ही तंत्रज्ञानाधिष्ठित आहे. पारंपरिक गुरूकुल पध्दतीपासून आज या शिक्षणप्रणालीने ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म पर्यंतची मजल मारली आहे. भारत सरकारने 'डिजिटल इंडिया' व 'स्वयंम' या माध्यमातून आधुनिक शिक्षणाला चालना दिली आहे. मानवी मूल्य, वैज्ञानिक वृत्ती व उदात्त चारित्र्य यावर आजची शिक्षणप्रणाली भर देते. तंत्रज्ञान व मल्टीमिडिया यासारखी साधने आज विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. यातून राष्ट्रउभारणीला व समाज परिवर्तनाला चालना मिळते. आज ही आधुनिक तंत्रज्ञानाधिष्ठित, मल्टीमिडिया शिक्षणप्रणाली आम्ही आमच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना देत आहोत. या दृष्टीने महाविद्यालय दरवर्षी नवनवीन कौशल्याधिष्ठित, व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करत असते. महाविद्यालयात सध्या तेरा व्यावसायिक अभ्यासक्रम, सहा शॉर्टम कोर्सेस यादृष्टीने सुरू आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला अत्यंत माफक अशा फी मध्ये हे शिक्षण दिले जाते. आज सर्वात उपयुक्त व आवश्यक असणारा, काळाची गरज असणारा अभ्यासक्रम म्हणजेच, 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' **AI** याचबरोबर बी.एस्सी डाटा सायन्स, एम.एस्सी. डाटा सायन्स हे नवीन अभ्यासक्रम आम्ही यावर्षी सुरु केले आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट असून त्यादृष्टीने महाविद्यालय सतत कार्यरत असते. शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वेळोवेळी विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित केले जातात. महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात केलेली कामगिरीही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. याचाच परिपाक म्हणजे सर्वात गुणवत्तापूर्ण व विद्यार्थीप्रिय महाविद्यालय म्हणून स.गा.म.कॉलेजचे नाव घेतले जाते. हे आजवर कॉलेजने केलेल्या प्रगतीचे प्रतीक आहे.

'सद्‌गुरू' हे महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक म्हणजे, विद्यार्थ्यांच्या लेखनप्रतिभा व अभिव्यक्तीचे एक महत्वपूर्ण माध्यम आहे. यातून विद्यार्थ्यांच्या जाणीवा, विचार व्यक्त होतात. हा आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शब्दाविष्कार मी आपल्या अवलोकनार्थ देत आहे. या अंकास माझ्या मनापासून शुभेच्छा !

**डॉ.मोहन राजमाने**
**प्राचार्य**

# संस्थापक

रयत शिक्षण संस्था



पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट.)

# श्रद्धास्थान

कृतीच्या खराट्याने माणुसकीवरील
जळमटे झाडणारा महापुरुष



## सद्गुरू गाडगे महाराज (संत गाडगेबाबा)

**डेबूजी झिंगराजी जाणोरकर**

# ॥ आमची प्रेरणा ॥

रयत शिक्षण संस्थेचे,
मान्यवर



## मान.शरदचंद्रजी पवार

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



**मान.ॲड.रविंद्र पवार**
चेअरमन,
स.गा.म.महाविद्यालय विकास समिती



**मान.डॉ.अनिल पाटील**
संघटक,
रयत शिक्षण संस्था, सातारा



**मान.चंद्रकांत दळवी**
चेअरमन,
रयत शिक्षण संस्था, सातारा

## महाविद्यालय विकास समिती (२०२२-२०२७)

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ॲड. रविंद्र केशवराव पवार | चेअरमन |
| २. | मा. डॉ. शिवाजीराव श्रीपतराव कदम | सभासद |
| ३. | मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा | सभासद |
| ४. | मा. प्रा. शिवाजी अनंत पाटील | सभासद |
| ५. | मा. प्रा. सौ. अनिता सूर्यकुमार साळुंखे | सभासद |
| ६. | मा. प्रा. डॉ. सुनिल एकनाथ जाधव | सभासद |
| ७. | मा. प्रा. डॉ. अबुलकलाम उस्मान सुतार | सभासद |
| ८. | मा. श्री. संतोष भिमराव पवार | सभासद |
| ९. | मा. ॲड. सदानंद नारायण चिंगळे | सभासद |
| १०. | मा. मधुकर गोविंद सावंत | सभासद |
| ११. | मा. किसनराव बाजीराव पाटील | सभासद |
| १२. | मा. प्रा. डॉ. गिरीश बसवराज कल्याणशेट्टी | सभासद |
| १३. | मा. साईश जाधव, अध्यक्ष महाविद्यालय विद्यार्थी परिषद | सभासद |
| १४. | मा. कु. शिवानी साळुंखे, सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद | सभासद |
| १५. | मा. प्राचार्य, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | सेक्रेटरी |
| १६. | मा. जितेंद्र हिंदूराव डुबल | सभासद |
| १७. | मा. अतुल सुभाषराव कदम | सभासद |
| १८. | मा. फत्तेसिंह धनाजी जाधव | सभासद |
| १९. | मा. सचिन रामराव पाटील | सभासद |
| २०. | मा. लक्ष्मीनारायण रंगनाथ सरलाया | सभासद |
| २१. | मा. प्रा. डॉ. आण्णा काका पाटील | सभासद |
| २१. | मा. उपप्राचार्य, ज्युनिअर कॉलेज विभाग | सभासद |



महाविद्यालयाचे
कर्तव्यदक्ष
आदरणीय प्राचार्य
**डॉ.मोहन राजमाने**

'सद्गुरू' नियतकालिक २०२४-२५
संपादक मंडळ,
प्रि.डॉ.मोहन राजमाने,
संपादक प्रा.डॉ.रमेश पोळ
यांच्या समवेत संपादक मंडळ



'सद्गुरू' नियतकालिक
२०२३-२४ चे प्रकाशन करताना
प्रिं.डॉ.एस.बी. केंगार व मान्यवर



# असेही काही उपक्रम




शिवाजी विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत वैष्णवी सावंत (Zoology Department) हिने व्दितीय क्रमांक मिळविल्याबद्दल सत्कार करताना, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.डी.टी.शिर्के व मान्यवर



सातारा जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये स.गा.म. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करताना, रयत शिक्षण संस्थेचे सचिव, मा.श्री.विकास देशमुख व इतर मान्यवर




अंतरीक्ष महायात्रा प्रसंगी मार्गदर्शन करताना, प्रमुख पाहुण्या मा.डॉ.कीर्ती बडवे, सहायक, रासायनिक विश्लेषक राजपत्रित अधिकारी गट-ब, न्याय वैधक विज्ञान प्रयोगशाळा, पुणे




कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत आयोजित ३७ व्या पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना मा.प्राचार्य, डॉ मोहन राजमाने व उपस्थित मान्यवर




बॅरिस्टर पी.जी.पाटील राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा उद्घाटन प्रसंगी बोलताना मा.प्रा.डॉ.आर.ए.कुंभार व उपस्थित मान्यवर



आंतर महाविद्यालयीन आविष्कार स्पर्धेचे उद्घाटन करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य, एस.ए. पाटील व आविष्कार स्पर्धेच्या समन्वयक प्रा डॉ.अहिल्या वाघमोडे व इतर मान्यवर



# संपादकीय

**नमस्कार वाचक हो !**

सन २०२४-२५ चा आमच्या महाविद्यालयाचा 'सद्गुरू' नियकालिकाचा ७१ वा अंक आपल्या हाती सुपूर्त करत आहे. हा अक्षररूपी संवाद साधताना सर्व प्रथम मला आवर्जून नमूद करावेसे वाटते की, सन २०२२-२३ च्या 'सद्गुरू' या नियतकालिकास शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेतून एकूण आठ बक्षिसे प्राप्त झाली आहेत. ही महाविद्यालयाच्या दृष्टीने मोठी अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे. अशा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लेखनप्रक्रियेला चालना मिळत असते.

साहित्य हा माणसाच्या जीवनाचा एक अतिशय अविभाज्य व आनंददायी घटक आहे. मानवी जगण्याला खऱ्या अर्थाने या साहित्यामुळे अर्थ प्राप्त झाला आहे. आज यंत्रयुगात, तंत्रज्ञानात माणूस हरवत चालला आहे. त्याच्या आयुष्याला एक उजाडपणा, रखरखलेपण प्राप्त झाले आहे. अशावेळी साहित्य माणसाच्या जीवनात हिरवळ पसरून जगण्याला नवीन दिशा देते. महाविद्यालयीन विद्यार्थी हा प्रतिभाशक्तीचे, नवनिर्मितीचे भांडार आहे. शब्दाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये दडलेला कवी, विचारवंत, घडविण्याचे काम महाविद्यालयातील नियतकालिकातून आम्ही करत असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे..

शब्द लेखणीतून पाझरायला लागला की, साहित्याचे मळे तयार होतात. म्हणूनच कवी ऐश्वर्य पाटेकर आपल्या 'भुईशास्त्र' कवितासंग्रहात शब्दांची किमया सांगताना लिहितात की,

''दिलं हक्काचं वावर, ज्याची सृजनाची माती,
थोडे कालवले शब्द, पेटे अक्षराच्या वाती,
रानोवनी पोचवल्या, ठेवा जिव्हाळ्याचा लाभे
शब्दकळ्या फुल झाल्या''

अशी शब्दकळ्यांची फुले विद्यार्थ्यांनी कविता, कथा, वैचारिकलेखन, विनोदीलेखन, प्रवासवर्णन, व्यक्तीचित्रणे, समीक्षात्मकलेख इ. माध्यमातून नियतकालिकात फुलवलेली आहेत. त्यांचा हा प्रतिभा अविष्कार म्हणजे, पहिल्या वहिल्या पावसाने मातीला जसा गंध प्राप्त व्हावा, तसाच आहे. हा गंध प्रत्येकाच्या चिरकाल स्मरणात राहतो. आमच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारातून भाषेतून व कलेतून केलेला आविष्कार हा असाच गंधरुपी व त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देणारा, विचारांना दिशा देणारा असाच आहे.

नानाविध शब्दकळेने, साहित्य प्रकारांनी तयार झालेला यावर्षीचा 'सद्गुरू' हा वार्षिक अंक होय. या नियतकालिकाला पूर्णत्व प्राप्त करून देण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने, सर्व विभागाचे उपप्राचार्य, प्राध्यापक, विभागीय संपादक, रेखाचित्रकार, प्रशासकीय विभाग या सर्वांचे अतिशय मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्याचबरोबर प्रिंट ओम ऑफसेटचे सर्व सहकारी या सर्वांच्यामुळे या अंकास पूर्णत्व प्राप्त झाले आहे. त्याबद्दल संपादक या नात्याने मी आपला अत्यंत आभारी आहे. यावर्षीच्या 'सद्गुरू' नियतकालिकाचे आपण स्वागत कराल, आपल्या सर्वांच्या पसंतीला तो उतरेल अशी आशा मी व्यक्त करतो.

धन्यवाद !

**प्रा.डॉ.रमेश पोळ**
**संपादक**

# सेवानिवृत्ती



प्रा. विजय रानभरे यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्निक सत्कार करताना मा.डॉ.डी.के.मस्के कुलगुरू, कर्मवीर विद्यापीठ सातारा व मान्यवर



प्रा. दिवाकर दीक्षित यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्निक सत्कार करताना मा.प्राचार्य.डॉ.मोहन राजमाने व मान्यवर



श्री .अरुण कांबळे लॅबअसिस्टंट यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्निक सत्कार करताना मा.प्राचार्य.डॉ.मोहन राजमाने व मान्यवर



श्री.सर्जेराव कांबळे यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्निक सत्कार करताना मा.प्राचार्य.डॉ.मोहन राजमाने व मान्यवर



उपप्राचार्य आर.वाय.पाटील यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्निक सत्कार करताना मा.प्राचार्य.डॉ.मोहन राजमाने व मान्यवर



प्रा.एस.एल.कचनकर यांचा सेवानिवृत्ती निमित्ताने सपत्निक सत्कार करताना मा.प्राचार्य.डॉ.मोहन राजमाने व मान्यवर

# विविध दिन




हिंदी दिनानिमित्त विचार व्यक्त करताना प्रा.डॉ.सिद्राम खोत




जागतिक अन्नदिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.इला जोगी



मानसशास्त्र विभाग आयोजित ' जागतिक ध्यान धारणा ' दिनानिमित्त प्रात्यक्षिक करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी



सूक्ष्मजीवशास्त्र विभाग विद्यार्थी आयोजित मिक्रोबेस स्टेन होली



हॉटेल मॅनेजमेंट विभाग आयोजित 'कप केक डे' प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.सुहास गोडसे




गणित विभाग आयोजित 'राष्ट्रीय गणित दिवस' प्रमुख वक्ते- डॉ.एम.टी.गोफणे




वन्यजीव साप्ताह निमित्त-व्याखान देताना मा.किरण जगताप उपसंचालक, कोयना सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड



भूगोल विभाग आयोजित भूगोल दिनानिमित्त विशेष व्याखान 'भूगोलातील नोकरीच्या संधी' प्रमुख पाहुणे- डॉ.संदीप कोळेकर यांचे स्वागत करताना मा.प्राचार्य,डॉ.मोहन राजमाने

# पुरस्कार/सन्माननीय निवड/पीएच.डी./नेट सेट



**उपप्राचार्य, शिवाजी पाटील**
रवळनाथ को.ऑप.हौसिंग फायनान्स लि. आजरा, शाखा कराड संचालकपदी निवड, ग्रामपंचायत बनवडीतर्फे शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल गुणगौरव सत्कार



**उपप्राचार्य, डॉ.रमेश पोळ**
ग्रामपंचायत बनवडीतर्फे शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल गुणगौरव सत्कार, जागृती विद्यामंदिर बनवडीतर्फे आदर्श, विद्यार्थीप्रिय शिक्षक व पीएच.डी. धारक म्हणून सन्मानपत्र



**प्रा.डॉ.महिपती शिवदास**
ग्रा.पं.बनवडीतर्फे शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल गुणगौरव सत्कार, जागृती विद्यामंदिर बनवडीतर्फे आदर्श,विद्यार्थीप्रिय शिक्षक व पीएच.डी. धारक म्हणून सन्मानपत्र, इंटरनॅशनल सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ.बी.आर.आंबेडकर आयकॉन अवार्ड



**प्रा.डॉ.दिलीपकुमार कसबे**
संगम अकादमी,कोटा (राजस्थान) यांचेकडून मुन्शी प्रेमचंद स्मृतिसन्मान पुरस्कार



**डॉ.कोमल कुंदप**
मराठी सेट
नवक्रांती सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्य बारामती,व मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट महाराष्ट्र राज्य आदर्श माता पुरस्कार



**प्रा.संगिता जाधव**
यशस्विनी महिला समूह व यशवंत क्रीडा संस्था यांचे वतीने 'यशस्विनी पुरस्कार'



**प्रा.सौ.पूनम होनकळसे**
फॅशन डिझायनर
'यशस्विनी पुरस्कार'



**प्रा.प्रशांत प्रक्षाळे**
शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीवर सदस्य म्हणून निवड



**प्रा.डॉ.अनुराधा पवार**
(रसायनशास्त्र) पी.एच.डी
भारती विद्यापीठ पुणे



**प्रा.डॉ.कुमोद गुरव**
(वनस्पतीशास्त्र) पी.एच.डी
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर



**प्रा.डॉ.मुदस्सर जमादार**
(भूगोल) पीएच.डी
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर



**प्रा. संग्राम साळुंखे**
केमिकल सायन्स नेट



**प्रा मधुमिता पाटील**
इंग्रजी सेट



**प्रा. सुभाषराव शिंदे**
अर्थशास्त्र सेट



**प्रा. सुप्रिया साळुंखे**
बायोटेक सेट



**प्रा. आसावरी मोहिते**
कॉमर्स सेट



**प्रा. सागर ललांडे**
कॉमर्स सेट



**प्रा सारिका पाटील**
केमिकल सायन्स सेट



**प्रा.संगिता मगर**
केमिकल सायन्स सेट



**प्रा सोमनाथ विभूते**
केमिकल सायन्स सेट



**प्रा.प्रियांका पोळ**
गणित सेट



**प्रा.विवेकानंद यादव**
गणित सेट



**प्रा.प्रियांका चव्हाण**
संगणक विज्ञान सेट



**प्रा.अमृता जांगडे**
इलेक्ट्रॉनिक सेट



**प्रा.सुलक्षणा साडेकर**
प्राणीशास्त्र सेट



**प्रा.स्वप्नील अग्रवाल**
गणित सेट

## सेट/ नेट प्राविण्य प्राप्त विद्यार्थी


मयूर जाधव
इतिहास सेट


भाग्यश्री कुंभार
इतिहास सेट


कु.गुलणार मुलाणी
भूगोल सेट


विकी तिकुडवे
राज्यशास्त्र सेट


पूजा वाघमारे
समाजशास्त्र सेट


राहुल गोडसे
केमिकल सायन्स सेट


अनुराधा देसाई
केमिकल सायन्स सेट


स्वप्नाली क्षीरसागर
केमिकल सायन्स सेट


वर्षा यादव
वनस्पतीशास्त्र सेट


प्रतीक्षा डोंगरे
जैवतंत्रज्ञान सेट


प्रणाली पवार
प्राणीशास्त्र सेट


विवेक नेताम
प्राणीशास्त्र सेट


स्नेहल शिंगटे
प्राणीशास्त्र सेट


तृप्ती पाटील
गणित सेट


अक्षय पाटील
गणित सेट


प्रतीक्षा कदम
गणित सेट


संख्याशास्त्र विभागातील एम.एस.सी (संख्याशास्त्र) मधील ४६ विद्यार्थ्यांना सायटेल, पुणे यांच्यामार्फत प्रत्येकी रु.९०००/- प्रमाणे स्कॉलरशीप प्राप्त


प्लेसमेंट सेल व नांदी फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने महिंद्रा प्राईड इम्पायबिटी स्किल ट्रेनिंग प्रोग्राम प्रसंगी विद्यार्थी व प्राध्यापक


हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय हॉटेलमध्ये प्लेसमेंट झाल्याबद्दल सत्कार करताना मा.प्राचार्य डॉ.मोहन राजमाने


शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे झालेल्या प्रोजेक्ट प्रेझंटेशन स्पर्धेत संख्याशास्त्र विभागातील बी.एस.सी.भाग ३ मधील विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल बक्षीस वितरण करताना डॉ.एस.व्ही.महाडिक प्रमुख संख्याशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

# वर्गात सर्वप्रथम / उल्लेखनीय निवड


साईश जाधव
अध्यक्ष,
महाविद्यालय विद्यार्थी परिषद


कु.शिवानी साळुंखे
सचिव,
महाविद्यालय विद्यार्थी परिषद


कु रिचा भोसले
बी.ए.
अर्थशास्त्र प्रथम


कु जेसिका मोटोला
बी.कॉम प्रथम


कु सिद्धी जगदाळे
बी.कॉम आयटी प्रथम


कु.निकिता राशिनकर
बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी प्रथम


कु.पूजा थोरात
बी.एस्सी.प्रथम


नेहा कदम
बी.व्होक एच.एम.सिटी. प्रथम


कु हितल शहा
बी.कॉम बँक मॅनेजमेंट प्रथम


कु.गायत्री चव्हाण
बी.सी.एस. प्रथम


कु जान्हवी डुबल
बी.व्होक ॲग्री प्रथम


कु कोमल चंदुगडे
बी.सी.ए प्रथम


कु.अनुराधा गन्नमराज
एम.कॉम प्रथम


कु.शारदा कुंभार
एम.कॉम.आयटी प्रथम


कु. शुभांगी शिंदे
एम.एस्सी. प्रथम


कु.स्नेहल जाधव
एम.ए. प्रथम


कु साक्षी मोरे
एम.एस्सी. कॉम्प्युटर प्रथम


जीवन अनुते
बी.एस्सी.भाग १ डाटा सायन्स जर्मन
लॅग्वेज लेवल १ गोल्ड मेडल


प्रणाली पाटील
प्रवेश फोरेन्सिक सायन्स


श्रेया चव्हाण
प्रवेश एअर होस्टेस


आदिनाथ माने
प्रवेश फिल्म इंडस्ट्री, पुणे



**TCS कंपनीमध्ये BPS च्या पोस्टसाठी निवड झालेल्या ३९ विद्यार्थ्यांच्या समवेत मा.प्राचार्य.डॉ.मोहन राजमाने व प्राध्यापक**

# बॅरिस्टर.पी.जी.पाटील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे यशवंत विद्यार्थी २०२४-२५



**रविकांत पाटील**
राज्यसेवा परीक्षेतून
राजपत्रित अधिकारी वर्ग-१



**विशाल माने**
अन्न सुरक्षा अधिकारी
राजपत्रित वर्ग-२



**प्रतिक्षा खराडे**
अन्न सुरक्षा अधिकारी
राजपत्रित वर्ग-२



**मोनिका पाटील**
पोलीस उपनिरीक्षक
मुलींमध्ये राज्यात द्वितीय



**मयुर जाधव**
पोलीस उपनिरीक्षक



**मयुर कदम**
पोलीस उपनिरीक्षक



**निरंजन ओंबासे**
पोलीस उपनिरीक्षक



**अनिकेत वाडकर**
पोलीस उपनिरीक्षक



**प्रल्हाद पवार**
पोलीस उपनिरीक्षक



**करण चिंचणकर**
पोलीस उपनिरीक्षक



**अमित मोरे**
पोलीस उपनिरीक्षक



**मनोज गुप्ता**
पोलीस उपनिरीक्षक



**तानाजी वाघमोडे**
पोलीस उपनिरीक्षक



**सुरज होवाळ**
पोलीस उपनिरीक्षक



**रोहित गुजर**
पोलीस उपनिरीक्षक



**हीना मुल्ला**
पोलीस उपनिरीक्षक



**स्वरांजली नलवडे**
पोलीस उपनिरीक्षक



**तेजस्विनी माणगावे**
पोलीस उपनिरीक्षक



**विजय मोटे**
कर सहायक



**योगेश धुमाळ**
निदेशक -व्यवसाय शिक्षण
व प्रशिक्षण विभाग



**संयोगिता यादव**
महसूल सहायक



**प्रतिक्षा पाटील**
महसूल सहायक



**राजश्री घोलप**
महसूल सहायक



**वैष्णवी जाधव**
महसूल सहायक



**गौरी रेणूशे**
महसूल सहायक



**सुकन्या जाधव**
दंत सहायक,
ग्रामीण रुग्णालय



**श्वेता देसाई**
कनिष्ठ लिपीक,
शहर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई



**श्रुती कदम**
कार्यकारी सहायक,
पिंपरी चिंचवड म.न.पा.



**भक्ती कद्रे**
मुंबई पोलीसशिपाई



**दीक्षा ढमाले**
मुंबई पोलीसशिपाई



कर्मवीर विद्याप्रबोधिनी आयोजित पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय महाविद्यालय प्रश्नमंजूषा स्पर्धा २०२५ मध्ये महाविद्यालयातील कु.ऋतुजा यादव व नेहा जाधव यांनी प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल अभिनंदन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.मोहन राजमाने




मा.सोपान टोंपे, प्रांताधिकारी, पाटण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



बॅरि.पी.जी.पाटील स्पर्धा परीक्षा केंद्र आयोजित व्याख्यान 'चालू घडामोडी' वक्ते मा.श्रीकांत तायडे

# एक पाऊल प्रगतीकडे.....

## पुरस्कार/सन्मान

१. सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयाला रयत शिक्षण संस्थेचा, 'डॉ.पतंगराव कदम आदर्श स्वायत्त महाविद्यालय' पुरस्कार (२०२३-२४)

२. सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयास 'अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय मान्यता प्रदान'

३. मा.प्राचार्य डॉ.मोहन राजमाने यांना शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल 'इतिहास संशोधक आप्पासाहेब पवार अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचा पुरस्कार - २०२५'

४. सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयास सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात क्रीडा क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट आणि उत्तुंग कार्याबद्दल महाराष्ट्र शासन आणि जिल्हा अधिकारी कार्यालय, सातारा यांचेकडून प्रोत्साहनपर अनुदान

## पुरस्कार/गुणगौरव/निवड

### १. उपप्राचार्य शिवाजी पाटील

- रवळनाथ को.ऑप.हौसिंग फायनान्स लि., आजरा शाखा, कराड - संचालकपदी निवड
- ग्रामपंचायत बनवडी यांचेवतीने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल गुणगौरव सत्कार

### २. उपप्राचार्य डॉ.रमेश पोळ

- ग्रामपंचायत बनवडी यांचेवतीने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल गुणगौरव सत्कार
- जागृती विद्यामंदीर बनवडीच्या वतीने आदर्श विद्यार्थीप्रिय शिक्षक व पीएच.डी. धारक म्हणून सन्मानपत्र

### ३. प्रा.डॉ.महिपती शिवदास

- ग्रामपंचायत बनवडी यांचेवतीने शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल गुणगौरव सत्कार
- जागृती विद्यामंदीर बनवडीच्या वतीने आदर्श विद्यार्थीप्रिय शिक्षक व पीएच.डी. धारक म्हणून सन्मानपत्र
- इंटरनॅशनल सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ.बी.आर.आंबेडकर आयकॉन अॅवॉर्ड

### ४. प्रा.डॉ.कोमल कुंदप

- नवक्रांती सेवाभावी संस्था, बारामती यांच्यावतीने 'आदर्शमाता' पुरस्कार

### ५. प्रा.संगिता जाधव

- यशस्विनी पुरस्कार

### ६. प्रा.सौ.पूनम होनकळसे

- फॅशन डिझायनर यशस्विनी पुरस्कार

### ७. प्रा.प्रशांत प्रक्षाळे

- शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीवर निवड

## पीएच.डी. प्राप्त

१. कुमोद गुरव (वनस्पतीशास्त्र) संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. प्रा.डॉ.मुदस्सर जमादार (भूगोल) म्हैसूर विद्यापीठ

३. प्रा.डॉ.अनुराधा पवार (रसायनशास्त्र) भारती विद्यापीठ, पुणे

## सेट उत्तीर्ण प्राध्यापक

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा.संग्राम साळुंखे | (केमिकल सायन्स) नेट |
| २. | प्रा.डॉ.कोमल कुंदप | (मराठी) |
| ३. | प्रा.मधुमिता पाटील | (इंग्रजी) |
| ४. | प्रा.सुभाषराव शिंदे | (अर्थशास्त्र) |
| ५. | प्रा.आसावरी मोहिते | (कॉमर्स) |
| ६. | प्रा.सागर ललांडे | (कॉमर्स) |
| ७. | प्रा.सारिका पाटील | (केमिकल सायन्स) |
| ८. | प्रा.संगिता मगर | (केमिकल सायन्स) |
| ९. | प्रा.सोमनाथ विभुते | (केमिकल सायन्स) |
| १०. | प्रा.सुप्रिया साळुंखे | (बायोटेक) |
| ११. | प्रा.सुलक्षणा साडेकर | (प्राणीशास्त्र) |
| १२. | प्रा.स्वप्निल अग्रवाल | (गणित) |
| १३. | प्रा.प्रियांका पोळ | (गणित) |
| १४. | प्रा.विवेकानंद यादव | (गणित) |
| १५. | प्रा.प्रियांका चव्हाण | (संगणक) |
| १६. | प्रा.अमृता जांगडे | (इलेक्ट्रॉनिक्स) |

## सेट उत्तीर्ण विद्यार्थी

| | | |
|---|---|---|
| १. | मयूर जाधव | (इतिहास) |
| २. | भाग्यश्री कुंभार | (इतिहास) |
| ३. | गुलनार मुलाणी | (भूगोल) |
| ४. | विकी तिकुडवे | (राज्यशास्त्र) |
| ५. | पूजा वाघमारे | (समाजशास्त्र) |
| ६. | राहूल गोडसे | (केमिकल सायन्स) |
| ७. | अनुराधा देसाई | (केमिकल सायन्स) |

# एक पाऊल प्रगतीकडे.....

| | | |
|---|---|---|
| ८. | स्वप्नाली क्षीरसागर | (केमिकल सायन्स) |
| ९. | वर्षा यादव | (वनस्पती शास्त्र) |
| १०. | प्रतिक्षा डोंगरे | (जैवतंत्रज्ञान) |
| ११. | प्रणाली पवार | (प्राणीशास्त्र) |
| १२. | विवेक नेताम | (प्राणीशास्त्र) |
| १३. | स्नेहल शिंगारे | (प्राणीशास्त्र) |
| १४. | तृप्ती पाटील | (गणित) |
| १५. | अक्षय पाटील | (गणित) |
| १६. | प्रतिक्षा कदम | (गणित) |

## बॅरि.पी.जी.पाटील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

### सन २०२४-२५ प्रवेशित विद्यार्थी

* यु.पी.एस.सी.-२२ * एम.पी.एस.सी. - २५

### २०२४-२५ पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

१. प्रल्हाद बाबासो पवार
२. करण खंडू चिंचनकर
३. अमित श्रीरंग मोरे
४. मनोज गणेश गुप्ता
५. तानाजी ज्ञानू वाघमोडे
६. सूरज पोपट होवाळ
७. रोहित शांताराम गुजर
८. हीना बादशहा मुल्ला
९. स्वरांजली सूर्याजी नलवडे
१०. तेजस्विनी श्रीधर माणगांवे

### शासकीय अधिकारी पदावर निवड

| | | |
|---|---|---|
| १. | रविकांत पाटील | राज्यसेवा परीक्षेतून वर्ग-१ |
| २. | श्रुती कदम | कार्यकारी सहायक (पिंपरी-चिंचवड मनपा) |
| ३. | विशाल माने | अन्न सुरक्षा अधिकारी |
| ४. | प्रतिक्षा खराडे | अन्न सुरक्षा अधिकारी |
| ५. | विजय मोरे | कर सहायक |
| ६. | संयोगिता यादव | महसूल सहायक |
| ७. | प्रतिक्षा पाटील | महसूल सहायक |
| ८. | राजश्री घोलप | महसूल सहायक |
| ९. | गौरी रेणूशे | महसूल सहायक |
| १०. | वैष्णवी जाधव | महसूल सहायक |
| ११. | भक्ती केंद्रे | मुंबई पोलीस शिपाई |
| १२. | दीक्षा ढमाले | मुंबई पोलीस शिपाई |

## सी.ए.फाऊंडेशन यशस्वी विद्यार्थी

१. सर्वजीत रूईकर
२. सुजल जैन
३. आशुतोष रेठरेकर
४. राज पडवळ
५. प्रथमेश पाटील
६. सुहानी शिंगण
७. प्रचिती देसाई
८. स्वरा कांबळे

## संख्याशास्त्र विभाग

- एम.एस्सी. भाग १ व २ मधील ४६ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ९,००० रुपये प्रमाणे Cytel Statistical Software and Services Pvt.Ltd., Pune यांचेमार्फत Fly High Scholarship प्राप्त

## बी.सी.एस. विभाग

### Infotech Inception 2025 या इव्हेंटमध्ये BCS विभागातील विद्यार्थ्यांचे उत्तुंग यश

- C-Programming Rank 1 मध्ये २ विद्यार्थी
- Poster Presentation Rank 1 मध्ये २ विद्यार्थी
- Quiz Competition Rank 1 मध्ये २ विद्यार्थी
- Quiz Competition Rank 2 मध्ये २ विद्यार्थी
- Gaming Rank 3 मध्ये ४ विद्यार्थी
- 'Best College Award'
- General Championship

## परीक्षा निकाल सिनिअर

| | |
|---|---|
| बी.ए. | ९१.८४% |
| बी.कॉम. | ९२.५३% |
| बी.एस्सी. | ९२.६०% |
| बी.कॉम.आय.टी. | ९८.९६% |
| बी.कॉम.बँक मॅनेजमेंट | ९३.९४% |
| बी.सी.एस. | १००.००% |
| बी.सी.ए. | ९८.८८% |
| बायोटेक | १००.००% |
| बी.व्होक.हॉटेल मॅनेजमेंट | ८०.००% |
| बी.व्होक.ॲग्री | ९०.००% |
| एम.ए. | ९२.७८% |
| एम.कॉम. | ७६.९२% |
| एम.एस्सी. | ८८.३६% |
| एम.कॉम.आय.टी. | १००.००% |

## परीक्षा निकाल ज्युनिअर

| | |
|---|---|
| ११ वी कला | ९९.७०% |
| ११ वी कॉमर्स | ९९.८२% |
| ११ वी विज्ञान | ९९.७९% |

# एक पाऊल प्रगतीकडे.....

- ११ वी व्यवसाय शिक्षण - ९८.८२%
- १२ वी कला - ८५.४४%
- १२ वी कॉमर्स - ९४.९०%
- १२ वी विज्ञान - ९९.०२%
- ११ वी व्यवसाय शिक्षण - ९२.९५%

## क्रीडा विभाग ज्युनिअर

- इरफान पठाण - राष्ट्रीय धर्नुविद्या स्पर्धेत रौप्यपदक
- प्रगती पाटील - शालेय राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व
- योगिनी कोकरे - शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत थाळीफेक क्रीडा प्रकारात महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व
- वेदिका पाटील - शालेय राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत कांस्यपदक

## क्रीडा विभाग सिनिअर

- मोनिका खंडागळे - अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आईस स्टॉक स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठातून निवड व गोल्ड मेडल प्राप्त
- सुहानी वाघमारे - अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठ संघातून निवड; ब्राँझ मेडल प्राप्त ; तिची खेलो इंडिया या स्पर्धेसाठी निवड
- शिवप्रसाद पाखरे - राष्ट्रीय रग्बी स्पर्धेकरिता निवड, सिल्व्हर मेडल प्राप्त ; अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठातून निवड
- मोनिका खंडागळे व सलोनी नलवडे - अमरावती येथे झालेल्या बेसबॉल स्पर्धेत सातारा जिल्हा प्रतिनिधित्व व सिल्व्हर मेडल प्राप्त
- नम्रता कुंभार - सोलापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत ब्राँझ मेडल प्राप्त

## १९ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. अभिनंदनिय निवड

- अंकिता शिंदे - मुंबई पोलीस व मुंबई कारागृह पोलीसपदी निवड
- ऐश्वर्या बानुगडे - मुंबई पोलीसपदी निवड
- अभिजित कदम - मुंबई पोलीसपदी निवड
- अथर्व पाटील - भारतीय आर्मी अग्निवीर (जेडी) निवड
- सुरज पवार - भारतीय आर्मी अग्निवीर (तंत्रज्ञ) निवड
- प्रणव माने - भारतीय आर्मी अग्निवीर (जेडी) निवड

## प्लेसमेंट सेल

- टी.सी.एस., बी.पी.एस. कंपनी, पुणे - येथे ४० विद्यार्थ्यांची निवड
- अद्विक हायटेक कंपनी, पुणे - येथे २० विद्यार्थ्यांची निवड

## दिशा भित्तीपत्रक

स्वातंत्र्यदिन विशेषांक

शिक्षक दिन

कर्मवीर जयंती

प्रजासत्ताक दिन

प्राचार्य सुमतिबाई पाटील विशेषांक

## केशवराव पवार मध्यवर्ती ग्रंथालय

- एकूण पुस्तके - १,५८,४१३
- संदर्भ ग्रंथ - ८३,८२३
- क्रमिक ग्रंथ - ३१,९८२
- बुक बँक - ९,७८५
- ई-बुक्स - १३२
- देणगी भेट ग्रंथ - २,०२७
- ज्युनिअर कॉलेज - २५,९१५
- सी.डी.डी.व्ही.डी. - ९१६
- कॅसेटस् - ३३८
- जर्नल पिरॉडिकल मॅगेझिन्स - १०८
- बँक व्हॉल्यूम ऑफ जर्नल - ९२४
- न्यूज पेपर - ०११
- ई-रिसोर्स - ६,१५०
- ई-जर्नल्स - १,९९,५३६
- रिसर्च असिस्टन्स टूल्स - ०३
- शेतकरी लायब्ररी - ६२२

## केशवराव पवार मध्यवर्ती ग्रंथालय उपलब्ध सुविधा

- संगणकीकृत (बारकोड) देवघेव
- बुकबँक योजना
- विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका
- रात्र अभ्यासिका

# एक पाऊल प्रगतीकडे.....

- झेरॉक्स सुविधा
- शेतकरी ग्रंथालय
- स्पर्धा परीक्षा ग्रंथ, नेट-सेट ग्रंथ
- दुर्मिळ ग्रंथ संग्रह
- दिव्यांग वाचकांसाठी ग्रंथालय सुविधा
- मुक्तद्वार ग्रंथालय

## प्राध्यापक शिक्षकेतर सेवकवृंद

* सिनिअर कॉलेज - १५२  * ज्युनिअर कॉलेज - ८३
* १० + २ व्होकेशनल - ०३
* बी.सी.एस., बी.सी.ए., बायोटेक, बी.कॉम.आय.टी., एच.एम.सी.टी. ॲग्री., डाटा सायन्स, बँक मॅनेजमेंट, बी.बी.ए., फूड सायन्स, मेडिसिनल केमिस्ट्री, कॉम्प्युटर सायन्स - ७१
* शिक्षकेतर सेवक - ११८
* एकूण - ४२७

## विद्यार्थी संख्या

* सिनिअर विभाग - ७१४८
* ज्युनिअर विभाग - ४५६९
* एकूण - ११७१७

## वसतिगृह विद्यार्थी संख्या

* विद्यार्थिनी - ५५७
* विद्यार्थी - २००
* एकूण - ७५७

## एम.एच.टी.सी.ई.टी.

- नीट - ०६  • जेई मेन - ०८
- सी.ई.टी. (९५ पेक्षा जास्त गुण) - १३

## कमवा व शिका योजना

* एकूण विद्यार्थी - ४५
* मुक्त विद्यापीठ विद्यार्थी - १५८१
* दूर शिक्षण विभाग विद्यार्थी - १२५
* १०२ विद्यार्थ्यांना गरीब विद्यार्थी सहाय्य निधी - २,०४,०००/- आर्थिक सहाय्य

## FACULTY CONTRIBUTION IN RESEARCH AND PATENT

### BOOKS & AUTHORS

1) **Prof.Dr.V.K. Nikam –**
Physiological studies in a medicinal plant chlorophytum borivilianum Sant and Fernad

2) **Prof. Dr. K.H.Patil, Prof. Dr. A.V. Waghmode–**
Research and Review in Ethnobotany and Pharmacognsy

3) **Prof.Dr. U.B.More –**
A Handbook of Practical Chemistry B.Sc.I Sem II

4) **Prof.Dr. U.B.More –**
A Handbook of Practical Chemistry B.Sc.III

5) **Prof. Dr. A.G.Mulik –**
Organic Chemistry B.Sc. I Sem II

6) **Prof. Dr. I.N.Khan, Prof. Dr.S.G.Parte –**
Basics of Physiology

7) **Prof. Dr. A.P.Kamble –**
Brief Introduction to Laboratory Instruments in Microbiology

8) **Prof. Dr. A.K.Patil –**
Economics of Ginger Production and Marketing

9) **Prof. A.S.Salunkhe –**
Fundamentals of 1 HNMR & 13C NMR Spectroscopy

10) **Prof. Dr. M.S.Patil –**
Research and Reviews in Plant Science – ‘Glimpse of Biostimulates’

11) **Prof. A.S.Salunkhe –**
Rayat Vigyan Patrika- ‘Prachin Bhartiya Rasayanshastra’

# एक पाऊल प्रगतीकडे.....

## PATENTS

| Sr. No. | Name of Faculty | Patent Name | Granted |
|---|---|---|---|
| 1) | Prof.Dr. Vaishali Shewale | A Composition of polyherbal scalp oil serum for follicle stimulation and hair regrowth | Granted |
| 2) | Prof.Mahesh Gaikawad | Device for providing digital library | Granted |
| 3) | Prof.Sagar Tanpure, Prof.Dr. Abhijeet Mulik | Novel 1,2,4-Triazole-3-Thiones Derivatives | Published |
| 4) | Prof. Sagar Tanpure, Prof. Dr. Abhijeet Mulik | An improved process for the preparation for 1,2,4-Triazole-3-Thiones Derivatives | Granted |
| 5) | Prof.Dr. Pratibha Patil Mr. Shubham Tupe | Device to pour hot laboratory culture medium | Granted |
| 6) | Prof. Dr. Pratibha Patil Prof.Dr. Sayali Patil , Dr.Girish Pendharkar | Microbial system for synthesis of turmeric nanoparticles by using turmeric powder | Granted |
| 7) | Prof. Dr. Arati Kamble | A System for modifying a bacteriological medium for growing aerobic, non-symbiotic alkaliphilic nitrogen – fixing bacteria | Granted |
| 8) | Prof.Dr.Girish Pendharkar | A system for the synthesis of value-added compounds Furfural and Ethanol from Green Coconut Husk | Granted |
| 9) | Prof.Dr.Arati Kamble | A system for synthesis of Actinomycetes Streptomyces sp. for production of antibacterial substances | Granted |
| 10) | Prof.J.R.Ingole, Prof. S.M.Jadhav, Prof.P.R.Patil, Prof.S.A.Patil, Prof.Dr.A.P.Kamble | A system for production of antifungal substances from Streptomyces flavoviridis A K-2 (Actinomycetes) isolated from Rhizospheric soil | Granted |
| 11) | Prof.Dr. A.G. Dhodamani | A system for the synthesis of Ti1-xFexO2-§Photoelectrode for CdsQDs-N719 Dye sensitized solar cells | Granted |

## PUBLICATIONS IN NATIONAL CONFERENCES

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| 1 | Prof.Dr.Anisa Shaikh | Journal of Technology | Mineral Analysis of medicinally important Fern: AdiantumphilippensL |
| 2 | Prof.Dr.V.B.Chopade | Journal of Technology | Epiphytic Pteridophytes of Arunachal Pradesh (India) |
| 3 | Prof.Dr. A.V. Waghmode | Indian Hydrobiology | Exploration of Phenolic and Flavonoid content of Marine Brown Algae |

# एक पाऊल प्रगतीकडे.....

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| | | | Stoechospermum marginatum and Dictyota maxima |
| 4 | Prof.Dr.A. V. Waghmode | Journal of Conventional Knowledge and Holistic Health | Current trends in seaweeds as a functional food: Nutritional health perspective |
| 5 | Prof.Dr.N.T.Pawar | The Agriculture Magazine | Muga Silkworms: A treasure of Assam's Textile Heritage |
| 6 | Prof.Dr.S.S.Chile | Sanshodhak | Study effectiveness of HRM practices in post-acquisition period in the selected banks in the Kolhapur District |

## INTERNATIONAL PUBLICATIONS

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| 1 | Prof.Dr. M.S.Patil | International Journal of Botany studies | Phytochemical screening and antioxidant investigations on Ixora coccinea flowers |
| 2 | Prof.Dr.V.K.Nikam | Research Journal of Phytochemistry | Analysis and Phytochemical Screening of the Polyphenolic Antioxidant Activity of the White Dragon Fruit (Hylocereus undatus) |
| 3 | Prof.Dr.K.H.Patil | IJRAR | Ethnobotanical, Phytochemical and GCMS investigation of Calotropis gigantean (L.) W.T.Aiton Latex. |
| 4 | Prof. M.N.Gaikwad | Journal of Engineering Education Transformation | Research Productivity of Rajarambapu Institute of Technology, Islampur, (Maharashtra), India: A Bibliometric Analysis |
| 5 | Prof.M.M.Jamadar | Area Development and Policy | Urban Poverty beyond 'Slums': Mapping its Multidimensionality |
| 6 | Prof.Dr.V.S.Shewale | Current Trends in Biotechnology and Pharmacy | LC-HRMS and Phytochemicals Analysis of Gnidia glauca L. leaf crude extract with different solvents |
| 7 | Prof.Dr.N.T.Pawar, Prof.Dr.A.U.Sutar | International Journal of Research and Analytical Reviews | Study of water quality and Molluscan diversity form Krishna and Koyana river in Karad Tehsil, District Satara, |
| 8 | Prof.Dr.I.N.Khan, Prof.Dr. S.G.Parte, Prof.Dr.A.U.Sutar Prof.S.S.Gurav | African Journal of Biomedical Research | A Public survey study on the relationship between COVID infection, ABO blood group and post COVID symptoms |

# एक पाऊल प्रगतीकडे.....

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| 9 | Prof.Dr.A.G. Dhodamani | International Journal of Hydrogen Energy | Boosting the Photoelectrochemical Performance of ZnO nanorods with Co-doped Zn- ZIF metal-organic frameworks for water splitting studies |
| | | Chemistry Select | OptimizedNb- DopedTiO2/rGONanocomposites for Assessment of Photovoltaic Performance With Metal-Free Dye and Polymer Gel Electrolyte. |
| 10 | Prof.S.V.Tanpure, Prof.Dr.A.G.Mulik | Polycyclic Aromatic Compounds | Facile and Proficient Synthesis of Some New 1,2,4Triazole-3-Thiones Derivatives Using [H2- TMDP] [HPO4] Ionic Liquid |
| 11 | Prof.Dr.M.B.Jagdale | Journal of Drug Delivery Science and Technology | Unleashing potential of methotrexate-amino acid methyl ester-loaded lipidic nanocapsules as magic bullets against resistant breast cancer |
| 12 | Prof.Dr.A.J.Patil | Peer Reviewed Refered Research Journal | Dalit Panther Young Researcher Multi-disciplinary |
| | | International Journal of Advance and Applied Research | Economic Development Under Chalukya Era |
| 13 | Prof.Dr.Arati Kamble | African Journal of biological science | Exploration of possible antimycotic activity of Pseudomonas stutzeri against human pathogenic Aspergillus sp. |
| | | | Isolation of Streptomyces rochei from the rhizospheric soil of Ocimum tenuiflorum (tulsi) of Karad, Maharashtra, India and its 16S rRNA based identification |
| | | Chines Journal of evidence based Medicine | Antifungal potential of human Pathogenic Blastobotrys sp.ByBacillus lichenifomis Strain S10 Identified using 10S rRNA and first time cultivated on Glycerol Aspergine Agar with implication for NCBI database enhancement |
| 14 | Prof. Dr. G. B. Pendharkar Prof.Dr.P.S. Patil | Asian Journal of Microbiology, Biotechnology & Environmental Sciences | Microbial A1- Dehydrogenation of Androst-4-Ene-3, 17-Dione (Ad) By Delftia Acidovorance Mtcc 3364 In Presence Of Organic Solvent As Substrate Carriers |

## एक पाऊल प्रगतीकडे.....

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| 15 | Prof.V. S. Patil, Prof.P. S. Patil, Prof.S.Deore, Prof.K. Kakde, Prof. R.Jadhav (2024) | African journal of Biological Science.. | Spectroscopic Investigations of Conformational Change in Bovine Serum Albumin (BSA) with Rising Concentration of a Mood Stabilizing Drug: Lamotrigine |
| 16 | Prof.Dr.A.K.Patil | Madhya Pradesh Journal of Social Science | Role of AI In Cyber Security |
| | | International Journal of Humanities, Social Science, Business management & Commerce | Problems of Irrigation in Maharshtra |
| | | Shodha-Prabha (UGC CARE Journal) | Price Spread and Marketing Efficiency of Ginger Marketing Channels in Satara District of Maharashtra State |
| | | Humanities and Social Science Studies | Skill Development For Rural Employment in India |

### PAPERS PRESENTED IN INTERNATIONAL CONFERENCE

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| 1. | Prof.Dr.P.R.Talekar | University of Madras Department of History | Environmental Impact of Mining Activities in the Western Ghats of Maharashtra |
| 2. | Prof.Dr.U.B.More | Gold-CT 2024 KBC NMU Jalgaon | Biogeneic synthesis of CuO nanoparticles using Peucedanum Graveolens aqueous extract and its catalytic activity in the synthesis of tetrahydrobenzapyran derivatives |
| 3. | Prof.Dr.S.V. Mahamuni | XIDAEBRNS Biennial Symp. On Emerging Trends in Separation Science and Technology BARC, Mumbai | Adsorptive removal tube removal of-crystal valid die from aqueous solution using eagle marvelous fruit sale based magnetic composite |
| 4. | Prof.Dr.R.P.Pol | The Thoughts, Work and Facts of Dr. Babasaheb Ambedkar, Kamala College, Kolhapur | Dr.Babasaheb Ambedkar yanche Shaikshnik vichar |

## एक पाऊल प्रगतीकडे.....

| Sr. No. | Name of Author(s) | Name of the National Conference | Title of Paper |
|---|---|---|---|
| 5. | Prof.M.S.Patil | Gender Studies and Intersectionality., Amity University ,Patna, Bihar.<br>Re Thinking Narratives, Aesthetics and Human Values. Banaras Hindu University, Kashi | Women in Media and Film : Portrayal of women<br>Her Narrative's |
| 6 | Dr. Manasi S. Patil | An International Conference on Advancement and Emerging Trends in Sciences. Dahiwadi College, Dahiwadi. | Impact of silver nano- particles on seed....of chilly Var Bhagyalaxmi |
| 7 | Prof. Dr. G. B. Kalyanshetti | Innovative Research in Humanities Commerce Science and Technology, Anjuman Arts Science and Commerce college | Feminist consciousness and Gender Role in .... |
| 8 | Prof.Dr.V.K. Nikam | An International Conference on Advancement and Emerging Trends in Sciences. Dahiwadi College, Dahiwadi. | Effect of Growth Regultors on.. Curcumacaesia Raxb. |
| 9 | Prof.Dr.P.R. Nale | An International Conference on Advancement and Emerging Trends in Sciences. Dahiwadi College, Dahiwadi. | Phyllanthusniruri : A treasure Troove of.....Medicinal Value |
| 10 | Prof.Dr.A.P. Kamble | International Conference on Biomake in India-II by Krishna Institute of Allied Sciences, KVV(DU), Karad. | Studies on Plastic Degradation Actinomycetes |
| 11 | Prof.S.A.Patil | International Conference on Biomake in India-II by Krishna Institute of Allied Sciences, KVV(DU), Karad. | Biogenic Nanoparticles : Role in Waste Management |




**दु:ख दुसऱ्याचे जाणावे । ऐकोनी तरी वाटोनी घ्यावे ।**
**बरे - वाईट सोसावे । समुदायाचे ।।**

२०२४-२०२५ शैक्षणिक वर्षात

जागतिक राष्ट्रीय-राज्य स्तरावरील कीर्तीमान राजधुरंधर,

ज्ञात-अज्ञात नेते, कलावंत, भारतीय सैनिक, शिक्षणतज्ज्ञ,

संशोधक, वैज्ञानिक, साहित्यिक, रयत सेवक,

सामाजिक कार्यकर्ते, देशभक्त, मान्यवर ...

दिवंगत झालेल्यांना महाविद्यालयाच्या वतीने

**भावपूर्ण श्रद्धांजली...**

# मराठी विभाग
## बिंब

**पदवी स्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा साहित्यिक कलाविष्कार**



## आनंद

झाला आनंदी आनंद
आज मराठी मनाला
माय मराठी बोलीला
दर्जा मिळाला मिळाला ।।
दर्जा मिळाला मिळाला
'अभिजात' मराठीला
न्याय भेटला गं सखे
'राष्ट्रभाषा' भगिनीला ।
राष्ट्रभाषा भगिनीला
संशोधन प्रोत्साहन
भारतात विद्यापिठी
आता मिळाले रे स्थान ।।

आता मिळाले रे स्थान
संत ग्रंथ संपदेला
यावे सुगीचे दिवस
साहित्याला संस्कृतीला ।।
साहित्याला संस्कृतीला
प्राचीन माय बोलीला
व्हावी प्रसिद्‌ध समृद्‌ध
जना चाखावे गोडीला ।।
जना चाखावे गोडीला
दिनु सोनियाचा आला
झाला आनंदी आनंद
आज मराठी मनाला ।।

**रचना - वासुदेव खोपडे**
(सहा.पोलिस उपनिरीक्षक अकोला)

## दृष्टिक्षेपात

**बिंब पदवी**

| | |
|---|---|
| मराठी विभाग | १ |
| हिंदी विभाग | ४९ |
| इंग्रजी विभाग | ७७ |
| संस्कृत विभाग | ११५ |

**प्रतिबिंब पदवी**

| | |
|---|---|
| पदवीपूर्व व पद्‌व्युत्तर विभाग | ११९ |

# अनुक्रमणिका


**गद्य विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | अभिजात मराठी, हा आनंद व जबाबदारीसुद्धा ! | सानिका पवार | बी.ए.-३ (मराठी) | १ |
| २) | रील्सच्या विळख्यात अडकली तरुणाई | तेजश्री थोरवडे | बी.ए.-३ (मराठी) | ३ |
| ३) | सामाजिक कार्यकर्ते चक्रपाणी चाचर यांची मुलाखत | अथर्व जाधव/शिवेंद्र जाधव | बी.ए.-३ | ५ |
| ४) | प्रतापगड-महाबळेश्वरचा माझा प्रवास | प्रियांका महापुरे | बी.ए.-३ (मराठी) | ८ |
| ५) | प्रवास आयुष्याचा | दिक्षा लालासो अडसुळे | बी.ए.-२ | ११ |
| ६) | निसर्ग - एक कलावंत | कविता कृष्णत माळी | बी.ए.-२ | १३ |
| ७) | मानवतावादी उद्योजक : रतन टाटा | साक्षी संतोष होवाळ | बी.ए.-३ (अर्थशास्त्र) | १५ |
| ८) | अनुभव इंटर्नशिपचा नव्या शैक्षणिक धोरणांचा | तन्वी निवास शिंदे | बी.कॉम.-३ (बँक मॅनेजमेंट) | १७ |
| ९) | सोशल मिडिया -व्यसनमुक्तीची गरज | रश्मी देशमाने | बी.कॉम.-२ (आय.टी.) | १९ |
| १०) | शिवनेत्र बहिर्जी -पुस्तक परीक्षण | विवेक राजेश शिंदे | बी.कॉम.-३ | २१ |
| ११) | 'माइंडफुलनेस' : दैनंदिन जीवनाची गरज | रहिना रशीद सय्यद | बी.ए.-३ (मानसशास्त्र) | २३ |
| १२) | यंदा चषक एस.जी.एम. चाच ! | आदित्य उमेश लट्ठे | बी.ए.-२ (मराठी) | २५ |
| १३) | 'स्वराज्याचा छावा : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज' | श्रेया दिलीप जगताप | बी.एस्सी.-१ | २७ |
| १४) | 'हॉटेल मॅनेजमेंट कोर्स शिकताना' | यश सचिन लटिंगे | बी.व्होक.-२ (हॉटेल मॅनेजमेंट) | २९ |
| १५) | कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) : आधुनिक तंत्रज्ञानाची क्रांती | श्रीकांत कदम | बी.कॉम.-१ (आय.टी.) | ३१ |
| १६) | डॉ. मनमोहन सिंग | श्रुती संदीप दराडे | बी.एस्सी.-३ (वनस्पतीशास्त्र) | ३३ |
| १७) | भारतीय संविधानाचे महत्त्व | प्रथमेश गुरव | बी.सी.एस.-३ | ३५ |
| १८) | माझी जन्मठेप : पुस्तक परीक्षण | अनुराग राजेंद्र माने | बी.कॉम.-३ (बँक मॅनेजमेंट) | ३८ |
| १९) | आयुष्य आणि मोबाईल : एक संघर्ष (एक कथा आजच्या विद्यार्थ्यांची) | दिपीका रामदास बाचल | बी.कॉम.-३ | ४३ |
| २०) | आयुष्य जगावं तरी कसं..... | दिपश्री संजय जाधव | बी.कॉम.-२ (आय.टी.) | ४४ |
| २१) | नामशेष होत असलेले वन्यजीव | फिजा दिलावर इनामदार | बी.एस्सी.-३ (प्राणीशास्त्र) | ४५ |

**पद्य विभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मनातलं बोलू काही | अंजना आनंदा घराळ | बी.कॉम.-२ | २ |
| २) | तुला आठवावे | प्रतिक्षा कवठेकर | बी.कॉम.-२ (आय.टी.) | ४ |
| ३) | सुंदरता जीवनाची | दिपाली भानुदास नलवडे | बी.कॉम.-२ | ७ |
| ४) | आई | सचिन राजेंद्र संकपाळ | बी.कॉम.-१ (आय.टी.) | १० |
| ५) | भेटतात अशी काही माणसे..... | सायली संतोष घाडगे | बी.एस्सी.-२ (वनस्पतीशास्त्र) | १० |
| ६) | नशीब..... | प्राजक्ता संजय रासकर | बी.कॉम.-१ (आय.टी.) | १४ |
| ७) | शिवाजी महाराज | वैष्णवी विकास डोंगरे | बी.कॉम.-१ (आय.टी.) | १४ |
| ८) | मैत्री म्हणजे काय..... ? | विनयराज विजय लोंढे | बी.कॉम.-२ (आय.टी.) | १८ |
| ९) | मज मराठीची गोडी..... | साईश्वरी लक्ष्मण पाटील | बी.एस्सी.-३ (सुक्ष्मजीवशास्त्र) | २० |
| १०) | अश्रू | मधुरा संभाजी माळी | बी.सी.एस.-१ | २० |
| ११) | तरुण | प्रियांका जगन्नाथ महापुरे | बी.ए.-३(मराठी) | २२ |
| १२) | आयुष्य | मानसी सुहास लाड | बी.ए.-३ | ३० |
| १३) | न विसरणारे ग्रंथालय | तेजस्वी अरूण थोरवडे | बी.ए.-३ | ३२ |
| १४) | मावळा शिवभक्त | ऋतुजा सुरेश पाटील | बी.एस्सी.-३ (वनस्पतीशास्त्र) | ४६ |
| १५) | कृत्रिम बुद्धिमत्ता : नवे युग, नवी दिशा | केदार सुतार | बी.कॉम.-१ (आय.टी.) | ४६ |
| १६) | प्रेम.... | दिपिका रामदास बाचल | बी.कॉम.-३ | ४७ |
| १७) | ती..... | प्रियांका निवास पवार | बी.कॉम.-३ | ४७ |
| १८) | बाबासाहेबांचे योगदान : संविधान.... ! | अनुराग राजेंद्र माने | बी.कॉम.-३ (बी.एम.) | ४८ |
| १९) | आयुष्य | मोहिनी संतोष शेळके | बी.ए.-१ | ४८ |

वैचारिक लेख



# अभिजात मराठी, हा आनंद व जबाबदारीसुद्धा !

सानिका पवार, बी.ए.-३ (मराठी)

''माझा मराठीची बोलू कौतुके ।
परि अमृतातेहि पैंजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीण ।।''

**- संत ज्ञानेश्वर**

अमृताहून सरस, श्रेष्ठ व गोड असणाऱ्या मराठी भाषेला केंद्रीय सांस्कृतिक मंडळाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय जाहिर केला. मराठी भाषिकांच्या दृष्टीने ही अतिशय आनंदाची बाब आहे. गेली दहा वर्षे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्न केले जात होते. त्या प्रयत्नांना आज यश प्राप्त झाले. ही संपूर्ण मराठी लोकांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

'अभिजात' हा शब्द ग्रीक शब्द 'Aristokratia' या शब्दावरून आला आहे. याचा अर्थ 'सर्वासम द्वारे राज्य करणे' असा आहे. साहित्यात 'अभिजात साहित्य' असा शब्द प्राचीन साहित्यातील कालातित साहित्यकृतींना लावला जातो. उदा. 'ज्ञानेश्वरी', 'अभंगगाथा', 'रामायण', 'महाभारत' इ. आधुनिक काळात 'अभिजात भाषा दर्जा' हा भारत सरकारद्वारे वैशिष्ट्यपूर्ण भाषेला दिला जाणारा एक दर्जा आहे. तो दर्जा मराठी भाषेला आता प्राप्त झालेला आहे. किंबहुना मुळातच अभिजात असणाऱ्या मराठी भाषेवर शासकीयदृष्ट्या शिक्कामोर्तब झाले आहे. कोणत्याही भाषेतील अभिजातपण हे तिच्या साहित्यावर, परंपरेवर अवलंबून असते व त्याअर्थाने मराठी भाषा अभिजात भाषाच आहे.

भारतीय राज्यघटनेच्या ८व्या परिशिष्टात ज्या प्रमुख २२ भाषांचा उल्लेख आहे त्यात मराठी भाषेचाही समावेश आहे. महाराष्ट्राची ही प्रमुख राज्यभाषा असून जगामध्ये ही भाषा बोलणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. भारतात सुमारे १४ कोटी लोक हे मराठी भाषिक आहेत. मराठी भाषेचे आजचे वय सुमारे २४०० वर्षे आहे. मराठी ही 'इंडोयुरोपिअन' भाषाकुळातील भाषा असून ती महाराष्ट्रीयक ® प्राकृत ® अपभ्रंश ® महाराष्ट्री ® मराठी यातून मराठी भाषेचा विकास होत गेला व तिला आजचे रूप प्राप्त झालेले आहे. मराठी भाषेची वर्णमाला ही संस्कृतची देणगी असून तिची लिपी 'देवनागरी' आहे. मुकुंदराजाचा शके ११९० मध्ये लिहिलेला 'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला ग्रंथ आहे. मराठी भाषा ही प्रारंभापासूनच ग्रंथरुपाने अतिशय समृध्द भाषा म्हणूनच समोर येते. 'ज्ञानेश्वरी' सारखा ९००० ओव्यांचा परम सुंदर भाष्य असणारा अमृततुल्य ग्रंथ मराठी भाषेत निर्माण झाला आहे यातच तिचे अभिजातपण खऱ्या अर्थाने सामावलेले आहे.

> *''मुळातच अभिजात असणाऱ्या मराठी भाषेवर शासकीयदृष्ट्या शिक्कामोर्तब झाला आहे. कोणत्याही भाषेतील अभिजातपण हे तिच्या साहित्यावर, परंपरेवर अवलंबून असते व त्या अर्थाने मराठी भाषा अभिजात भाषाच आहे.''*

३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रसरकारने मराठीसह ५ भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे. भाषेला हा दर्जा मिळवून देण्याचे श्रेय हे अर्थातच 'अभिजात मराठी भाषा समिती'कडे जाते. अतिशय अथक प्रयत्न करून मराठी भाषेसंबंधी सर्व प्राचीन पुरावे उपलब्ध करून, मराठी भाषेचे प्राचीनत्व या समितीने सिध्द केले व त्यामुळेच मराठी भाषेला उशिरा का होईना पण अभिजात भाषा म्हणून केंद्रसरकारने घोषित केले आहे.

महाराष्ट्रात आज मराठी भाषेचा विचार करता या भाषेवर मोठ्या प्रमाणावर परकीय भाषेचे आक्रमण होऊन तिचे मूळ रूप ती हरवून बसत चाललेली आहे. महाराष्ट्रात मराठीची उपेक्षा मराठी माणूसच करत आहे, ही खरोखरच दुर्दैवाची बाब आहे. ज्या मराठी भाषेला संतांनी 'अमृतवाणी' म्हटले त्याच मराठी भाषेला स्वमातीत, स्वत:च्या अस्तित्वासाठीच झगडावे लागत आहे. एकीकडे आपण मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून आनंद व्यक्त करतो तर दुसऱ्या बाजूला आपणच तिची उपेक्षा करतो. ही उपेक्षा आता थांबायला हवी आहे.




अभिजात दर्जामुळे मराठी भाषेला अधिक चांगले दिवस येतील. यामुळे केंद्रसरकारकडून आपणाला मराठी भाषेच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात अनुदान मिळाले. फार मोठी आर्थिक मदत यामुळे उपलब्ध झालेली आहे. आता मराठी भाषेचा सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक विकास नेमकेपणाने व नियोजनपूर्वक करावा लागेल. अभिजात दर्जाने मराठी भाषेचा विकास पुढील घटकांना प्राधान्य देऊन करता येईल.

१. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातील ४५० विद्यापीठात मराठी भाषा शिकण्याची सोय उपलब्ध होईल.

२. महाराष्ट्रातील हजार ग्रंथालयांना यामुळे चालना मिळेल, त्यांचा विकास करता येईल.

३. मराठीच्या ज्या बोली ऱ्हास पावत चालल्या आहेत यांचे जतन व संवर्धन करता येईल. बोलीवर संशोधन करता येईल. समृध्द वारसा निर्माण करता येईल.

४. साहित्यसंग्रह करता येईल.

५. प्राचीन मराठी साहित्याचे, ग्रंथांचे जतन व संवर्धन करता येईल.

६. मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.

७. 'मराठी भाषा संशोधन व अभ्यास केंद्रा'ची उभारणी होईल.

८. साहित्य, संस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने नवीन उपक्रम सुरू करता येतील.

९. 'मराठी विद्यापीठाची' स्थापना करणे सहज शक्य होणार आहे.

अभिजात भाषेला दर्जा मिळाल्याने भाषेचा असा चौफेर विकास झाला पाहिजे. मराठी भाषा पुढच्या पिढीला वारसा म्हणून देण्यासाठी तिचे जतन करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण मराठी भाषा बोलली, लिहिली व वाचली पाहिजे. तिचा अभिमान, मान आपण स्वत: बाळगला पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषेला मिळालेला हा 'अभिजात दर्जा' योग्य ठरेल. 'मराठी भाषा गौरव दिन' जसा साजरा करतो तसाच ३ ऑक्टोबर हा 'मराठी अभिजात भाषा दिन' म्हणून साजरा केला पाहिजे. मराठी भाषेचा हा अभिजातपणा टिकवणे, वाढविणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

■ ■ ■



## मनातलं बोलू काही

का कळेना दिवसभर हसणारे डोळे,
रात्री नकळत भरून येतात ?
सगळं शांत झालं की,
मन विचाराचं वादळ घेऊन येतात.
काय होईल ? कसं होईल ? काहीच माहित नसतं,
पण एक मन दुसऱ्या मनाला समजावत असतं,
काय होईल आपलं काहीच माहित नाही,
थकत चाललेल्या बापाला आपल्याशिवाय
कोणाचाच आधार नाही.
जो आयुष्यभर कर्जाच ओझं वाहत आला
त्याला म्हातारपणी सुखाचे दिवस दाखवायचे
एवढाच विचार मनात गोंधळ घालत असतो.
पण काय करणार मुली असतातच निःशब्द
मनातलं काही ओठावर आणायला विसरतात,
काय होणार ? कसं होणार ? काहीच माहित नसतं
घरात कोण नसताना एकटचं रडत असतं.
पुढे आपण नाही कमवलं तर कसं होणार,
बापाच्या डोक्यावरचं ओझं कमी कसं होणार
मुले बापाला मिठी मारून सांगू तर शकतात
तुम्ही काळजी नका करू मी आहे,
पण बाबा तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवा
मला ही काहीतरी सांगायचं असतं......

**अंजना आनंदा घराळ**
बी.कॉम.-२

कथा



# रील्सच्या विळख्यात अडकली तरुणाई

**तेजश्री थोरवडे, बी.ए.-३ (मराठी)**

राज नावाचा एक हुशार आणि गुणी मुलगा होता. तो दहावीमध्ये प्रथम क्रमांकाने पास झाला. त्याचा गावामध्ये, शाळेमध्ये सत्कार झाला. त्याला पुढच्या शिक्षणासाठी मोठ्या शहराच्या कॉलेजमध्ये त्याच्या आई-बाबांनी पाठवले. आणि त्याच्या बाबांनी त्याला पास झाल्याबद्दल नवीन सर्व सुविधा असलेला चांगला मोबाईल फोन घेऊन दिला. मोबाईल बघितल्यावर तो खूप खूश झाला आणि पुढच्या शिक्षणासाठी तो शहरामध्ये आला. त्याने कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजच्या पहिल्या दिवशी राजचे खूप सारे मित्र झाले. त्यातले अनिल, राहुल, अनिकेत आणि श्रध्दा अशा पाच जणांचा ग्रुप झाला. त्यांची मैत्री आणखी घट्ट झाली. ते एकत्र अभ्यास करायचे, एकत्र लेक्चर्स करायचे आणि एकत्र फिरायलाही जायचे. एके दिवशी कॉलेजच्या कँटीनमध्ये ते पाच जण चहा पीत बसले होते. तेव्हा राजने बाबांनी भेट केलेना मोबाईल दाखवला. मोबाईल बघून ते सर्व जण खूश झाले. त्यातल्या एकाने राजला प्रश्न विचारला की, 'राज तुझ्याकडे इंस्टाग्राम ॲप आहे कां ?' राज म्हणाला, 'नाही रे, अनिकेत आणि इंस्टाग्राम म्हणजे काय आहे ते ?' 'अरे वेड्या इंस्टाग्राम तुला माहिती नाही कां, ज्याच्यावर आपण व्हिडीओ सुध्दा बनवतो.' राजने पुन्हा विचारले, 'इंस्टाग्रामवर व्हिडिओ सुध्दा बनवता येतो कां ? आणि ते कसे बनवायचे ?' तेव्हा अनिकेतने सांगितले, 'इंस्टाग्रामवर पहिल्यांदा आपली स्वत:च्या नावाची 'आय.डी.' उघडायची नंतर आपले चांगले फोटो पोस्ट करायचे आणि एखाद्या गाण्यावर आपले स्वत:चे व्हिडिओ तसेच रील्स बनवून त्या पोस्ट करायच्या. त्याने आपले फॉलोअर्स वाढतात. यातूनच आपण फेमस होतो.'

मग सगळ्यांची इच्छा झाली रील्स बनवायची. मग त्यांनी अशा खूप साऱ्या रील्स बनवल्या आणि त्यांचे फॉलोअर्सही वाढले. त्यांच्या रील्सला अनेक लाईक्स मिळाल्या. त्यामुळे

*मुलांनो तुम्ही स्वत:च्या आनंदासाठी जो मोबाईल वापरता तो एक दिवस महागात पडतो. आई-बाबा तुम्हाला अभ्यासासाठी मोबाईल देतात आणि तुम्ही त्याचा वापर 'रील्स, फोटो काढण्यात' घालवता. तुम्ही आजची युवा पिढी आहात. तुम्ही जर या रील्सच्या विळख्यात अडकला तर भविष्याचे काय होणार ?*

त्या रील्स बनवण्याचा त्यांना नाद लागला. ते लेक्चर्स सोडून, अभ्यास सोडून सतत रील्स बनवत होते. आणि याचा परिणाम त्यांच्या परीक्षांवर झाला. ते पाच जण परीक्षेत नापास झाले. राजने आपल्या घरी सांगितले तेव्हा राजचे बाबा राजला ओरडले. त्यांना प्रश्न पडला की, राज हा हुशार मुलगा असा अचानक नापास कसा झाला ? पण राजने एकही उत्तर दिले नाही. एके दिवशी राजच्या बाबांनी राजला रील्स करताना पाहिले व त्यांनी एक युक्ती केली. ते राजला म्हणाले, 'राज तू उद्या तुझ्या मित्रांना आणि त्यांच्या आई-बाबांना आपल्या घरी घेऊन ये.' राज म्हणाला, 'पण का बाबा ?' बाबा म्हणाले, 'ते मी तुला उद्या सांगतो.'

मग दुसऱ्या दिवशी राजचे मित्र व त्यांचे आई-बाबा आले. राजचे बाबा राजच्या मित्रांच्या आई-बाबांना घेऊन बाजूला गेले व त्यांनी त्यांची युक्ती सांगितली. ते म्हणाले, 'आपण सगळ्यांनी आपल्या मुलांना वाईट गोष्टींपासून वाचवले पाहिजे. त्यासाठी मी चांगलीच एक युक्ती केली आहे. तुम्ही सगळे माझी साथ द्याल अशी अपेक्षा ठेवतो.' तेव्हा ते सगळेजण म्हणाले, 'हो



आम्ही तुमची साथ देऊ. आपल्या मुलांना वाईट गोष्टीपासून दूर ठेवणे हे आपले कर्तव्यच आहे.'

मग राजचे बाबा त्या सर्वांना घेऊन एका हॉस्पिटलमध्ये गेले. तिथे राजच्या वयाची मुले ॲडमीट होती व त्या सगळ्यांना प्रश्न पडला. राजने विचारले, 'आपण येथे का आलोत बाबा ?' बाबा म्हणाले, 'येथे तुम्हाला जितकी मुलं दिसत आहेत ती तुमच्या वयाची आहेत आणि हे सगळे आजारी आहेत. मोबाईलमुळे. अभ्यास सोडून सतत मोबाईलचा अतिवापर केल्यामुळे आज हे सर्वजण येथे ॲडमिट आहेत.' त्याचवेळी डॉक्टर आले आणि डॉक्टर म्हणाले, 'हो तुम्ही अगदी बरोबर बोलत आहात. मुलांनो, तुम्ही जो स्वत:च्या आनंदासाठी मोबाईल वापरता तो एक दिवस महागात पडतो. आई-बाबा तुम्हाला अभ्यासासाठी मोबाईल देतात आणि तुम्ही त्याचा वापर रील्स, फोटो काढण्यात घालवता. ही मुले याच मोबाईलमुळे आज येथे उपचार घेत आहेत. तुम्ही आजची युवा पिढी आहात. तुम्ही जर या रील्सच्या विळख्यात अडकला तर भविष्याचे काय होणार ? तुम्ही चांगले निर्णय कसे घ्याल ? आणि तुमची पुढची पिढी काय शिकेल तुमच्याकडून ? कसे असेल त्यांचे भविष्य ? आज जी तुम्हाला येथे मुले दिसत आहेत त्यातल्या एकाला दिसत नाही, एकाला ऐकू येत नाही ते सतत काल्पनिक जीवनात वावरत असतात. त्यांना वास्तवाचे भान नसते.'

हे ऐकल्यावर राज व त्याच्या मित्रांना खूप वाईट वाटले आणि त्यांची चूक त्यांच्या लक्षात आली. राज व त्याचे मित्र म्हणाले, 'आमच्याकडून खूप मोठी चूक झाली. आम्ही आता परत असं कधीही करणार नाही. तुम्ही आम्हाला मोबाईल हा अभ्यासासाठी दिला आणि आम्ही त्याचा गैरवापर केला. खरंच आम्हाला माफ करा. परत असे करणार नाही.' राजचे बाबा म्हणाले, 'तुम्हाला तुमची चूक कळाली यातच समाधान. आम्ही असं म्हणत नाही की तुम्ही मोबाईल हा फक्त अभ्यासासाठी वापरा, तर अभ्यास करून झाल्यावर तुम्ही मोबाईल बघितला तर चालेल. तुम्ही फोटो, रील्स करू शकता. पण याचा अतिवापर किंवा गैरवापर झाला नाही पाहिजे. अभ्यासही करा आणि मोबाईलही बघा. पण मोबाईलची इतकी सवय लावून घेऊ नका. मोबाईल हा चांगलाही आहे आणि वाईटही आहे. म्हणून त्याचा वापर मर्यादित केला पाहिजे.'

राज म्हणाला, 'हो आम्ही अभ्यास करून झाल्यावरच मोबाईल बघणार. त्यानंतर राज आणि त्याचे मित्र अभ्यास करून परीक्षेत चांगल्या गुणांनी पास झाले आणि राजने परत एकदा पहिला नंबर काढला. राजचे बाबाही खूप खुश झाले आणि राजचे अभिनंदन केले.

**तात्पर्य :**

एखाद्या गोष्टीची इतकी सवयही लावू नये की आपला जीव हा धोक्यात जाऊ शकतो.

■ ■ ■



## तुला आठवावे

कवितांमधून तुलाच लिहावे,
पुस्तकांतून तुलाच वाचावे,
गाण्याचे तर फक्त निमित्तच,
पण गाण्याच्या निमित्ताने
तुला गुणगुणावे,
वाटतं दिवसभर तुलाच पहावे,
दिवसभर पाहून पण,
स्वप्ननगरीत पण तूच दिसावे,
विचारत असते प्रश्न स्वतःला
कितीदा नव्याने तुला आठवावे.



**प्रतिक्षा कवठेकर**
बी.कॉम.-२ (आय.टी.)

# सामाजिक कार्यकर्ते चक्रपाणी चाचर यांची मुलाखत

अथर्व जाधव/शिवेंद्र जाधव, बी.ए.-३

नमस्कार, मी अथर्व जाधव. मी एकदा बसमधून प्रवास करीत असताना मला त्या बसचे वाहक एका व्यसन करणाऱ्या तरुणाला व्यसन कशाप्रकारे आपल्या शरीरासाठी घातक आहे हे सांगताना दिसले. त्यांचे हे सामाजिक कार्य मला खूप आवडले.

काही दिवसानंतर मी आणि माझा मित्र शिवेंद्र जाधव कराडमध्ये जात असताना त्याच बसमधील वाहकांची आणि माझी भेट झाली. बघता क्षणी मी त्यांना ओळखले व त्यांना त्या दिवशी झालेला प्रसंग सांगितला आणि त्यांना विचारलं की 'मी तुमची मुलाखत घेऊ शकतो कां ?' त्यांनीही लगेचच मला परवानगी दिली. त्यांच्या सुट्टीच्या दिवसाचे औचित्य साधून ते कराडमध्ये आले आणि मी व माझा मित्र शिवेंद्रने त्यांची मुलाखत घेतली.

*लहान असल्यापासून मला समाजसेवेची आवड होती. त्यासाठीच आजही मी विधवा स्त्रियांसाठी, वृद्धांसाठी, तरुणांसाठी अनेक उपक्रम राबवतो. मला पुरस्कार मिळावा म्हणून मी कार्य करीत नाही. पण पुरस्कार प्राप्त झाल्यावर आम्हाला सामाजिक कार्य करण्यासाठी आणखीनच प्रेरणा मिळते.*

**अथर्व : नमस्कार सर, मी अथर्व जाधव. तुमचं नाव काय व तुमचं गाव कोणतं ?**

चाचर : नमस्कार, मी चक्रपाणी चाचर. माझे गाव जेजुरी हे आहे.

**शिवेंद्र : नमस्कार मी शिवेंद्र. तुम्ही वाहक म्हणून या क्षेत्रात कसे आलात ?**

चाचर : माझे वडील वायरमन होते व त्यांची इच्छा होती की माझ्या एकातरी मुलाने अंगावर खाकी घालावी.

**अथर्व : तुमची दिनचर्या कशी सुरू होते ?**

चाचर : सकाळी लवकर उठणे, कामाची वेळ बघून कामावर जाणे व बसमधील लोकांच्या ज्या अडचणी असतील त्या समजून घेणे, त्या सोडवणे, लोकांना मदत करणे.

**शिवेंद्र : बसमधील हे काम तुम्हाला आवडते कां ?**

चाचर : हो खूपच आवडते. कारण बसमध्ये हरतऱ्हेची माणसं भेटतात. त्यांच्या विविध समस्या जाणून घेणे, त्यावरील उपाय शोधणे यातून मला आनंद मिळतो.

**अथर्व : किती वर्ष झाली तुम्ही वाहक म्हणून कार्यरत आहात ?**

चाचर : जवळपास आठ वर्षे झाली मी या क्षेत्रात कार्यरत आहे.

**अथर्व : एवढ्या वर्षात तुम्हाला आलेला एखादा अनुभव तुम्ही सांगू शकता कां ?**

चाचर : एक वेगळाच अनुभव आहे. अमरावतीमध्ये एका सुशिक्षित घरातील स्त्रीला दुसरीही मुलगी झाली म्हणून त्या स्त्रिच्या सासूने व तिच्या नवऱ्याने तिला खूप त्रास दिला. त्या त्रासाला कंटाळून त्या स्त्रीने आपले एक महिन्याचे बाळ चुलीत



फेकून दिले. जेव्हा ही घटना मला त्या स्त्रीने सांगितली तेव्हापासून मी एक संकल्प केला की, 'प्रत्येक नवीन वर्षाला मला समजेल की ज्या घरात मुलगी जन्माला येईल त्या मुलीला मी एक ड्रेस व मिठाईचा पुडा देईन. आतापर्यंत अशा प्रकारे मी १०२ मुलींचा सत्कार केला आहे.

**शिवेंद्र : मध्यंतरी जो बस संप झाला त्यामध्ये तुम्ही सहभागी होता का ?**

चाचर : हो सरकारने प्रत्येक गोष्टीचा विचार केला पाहिजे व आमच्या कामाचा आम्हाला योग्य तो मोबदला दिला पाहिजे.

**अथर्व : तुम्हाला दैनंदिन जीवनात कोणत्या समस्या येतात ?**

चाचर : आपली भाषा गोड असेल तर कोणती समस्या येत नाही. पण एकदा एक असा प्रसंग घडला की, इचलकरंजीला जाणारी एक मुलगी माझ्या बसमध्ये प्रवास करीत होती. बसमधला एक माणूस त्या मुलीकडे वाईट नजरेने बघत होता. तेव्हा मी सगळ्या प्रवाशांना सोबत घेऊन त्या माणसाला चांगलाच चोप दिला.

**शिवेंद्र : आम्ही मध्यंतरी पेपरमध्ये वाचलं की, तुम्ही सामाजिक कार्यातही सहभागी असता व तुम्हाला 'राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्कार' प्राप्त झाला आहे. या क्षेत्राकडे तुम्ही कसे आलात ?**

चाचर : लहान असल्यापासूनच मला समाजसेवेची आवड होती. यासाठीच आजही मी विधवा स्त्रियांसाठी, वृद्धांसाठी, तरुणांसाठी अनेक उपक्रम राबवतो. मला पुरस्कार मिळावा म्हणून मी कार्य करीत नाही. पण पुरस्कार प्राप्त झाल्यावर आम्हांला सामाजिक कार्य करण्यासाठी आणखीनच प्रेरणा मिळते.

**अथर्व : आणखी कोणते सामाजिक उपक्रम तुम्ही राबवता ?**

चाचर : १ जून ला बसचा वर्धापनदिन असतो हे जास्त कोणाला माहित नाही. तर या दिवशी बसचा वाढदिवस म्हणून मी एका गरीब मुलीचा एका वर्षाचा खर्च स्वत: करतो.

**शिवेंद्र : तुम्हाला लहानपणापासूनच या क्षेत्रात यायचे होते कां ?**

चाचर : मला खरं तर शिक्षक बनायचं होतं. पण बारावीला ५९% मार्क मिळाले. चार टक्के कमी होते व त्यात मी मराठा. आरक्षण नसल्यामुळे मी माझी इच्छा पूर्ण करू शकलो नाही. पण माझ्या बहिणीच्या रुपाने मी ती पूर्ण केली. आज माझी बहिण शिक्षिका आहे.

**अथर्व : तुम्हाला शासनाकडून महामंडळासाठी कोणत्या सुधारणा हव्या आहेत ?**

चाचर : प्रत्येक गावासाठी वेळेवर बस असाव्यात आणि शासनाने नवीन बसेसची खरेदी करावी.

**शिवेंद्र : जेव्हा सर्व लोकांच्या घरी दसरा, दिवाळी असे सण असतात तेव्हा तुमच्या परिवारासाठी तुम्ही सुट्टी घेता कां ?**

चाचर : नाही, आम्ही तसं केलं तर प्रवाशांची गैरसोय होईल. आम्ही आमच्या कर्तव्याला बांधील आहोत आणि प्रवाशांची सेवा करणे हा आमचा धर्म आहे.

**अथर्व : तुम्हाला हे सामाजिक कार्य करताना कोणत्या समस्या येतात ?**

चाचर : तसं बघितलं तर आर्थिक समस्या आहेत काही. मी इतरांना कर्ज काढूनही मदत केलेली आहे.

**शिवेंद्र : आणखी कोणत्या सुधारणा करण्यावर तुमचा भर असतो ?**

चाचर : मला अंधश्रध्दा मानणारे लोक आवडत नाहीत. असं कोणी दिसलं तर मी त्या व्यक्तीला समजावतो. त्यांच्यामध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतो. उदा. लोकं लग्न जुळवत असताना किती गुण जुळतात ? शनि, मंगळ आहे का ? असल्या गोष्टी बघतात. पण मला हे पटत नाही. तसं बघितलं तर माझं लग्न झालं तेव्हाही असल्या गोष्टी बघितल्या नाहीत आणि मी इतरांनाही सांगतो की तुम्ही असल्या गोष्टी मानू नये.

**अथर्व : तुम्ही अंधश्रध्दा, भोंदूगिरी या गोष्टी मानत नाही. मग तुम्ही देवाला मानता कां ?**

चाचर : हो देवावर माझी श्रध्दा आहेच. कारण कर्ताकरविता तो आहे. फक्त मला एवढंच वाटतं की श्रध्दा असावी, अंधश्रध्दा नसावी. म्हणजेच जे लोक पिंडीवर दूध वगैरे ओततात ते मला पटत नाही. ते चुकीचे आहे. हेच दूध आपण एखाद्या भुकेल्याला देऊ शकतो असं मला वाटतं.

**शिवेंद्र : तुम्ही हे कार्य करता तर हे करताना तुम्ही कोणत्या राजकीय नेत्याची मदत का घेत नाही ?**

चाचर : नाही, कारण मला कोणत्याही राजकीय नेत्यावर विश्वास नाही. त्यामुळे स्वबळावर मला जमेल तशी गरजूंना मदत करण्याचा पुरेपूर प्रयत्न मी करतो.

**अथर्व : कोरोनासारखा भयंकर आजार आला तेव्हाही तुमचे कार्य चालू होते कां ?**

चाचर : हो, आम्ही घरी राहूनही इतरांना जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न करत होतो. त्या काळात जे रुग्ण होते त्यांचीही मी जमेल तशी सेवा केली आहे.

**अथर्व : आजच्या तरुण पिढीसाठी तुम्ही कोणता संदेश द्याल ?**

चाचर : सर्वात महत्त्वाचे म्हणजे सध्या तरुण पिढीने व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे आणि त्यांचे आरोग्य जपले पाहिजे.

**शिवेंद्र : सर, शेवटचा प्रश्न तुमचे आदर्श कोण आहेत ?**

चाचर : छत्रपती शिवाजी महाराज व माझे वडील हेच माझे आदर्श आहेत.

**अथर्व : धन्यवाद सर ! तुमच्याकडून आम्हाला खूप माहिती मिळाली.**

■ ■ ■ ■



# सुंदरता जीवनाची

दिपाली भानुदास नलवडे
बी.कॉम.-२



जीवन जणू एक सुंदर गाणं
गोडीने भरलेलं आहे ठाणं
सप्तरंगानी सजलेली दृष्टी,
आशांनी भरलेली हृदयाची.

कष्ट आणि संघर्ष घडवितात
दुःखातून शिकण्याची कला गढवितात
प्रेमाने उभे राहणे, एकमेकांच्यासह
समाजात आपुलकीतून ओतणे जलं

शांततेचं आकाश, उंचचं ध्येय
आशेची रेखा घेऊन
स्वप्ने साकार होतात कर्मानेच
तरचं जीवन होईल आदर्श आणि सच्चं.

प्रवासवर्णन



# प्रतापगड-महाबळेश्वरचा माझा प्रवास

प्रियांका महापुरे, बी.ए.-३ (मराठी)

प्रवास तर आपण अनेक ठिकाणी करीत असतो. पण काही प्रवास हे आपल्यासाठी अविस्मरणीय प्रवास असतात. तसाच माझ्या हृदयात बसलेला अविस्मरणीय प्रवास हा प्रतापगड व महाबळेश्वर हा आहे.

मी बी.ए. भाग दोनला होते. तेव्हा आमचे नेहमीप्रमाणे प्रत्येकाचे तास सुरू होते. तेव्हा आमच्या हिंदीच्या सरांनी कॉलेज सहलीविषयी आमच्याशी चर्चा केली, की ज्यांना सहलीला यायचं आहे त्यांनी यादीमध्ये आपले नाव नोंदवावे व लवकरात लवकर पैसे जमा करावे. आमच्या सहलीची फी ८०० रु. होती. मग आमच्या वर्गातील सर्व मुलामुलींनी सहलीला जायचं ठरवले. आमची सहल ही पाच ठिकाणी जाणार होती. वाई, पाचगणी, भिलार, प्रतापगड व महाबळेश्वर. मी तर खूपच उत्साहित होते व माझ्यासोबत माझ्या सर्व मित्र-मैत्रिणीसुध्दा खूप उत्साही व आनंदी होत्या. आम्ही सरांकडे पैसे जमा केले. आमची सहल निघायचे ठरले. मी तर खूपच खूश होते. मला एकदाची कधी सहलीला जातेय असे झाले होते. जेवताना जेवणावर सुध्दा मन लागत नव्हते. मनात खूपच उत्सुकता होती व उठताना, बसताना व अगदी लेक्चर मध्येसुध्दा माझे मन लागत नव्हते. सतत मनात सहलीचा विचार येत होता. सहलीला असं आवरायचं, खूप मज्जा करायची असं मनात ठरवून ठेवले होते. एकदाचा तो दिवस आला.

एरवी तर मी लवकर उठत नाही पण त्यादिवशी आम्हाला ठीक ७.३० ला कॉलेजमध्ये पोहोचायचे होते त्यामुळे मी लवकर उठून पप्पांसोबत कॉलेजमध्ये गेले. आम्ही सर्वजण ट्रॅव्हल्समध्ये बसलो व तिथून आमच्या प्रवासाला सुरूवात झाली. आम्ही सर्व मिळून ३० विद्यार्थी व दोन सर आणि एक मॅडम होत्या. मला खिडकीच्या बाजूला बसायला खूप आवडते. त्यामुळे मी ट्रॅव्हल्समध्ये खिडकीच्या बाजूला बसले होते. माझे काही मित्र-मैत्रिणी प्रवास करीत-करीत ट्रॅव्हल्समध्ये नृत्यही करीत होते व

*मला प्रतापगडावरील निसर्ग खूप आवडला. तो निसर्ग पाहून व गड पाहून तिथून येऊ वाटत नव्हते. एवढे माझे मन तिथे रमले होते. घनदाट पसरलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि यामध्ये असणारे संपूर्ण जंगल व दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला हा प्रदेश पाहून माझे मन प्रसन्न झाले. तेथे गेल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला.*

काहीजण त्यांचा व्हिडीओ करीत होते. त्या आठवणी मोबाईलमध्ये साठवून ठेवत होते. आम्ही सर्वात आधी वाई या गावी गेलो व तिथून भिलार या गावी गेलो. भिलार हे गाव पुस्तकाचे गाव म्हणून खूप प्रसिध्द आहे. भिलार हे भारतातील पहिले ''पुस्तकांचे गाव'' बनले आहे. ३५,००० हून अधिक पुस्तके विनामूल्य वाचण्यासाठी उपलब्ध आहेत. ही पुस्तके घरे, शाळा आणि मंदिरे अशा ३५ ठिकाणी उपलब्ध आहेत. आम्ही भिलार या गावातील ग्रंथालयामध्ये गेलो व तेथे आम्हाला अशा अनेक प्रकारची माहिती मिळाली. भिलारमध्ये नाटक सादरीकरण, पुस्तक प्रकाशन, संगीत कार्यक्रम, कार्यशाळा इत्यादींसह अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. मला तर ग्रंथालयामधून बाहेरच येऊ वाटत नव्हते. पण आम्ही खूपच वेळ तिथे होतो. ग्रंथालयांच्या सरांशी आम्ही खूप छान पद्धतीने संवाद साधला व नंतर आम्ही एक चांगली जागा शोधून जेवायला बसलो. सगळ्यांनी मोठा गोल करून आम्ही जेवायला बसलो व नंतर जेवून आम्ही तिथे काही ग्रुपने फोटो काढले व पुन्हा आमच्या प्रवासाची सुरूवात झाली ती प्रतापगडाकडे जायला, मी खूप

आतूर होते प्रतापगड पहायला. ट्रॅव्हल्समध्ये आम्ही गाण्याच्या भेंड्या खेळत प्रवास करीत होतो. त्यामध्ये आमचे शिक्षकही सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत खेळायला एक वेगळीच मज्जा आली होती. मी खिडकीच्या बाजूला बसून निसर्गाचा आनंद घेत होते. निसर्गाची विविध रूपे डोळ्यात साठवून घेत होते. मला खिडकीच्या बाजूला बसून निसर्गाचा आनंद घ्यायला खूप आवडते. मी तेव्हा प्रतापगडावर पहिल्यांदाच निघाले होते. मी गाणं म्हटले तेव्हा सरांनी मला शाबासकी दिली व त्यांना माझा आवाज खूप आवडला. तेव्हा मी पहिल्यांदाच कुटुंब सोडून एकटी फिरायला गेले होते, तेही कॉलेजच्या सहलीमधून त्यामुळे मी खूप आनंदी होते.

हळूहळू प्रवास करीत आम्ही प्रतापगडावर पोहोचलो. आम्ही सर्वजण प्रतापगडावर निघालो. आम्ही प्रवास करून आधीच थकलो होतो. पण तरीही प्रतापगड चढले. प्रतापगड हा गिरीदुर्ग प्रकारचा किल्ला असून त्याची उंची ही साधारणत: १०८० मीटर आहे. आम्ही किल्ल्यावर असलेले भवानी मातेचे मंदिर पाहिले व तिथे अफझलखानाची समाधी आहे ती सुध्दा पाहिली. तिथून वर प्रतापगडाच्या पायऱ्या ह्या ४५० आहेत. आम्ही वर चढलो तेव्हा समोर दिसला तो म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा १७ फूट उंच अ३सलेला पुतळा. तिथे जाऊन आम्ही सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला नमस्कार केला. त्यांच्या पुतळ्यासमोर फोटो काढले व आमच्या ग्रुपचा सुध्दा फोटो काढला. मला प्रतापगडावरील निसर्ग खूप आवडला. तो निसर्ग पाहून तिथून येऊ वाटत नव्हते. एवढे माझे मन तिथे रमले होते. घनदाट पसरलेल्या सह्याद्रीच्या डोंगररांगा आणि यामध्ये असणारे संपूर्ण जंगल व दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला हा जावळीचा प्रदेश पाहून माझे मन प्रसन्न झाले. तेथे गेल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा केलेला वध हे सगळं डोळ्यासमोर उभं रहायला लागलं. १० नोव्हेंबर १६६९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आणि विजापूर सुलतानचा सेनापती अफझलखान यांच्यात झालेली प्रतापगडावरची लढाई आठवू लागले. तेव्हा डोळ्यासमोर दिसू लागले असे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी केलेले चांगले कर्तृत्व डोळ्यासमोर यायला लागले. संपूर्ण फिरलो व फिरत-फिरत आम्हाला ६.०० वाजले व सर्वजण खाली उतरायला लागलो. मी व माझी मैत्रिण देखील पायऱ्या उतरून खाली यायला लागलो. पण तेवढ्यात मला आठवले की मला दादासाठी गॉगल घ्यायचा आहे. आम्ही गॉगल घ्यायला एका दुकानामध्ये थांबलो पण तेवढ्यात सर्वजण आम्हाला सोडून पुढे गेले. आम्हाला वाटले की ते सुध्दा मागे आहेत आणि त्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझ्या मैत्रिणीला चष्मा लागलाय. त्यामुळे तिला रात्रीचे चालताना पायऱ्या दिसत नव्हत्या. त्यामुळे आम्ही दोघी घाबरलो होतो. आम्हाला वाटले की, बाकी सर्वजण आम्ही खाली उतरेपर्यंत आम्हाला सोडून जातील. पण मी माझ्या मैत्रिणीचा हात पकडून तिला माझ्यासोबत घेऊन चालू लागले. मी जरा पुढे जाऊन पाहिले तर माझ्या काही मैत्रिणी मला दिसल्या. तेव्हा कुठे मनाला थोडी शांती मिळाली व पुन्हा माझ्या मैत्रिणीला घेऊन त्यांच्यापर्यंत पोहोचले. आमच्या दोघींच्याही मनातील भीती दूर झाली. मग आम्ही ट्रॅव्हल्समध्ये बसून महाबळेश्वर बघायला निघालो. अशा प्रकारे मी ट्रॅव्हल्समध्ये रात्रीच्या निसर्गाचा आनंद घेतला व मला माझ्या कुटुंबातील सदस्यांची आठवण येऊ लागली. त्यांना मी खूप आठवत होते. ते माझ्यासोबत नव्हते. म्हणून मन थोडं उदास झालं होतं. पण मैत्रिणींमुळे छान वाटत होतं.



महाबळेश्वर म्हंटले की, थंडी आलीच. आजपर्यंत ऐकले होते की, महाबळेश्वरमध्ये थंडी खूप असते, पण त्या दिवशी अनुभवली. आम्ही साधारण ८.३० पर्यंत महाबळेश्वरमध्ये पोहोचलो. आम्ही सर्वजण ग्रुप करून काही सामान खरेदी करायला गेलो. माझ्या सोबत माझ्या चार मैत्रिणी होत्या. आम्ही महाबळेश्वरमधील प्रसिध्द स्ट्रॉबेरी घ्यायला निघालो होतो. तेवढ्यात आम्हाला एक स्टुडिओ दिसला. तो दुसरा कोणता नसून सिंगिंगचा होता. आमच्या ग्रुपमधील दोन मुली तेथे गाणी म्हणायला गेल्या व त्यातील एक जण गाणं गात होती. मला देखील गायला खूप आवडते आणि म्हणून मी पण तेथे गेले व त्यांना म्हणले की मला देखील गाणं गायचं आहे व त्यांनी मला गाणं गायला दिले. मी तेव्हा खूप खूश होते की, मला माझ्यातील टॅलेंट दाखवायला संधी मिळतेय. मी एक सुंदरसं गाणं म्हंटलं. माझ्या सर्व फ्रेंड्सना माझा आवाज व माझे गाणे खूप आवडले. मी गाण गात असताना तेथील सर्वजण मलाच वर बघून पहात होते. तेव्हा मला खूप छान वाटले स्वत:बद्दल की मी गाऊ शकते. मी कोणतीही गोष्ट करू शकते. ज्यामध्ये मला टॅलेंट आहे. मी खाली उतरले आणि सर, मॅडम यांनी माझे कौतुक केले. खूप काही खरेदी करून आम्ही तेथून निघालो. आम्हा सर्वांना खूप भूक लागली होती म्हणून आम्ही ११.०० वाजता तिथेच आसपासच्या शिवबा हॉटेलमध्ये जाऊन जेवण केलं. नंतर घरी यायला सुरुवात केली.

संपूर्ण दिवस कसा मज्जा करण्यात, फिरण्यात गेला हे कळलंच नाही. मला घरी येऊच वाटत नव्हते. एवढा आनंद मला तेथे फिरण्यात आला होता. मी हा प्रवास कधीही विसरू शकणार नाही. नंतर आम्ही १.५०च्या दरम्यान रात्री कॉलेजमध्ये आलो व सर्वांनी आपापल्या पालकांना बोलावून घेतले व मगंच सरांनी प्रत्येकाला घरी सोडले. मज्जा तर खूपच आली. पण यातून एक गोष्ट मला कळली की कोणताही प्रवास करताना आपली व आपल्या सोबत असणाऱ्या व्यक्तीची काळजी घेणं खूपच महत्त्वाचे आहे. कोणतेही संकट आले तर आपली हिम्मत न हारता त्या संकटांना सामोरे जाता आले पाहिजे. असा हा माझा प्रवास जो मी कधीही विसरणार नाही. हा प्रवास माझ्यासाठी अविस्मरणीय प्रवास आहे.

■ ■ ■ ■

## आई

आई एक नाव असते, जगावेगळा भाव असते.....
आई एक जीवन असते, प्रेमळ मायेचे लक्षण असते......
आई एक खास असते, जिव्हाळ्याची रास असते.....
आई एक आठवण असते, प्रेमाची साठवण असते.....
आई एक वाट असते,
आयुष्यातील सर्वात पहिली गाठ असते.....
आई एक गोड नाते असते,
बहरणाऱ्या जीवनाचे हिरवे पाते असते.....
आई एक घर असते, वात्सल्याची सर असते....
आई ह्दयाची हाक असते, निःशब्द जाग असते....
आई एक क्षमतेची मूर्ती असते,
सतत सोबत राहून मार्ग दाखवत असते....
आई एक परोपकारी असते,
जी स्वतःसाठी न जगता
इतरांसाठी जगत असते.





**सचिन राजेंद्र संकपाळ**
**बी.कॉम.-१ (आय.टी.)**

## भेटतात अशी काही माणसे.....

भेटतात अशी काही माणसे
जी सतत जवळ असल्यासारखी वाटतात....

त्यांच्या गोड स्वभावाने
दुःखाचे क्षण नाहीसे होतात....

फुलांप्रमाणे जीवन असूनदेखील
काट्यांनाही आपलसं करतात......



आनंद अन् दुःख त्यांना रोजच अवगत असते
तरीही देखील इतरांना मात्र
चेहरा हसराच दाखवतात.....

खडतर वाटेतून स्वतः चालतात
मात्र खळाळणाऱ्या पाण्याप्रमाणे
इतरांना मार्ग दाखवतात.....



**सायली संतोष घाडगे**
**बी.एस्सी.-२ (वनस्पतीशास्त्र)**

वैचारिकलेख



# प्रवास आयुष्याचा

दिक्षा लालासो अडसुळे, बी.ए.-२

आपले आयुष्य म्हणजे एक प्रवास आहे आणि त्याचे आपण प्रवासी आहोत. जन्मापासून सुरू होऊन मृत्यूनंतर थांबणाऱ्या या प्रवासात आपल्याला विविध अडथळ्यांना तर सामोरे जावेच लागणार असते. यात सुख, दुःखाचे येणारे स्टेशन, आपण केलेल्या चुकांचे खड्डे तसेच आपल्या चांगल्या कृतीतून उद्भवणारी ही आयुष्याच्या वाटेवरची वळणे. या प्रवासात दोन प्रकारची लोकं तर नक्कीच बघायला भेटतात. एक म्हणजे जबाबदारीच ओझ घेऊन, स्वतःच कर्तव्य पार पाडत जीवन जगणारी लोक, दुसरे म्हणजे आयुष्याचा परिपूर्ण आनंद घेणारी लोक.

या आयुष्याच्या प्रवासात येऊन नक्की करायच तरी काय असतं ? शेवटचा स्टॉप कोणता असेल हे कोणालाच माहित नसतं. भूतकाळाच ओझ उरी बाळगून, भविष्याची चिंता डोक्यावर घेऊन फक्त कष्टच करायचं असतं का ? मग हे एक अर्थपूर्ण जीवन जगलो कसं म्हणता येईल ?

पाण्यासारखे निर्मळ मन ठेवून, अवकाशासारखे हृदय घेऊन सद्विवेकाने विचार करून एक शांतीपूर्ण आयुष्य जगता यायला हवं. आत्ताचा मनुष्य फक्त अपेक्षांच्या जोरावर जगताना दिसतो. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, दुःखाचे चढ-उतार येतच असतात. पण अतिविचाराने आपण त्याला संकटाच्या नजरेनं पाहत असतो. त्यातील आनंदाचा रस घेणं विसरूनच जातो. सकाळी उमललेल्या फुलाला माहित नसतं की त्याचं आयुष्य किती असणार. त्याला मंदिरात सजवणार की पायवाटे तुडवणार की असच संध्याकाळी ते कोमेजून जाणार, तरीही ते त्याच छोटसं आयुष्य बहरून जगत. उमलल्यापासून ते कोमेजून जाईपर्यंतच्या कालावधीत ते किती टवटवीत राहत. लोकांच्या दृष्टीला समाधानकारक वाटतं. सर्वांना आकर्षित करत. त्याचप्रकारे आपण मानवाने असे राहिले तर हा प्रवास सुखकारक नाही का होणार......

*पाण्यासारखे निर्मळ मन ठेवून, अवकाशासारखे हृदय घेऊन सद्विवेकाने विचार करून एक शांतीपूर्ण आयुष्य जगता यायला हवं. आत्ताचा मनुष्य फक्त अपेक्षांच्या जोरावर जगताना दिसतो. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख, दुःखाचे चढ-उतार येतच असतात. पण अतिविचाराने आपण त्याला संकटाच्या नजरेनं पाहत असतो. त्यातील आनंदाचा रस घेणं विसरूनच जातो.*

आपण एखाद्या गोष्टीचा एवढा विचार करतो की साधी सोपी गोष्ट ही आपल्याला कठीण वाटू लागते. डॉ.सेउस सेड समटाईम्स द कोशंन्स आर कॉम्प्लीकेटेड ॲण्ड द ॲन्सर आर सिंपल. मग का निरर्थक विचार करून आयुष्य असंच घालवत जायचं. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधता यायला हवा. जेव्हा आपण या सर्व गोष्टी करू तेव्हाच जीवन सार्थक होईल.

''आले आयुष्याच्या वाटेवर कितीही काटे,
तर हास्याने पार करत रहा.
दुःखात रडत न बसता,
स्वतःला सावरत जा.''

त्यांच्याच आयुष्यात संकटे येतात. जो संकटे सावरायला सक्षम असतो. आयुष्याच्या दोनच तर परिभाषा आहेत. एक आनंद, दुसरं दुःख, जेवढं सुख भेटेल तेवढं दुःख तर भेटणारच असतं. आनंदात जास्त हरपून जायचं नसतं. तसच दुःखातही जास्त दुःखी व्हायचं नसतं. आपल्या एकट्याचे आयुष्य मनमोकळेपणाने जगायचं असतं. हो, असतात काही लोकांच्या

आयुष्यात जबाबदारीची ओझी, त्यांना कर्तव्याची परतफेड करायची असते. त्यांना त्यांच्या कर्तव्यातून, जबाबदारीतून, सांभाळलेल्या नाती-गोत्यातून वेळच मिळत नाही. स्वतःला मग आयुष्य दुःखी वाटू लागते. सगळे सोबत तर असतात, पण मन मात्र एकटं भटकत असतं. मग नको ते विचार करत, डोक्याला ताण देत, एकांतात हरवतात अशी लोक. स्वतःला हरवून बसतात, विसरून जातात आणि मग असंच दुःखद आयुष्य जगतात.



जीवनाचे रहस्य, विचारांच्या सागरातून खूप दूर असतो आपण. एक छोटसं डबक बनून जगत असतो. एकदा का जर विचारांचे मणी बुद्धीत गुंतवत गेलो की मग एक छानशी माळ तयार होऊन आयुष्याला आकर्षक, उज्वल रूप देईल. आपल्या सुख-दुःखाचे कारण म्हणजे आपले विचार असतात. नकारात्मक विचाराने स्वतःच स्वतःची हानी करून दुःखी होऊन बसतो. सकारात्मक विचार आत्मसात केले की मग दूर-दूर पर्यंत कधी दुःख बघायला भेटणार नाही. ज्याला विचारांच्या सागराचे महत्त्व समजले तो त्या छोट्याशा डबक्यातून नदीत परिवर्तित होईल आणि मग वाटेत कितीपण अडथळे आले तरी मार्ग काढून सागराला जावून मिळेल. म्हणजेच काय तर सकारात्मक विचार ध्यानी-मनी पेरत गेलो तर, दुःखात पण सुख, अयोग्य गोष्टीत योग्यता, नकारात्मकतेत सकारात्मकता मिळवू शकतो आपण.

ती गोष्ट माहितच असेल, पांढऱ्या फळ्यावर एक छोटा काळा टिंब देवून शिक्षकाने मुलांना विचारले तुम्हाला काय दिसतंय ? जास्त मुलांनी उत्तर दिले की, काळा टिंब दिसतोय. आता पांढरा फळा म्हणजे सकारात्मकता आणि काळा टिंब म्हणजे नकारात्मकता. यातून असं जाणवतं की सकारात्मकतेची ऊर्जा जास्त असते; परंतु आपल्या दृष्टीला प्रथम नकारात्मकताच दिसते. आजच्या मानवाची अशीच परिस्थिती झाली आहे. नकारात्मकतेचा प्रभाव एवढा वाढवून घेतोय की त्याचा परत त्रास व्हायला लागेल.

आपण विश्वासाचे बीज मनात पेरून त्याला कष्टरूपी पाणी घालत गेलो की मग ते समाधानकारकरीत्या एक यशस्वीपूर्ण वृक्षात बहरेल. मग त्याला केलेल्या कष्टाची, आत्मविश्वासाची गोड फळे येतील. स्वतःचा स्वतःवर विश्वास असायला हवा. लोकं बोलतील म्हणून नाही, तर आपले विचार आपले अंतर्मन काय बोलतंय हे जाणून घ्यायला हवं. यशाची पायरी चढत असताना आपण बऱ्याचदा दुसऱ्यांच्या बोलण्यावर अवलंबून असतो. आपण स्वतः काहीच न करता दुसऱ्यांच ऐकून अडचणीत सापडतो आणि मग स्वतःला दोषी ठरवतो. स्वतःमध्ये कमतरता काढून, आत्मविश्वास कमी करतो. नंतर जगाच्या मागे-मागे चालतो. सद्बुद्धी आपल्यालाही आहे. स्वतःच्या सद्बुद्धीचा वापर करून चांगल्या, वाईट गोष्टींचा अनुभव घेतला पाहिजे. अनुभवांची ठोकरे खाल्ल्याशिवाय ही आयुष्यात परिवर्तन होत नाही. मनुष्य जन्मल्यापासून प्रत्येक दहा वर्षांनी त्याच्यात एक वेगळंच परिवर्तन होतं. शारीरिक बदल तर होतातच; परंतु त्याच्या विचारात, मानसिकतेत जो बदल घडतो त्यातून तो एक नवीन रूप प्रदर्शित करतो. दहा वर्षांपूर्वी आपण कसं होतो आणि आत्ता वर्तमानात कसं आहोत. एकदा विचार करून बघा. वैचारिकतेमुळे, अनुभवांमुळे आपल्यात परिवर्तन दिसून येत असतं.

आपण रोज नवनवीन लोकांना भेटतो. त्यांचा आचार, विचार, स्वभाव जाणवत असतो. काहींचा स्वभाव आपल्याला भावूक करतो. तर काहींचा विचित्र वाटतो. काही लोक चांगली तर काही वाईट वाटतात. एखाद्याचे शब्द मोहित करतात तर एखाद्याचे बोल कटू वाटतात. मग आपण त्यांची तुलना करत बसतो; परंतु हा विचार कधीच करत नाही की, त्यांच्या आयुष्यात पण असेच काही प्रसंग घडले असावेत. त्यामुळे आत्ता ते असे आहेत. कोणताच मनुष्य चांगला किंवा वाईट नसतो. प्रसंगानुसार त्यांचा स्वभाव बदललेला असतो.

जन्माची पहिली ट्रेन पकडल्यापासून मृत्युची शेवटची ट्रेन पकडेपर्यंत या गोष्टी घडत असतात. त्यामुळे समंजसपणाने, संयमाने, शांततेने आणि नियमाने या आयुष्याचा प्रवास करायचा असतो.

■ ■ ■

ललित



# निसर्ग - एक कलावंत

**कविता कृष्णत माळी, बी.ए.-२**

''वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे'' हे तुकारामांचे वचन निसर्गाशी मैत्रीचा संबंध दर्शविते. खरे तर निसर्ग हा आपला मित्र, गुरूसुद्धा आहे. कलावंत जसे लहरी असतात. तसेच निसर्गसुद्धा लहरी आहे. क्षणात प्रकाश, क्षणात अंधार, फुला-फळांमधील रंग, रूप, गंध यातील विविधता पक्षी आणि प्राणी यांचा किलबिलाट ! शिवाय मनुष्यांचे जगणेदेखील निसर्गावरच अवलंबून असते. म्हणून निसर्ग एक कलावंत आहे.

''हिरवे हिरवे गाल-गालिचे,
हरित तृणाच्या मखमालिचे''

निसर्गरम्य वातावरणातच मनुष्य कवी, लेखक, शास्त्रज्ञ होऊ शकले. निसर्गात मन व बुद्धी फुलून जाते. पुरातन काळात जसे ऋषींनी निसर्गात वेदऋचांचे काव्य लिहिले, तसे आज माणूस काव्य तयार करू लागला. माणूस हा निसर्गाचे अपत्य आहे. या निसर्गाचे मानवावर केवढे उपकार आहेत ! तो त्याची भूक भागवतो. मंद व मधूर वायूलहरींनी त्याचा श्रमपरिहार करतो. सुगंधित फुलांनी त्यांचे जीवन उल्हासित व आनंददायी करतो. निवाऱ्यासाठी लाकूड, खाण्यासाठी फळे, भाज्या, वस्त्रासाठी कापूस, अन्न शिजवण्यासाठी सरपण देतो. या जिवलग मित्राच्या अशा पदोपदी होणाऱ्या मदतीवाचून मानवाला जीवन जगताच येणार नाही. कधी कधी निसर्ग म्हणतो -

''घे कुऱ्हाड, कर उगार,
घाव आता घाली.''



निसर्ग हा साध्या गोष्टीतसुद्धा सौंदर्य शोधतो. निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीत सौंदर्य लपलेले आहे.

*निसर्गसुद्धा लहरी आहे. क्षणात प्रकाश, क्षणात अंधार, फुला-फळांमधील रंग, रूप, गंध यातील विविधता, पक्षी आणि प्राणी यांचा किलबिलाट शिवाय मनुष्याचे जगणेदेखील निसर्गावरच अवलंबून असते. म्हणून निसर्ग एक कलावंतच आहे.*

दारिद्र्याची लेवून वसने, कशी पाहावी सुंदर स्वप्ने ?
महागाईचा राक्षस करतो, आयुष्याची उजाड राने.....।

या सर्व समस्यांचे गाठोडे एकविसाव्या शतकातील पिढीकडे संक्रमित होत आहे, परंतु हे संक्रमण येथेच **थांबवण्याची गरज** आहे. तरच पुढची पिढी **सुखासमा**धानात जगू शकेल.

भ्रष्टाचार, जातीवाद, भाषावाद, धर्मवाद, प्रांतवाद व दहशतवाद हा भारताच्या विविधतेतील एक कलंक आहे. हा कलंक पुसून वैज्ञानिक प्रगतीसह नवनवीन तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. त्यामुळे जग जवळ आले आहे. परंतु जवळ आलेले जग मनाने दूर जाऊ लागले आहे. तरीदेखील संगणक क्षेत्रात झालेली प्रगती, खगोलशास्त्र,

भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र तसेच वनस्पतीशास्त्र या सर्व शास्त्रात झालेले बदल जाणून त्यात भर घालायची आहे. मात्र हे सर्व करताना संस्कृती, संस्कार न विसरता वाटचाल करायची आहे. शांतता, प्रेम वाढीस लागण्यासाठी लोभ, मोह, दूर करून प्रत्येकाला प्रेमाने जिंकण्याचा संकल्प केला पाहिजे. काही जुन्याचे रक्षण करून 'जुने ते सोने' म्हणून त्याची जपणूक करायची आहे तर, काही -

जुने जाऊद्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरूनि टाका,
सडत न एका ठायी ठाका ।

असे म्हणून त्या जुन्याचा नाश करायचा आहे. अशा रीतीने जुन्या-नव्यांचा मेळ घालून सामंजस्याने, सामोरे जाणे योग्य ठरेल.

■ ■



## नशीब.....

जीवन हा एक प्रवास आहे
चालत राहणे आपले कर्तव्य आहे.
काय आपणास मिळेल पुढे,
हा तर नशिबाचा भाग आहे.

कधी आनंद तर कधी दुःख
हा ऊन सावलीचा खेळ आहे.
आंबट गोड नात्यांची इथे
एक चविष्ट भेळ आहे.

आयुष्य खूप सुंदर आहे.
जगता येणे महत्त्वाचे आहे.
अडचणी सर्वांनाच आहेत.
मात करणं महत्त्वाचे आहे.

आयुष्यास नको निराश होऊ
खरचं इतकं ते कठीण नाही.
हे दिवसही बदलून जातील
स्थिर जगात असे काहीच नाही.

जीवन हा एक प्रवास आहे
नशीब हा त्याचा एक भाग आहे.



**प्राजक्ता संजय रासकर**
बी.कॉम.-१ (आय.टी.)



## शिवाजी महाराज



शिवाजी महाराज होते खूप शूर,
त्यांची ख्याती पसरली खूप दूर
त्यांनी कोणापुढे झुकवली नाही मान,
त्यांना नव्हती कशाची वाण.

शिकवण लाभली तुम्हाला जिजाऊंची
रयतेला गरज होती तुमची
संकटांपुढे हार मानली नाही तुम्ही,
तुमची ही शिकवण चालवू पुढे आम्ही.

तुमच्यापुढे होते खूप मोठे युद्ध,
ते पाहून हरपली आमची शुद्ध
स्त्रियांचा आदर करा शिकवून गेलात आम्हाला,
परत भेटता येईल का तुम्हाला

चालवला तुम्ही स्वराज्याचा कारभार,
त्यावेळी स्वराज्याचे होते तुम्ही सरकार
तुमच्यासोबत लढायला आला होता खान,
त्याची तुमच्यापुढेच झुकली मान.

**वैष्णवी विकास डोंगरे**
बी.कॉम.-१ (आय.टी.)

व्यक्तीचित्रण



# मानवतावादी उद्योजक : रतन टाटा

**साक्षी संतोष होवाळ, बी.ए.-३ (अर्थशास्त्र)**

रतन टाटा यांनी आयुष्यात माणसे आणि संस्था जोडल्या आहेत. त्या त्यांच्या नैतिकतेवर आधारित व्यावसायिक नीतीमुळेच शक्य झाले आहे. व्यवसाय कौशल्य, दिलेला शब्द पाळण्याची वृत्ती, अचूकतेचा आग्रह आणि मूख्य म्हणजे व्यवसाय वृद्धीचा ध्यास, या सर्व गोष्टींमुळे हाती घेतलेल्या कामाचं सोनं करत होते. तेही कुठलेही गैरव्यवहार न करता त्यांना सहज जमले आहे. त्यातूनच ते एक 'परफेक्शनिस्ट' हे विशेषण सहजपणे लावता येईल असे व्यावसायिक बनले. एक बलाढ्य उद्योगपती म्हणून नावारूपाला आले.

जे काम करायचे ते निर्दोष, उत्कृष्ट आणि परिपूर्ण असायलाच हवं. या बाबतीत ते विशेष आग्रही राहिले आणि त्यातूनच ते घडले. देशाला ज्यांचा अभिमान वाटावा असे उद्योजक होते. फक्त व्यावसायिक वर्तुळातच नव्हे, तर या वर्तुळाबाहेरच्या लोकांसाठीही एक आदर्श, दानशूर, अनुकरणीय आणि पारदर्शक अशी व्यक्ती ठरले. नैतिकतेचा नैतिकदृष्ट्या अचूक असणाऱ्या नेतृत्वाचा आणि नैतिकतेचा स्वतःच्या संपूर्ण कारकिर्दीत सातत्याने वापर करण्याच्या त्यांच्या आग्रहाचा प्रत्यय रतन टाटा यांच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक आयुष्यातून भारतीय जनतेला अनुभव आला आहे.

रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर, १९३७ रोजी मुंबई येथे झाला. ते नवल टाटा यांचे पुत्र आहेत. नवल टाटा यांचा जन्म सुरत येथे झाला आणि नंतर टाटा कुटुंबात दत्तक घेतले गेले. टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या भाची सूनी टाटा या त्यांच्या आई होत्या. टाटांचे आजोबा होर्मुसजी टाटा हे रक्ताने टाटा कुटुंबाचे सदस्य होते. १९४८ मध्ये टाटा १० वर्षाचे असताना त्यांचे आई-वडिल विभक्त झाले आणि त्यानंतर त्यांचे संगोपन होर्मुसजी टाटा त्यांचे आजोबा यांनी केले. रतनजी टाटा यांच्या आजी आणि नवजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले.

> *जे काम करयचे ते निर्दोष, उत्कृष्ट आणि परिपूर्ण असायलाच हवं. या बाबतीत ते विशेष आग्रही राहिले आणि त्यातूनच ते घडले. देशाला ज्याचा अभिमान वाटावा असे उद्योजक होते. फक्त व्यावसायिक वर्तुळातच नव्हे, तर या वर्तुळाबाहेरच्या लोकांसाठीही एक आदर्श, दानशूर, अनुकरणीय आणि पारदर्शक अशी व्यक्ती ठरले.*

मुंबईच्या कॅम्पियन स्कूलमध्ये त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, शिमला येथील विशेष कॉटन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्यांनी १९५५ मध्ये न्यूयॉर्क येथील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतल्यानंतर टाटा यांनी कॉर्नल विद्यापीठात प्रवेश घेतला. त्यांनी १९५५ साली वास्तुशास्त्रामध्ये पदवी प्राप्त केली. १९७५ मध्ये हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या सात आठवड्याच्या प्रगत व्यवस्थापन कार्यक्रमात भाग घेतला. कॅर्निलमध्ये असताना टाटा अल्फा सिग्मा फी फ्रेटरनिटीचे सदस्य बनले.

रतन टाटा यांचे उद्योगातील योगदान फार मोठे आहे. रतन टाटा हे भारतीय उद्योगपती असून त्यांच्या नेतृत्वात टाटा समूहाने जागतिक स्तरावर मोठे यश मिळवले आहे. रतन टाटांच्या नेतृत्वात टाटा समूहाचे ग्लोबलाइझेशन झाले. ज्यामध्ये ऑटोमोबाईल्स, आयटी ऊर्जा, स्टील, रिटेल आणि इतर उद्योगांचा समावेश आहे. रतन टाटांच्या नेतृत्वाखाली गरीब आणि मध्यमवर्गीय भारतीय कुटुंबासाठी परवडणारी चारचाकी टाटा



नॅनो कार ची निर्मिती केली. टाटा समूहाने जागतिक ब्रँड्स जसे की टेटली, जॅग्वार, लँडरोव्हर आणि कोरसार स्टील यांचे अधिग्रहन केले.

रतन टाटा यांनी १९९१ साली टाटा समूहाचे अध्यक्षपद स्वीकारले. त्यांनी जुना आणि परंपरागत व्यवसाय बंद करून नवीन व्यवसाय व तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक केली. त्यांनी टाटा समूहाला जागतिक स्तरावर पोहोचवले. रतन टाटांच्या नेतृत्वाखाली टी.सी.एस. ही एक प्रमुख सॉफ्टवेअर सेवा कंपनी झाली. त्यांनी हरित ऊर्जा आणि सोलर प्रकल्पांवर भर दिला. सामाजिक जबाबदारी आणि परोपकार रतन टाटा यांच्या नेतृत्वाखाली टाटा इस्टसने शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, महिला सक्षमीकरण आणि विज्ञान संशोधन या क्षेत्रांमध्ये मोठे योगदान दिले.

रतन टाटांचे नेतृत्व हे प्रेरणादायी आहे. युवकांसाठी आदर्श होते. त्यांची विचारसरणी ही उच्च आणि उद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. टाटांचे कर्मचाऱ्यांसाठीचे नेतृत्व हे कणखर होते. टाटांना जगभरातील अनेक विद्यापीठांनी डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले. भारतीय उद्योग विश्वात यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवले आहेत.

रतन टाटा हे केवळ यशस्वी उद्योगपती नव्हते तर सामाजिक बांधिलकी जपणारे एक दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी अनेक प्रकारच्या सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. त्यांनी टाटा ट्रस्टद्वारे गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शैक्षणिक सुविधा आणि जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून दिले. ग्रामीण आणि दुर्गम भागामध्ये रूग्णालये, वैद्यकिय उपकरणे आणि मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

टाटा समूहाच्या माध्यमातून आरोग्यसेवा देण्यासाठी मुंबई येथे टाटा मेमोरिअल हॉस्पिटल उभारण्यात आले. हे कर्करोग रूग्णांसाठी भारतातील एक अग्रगण्य ठरले. टाटा यांनी गरीब रूग्णांना अत्याधुनिक मोफत उपचार कोव्हीड १९ च्या काळात पाचशे कोटींची मदत जाहीर केली. एच.आय.व्ही. जनजागृती मोहिमा राबविल्या. गर्भवती महिलांसाठी पोषण आहार कार्यक्रम आणि आरोग्यसेवा उपलब्ध केली.

रतन टाटा हे प्राणीप्रेमी आहेत. त्यांनी प्राण्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविले. बेघर प्राण्यांसाठी आणि भटक्या कुत्र्यांसाठी सुरक्षित, आश्रयस्थान उभारण्यासाठी निधी पुरवला. अन्न आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या. टाटा ट्रस्टने प्राण्यांच्या संरक्षणासाठी Dogspot.in या प्राणीप्रेमींना जोडणाऱ्या व्यासपीठात टाटा यांनी गुंतवणूक केली. दुर्मिळ प्रजातींच्या संरक्षणासाठी आर्थिक मदत केली. रतन टाटा यांची प्राणी विषयांची सहानुभूती आणि त्यांचा सक्रिय सहभाग प्राणीप्रेमींसाठी प्रेरणादायी आहे.

देशाचे प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांनी वयाच्या ८६ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला. रतन टाटा यांनी बुधवारी ९ ऑक्टोबर, २०२४ रात्री ११ वाजण्याच्या सुमारास मुंबईतील ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये अखेरचा श्वास घेतला आणि भारतीय उद्योगजगताचा चेहरा हरपला.......

■ ■ ■ ■

अनुभवकथन

# अनुभव इंटर्नशिपचा नव्या शैक्षणिक धोरणांचा



तन्वी निवास शिंदे, बी.कॉम.-३ (बँक मॅनेजमेंट)

मी कु.तन्वी निवास शिंदे बी.कॉम. बँक मॅनेजमेंटची विद्यार्थिनी आहे. मी पाटण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शाखा कराड येथे एक महिना इंटर्नशिप पूर्ण केली आहे. मला इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज मधील बँक मॅनेजमेंट विभागातील सर्व शिक्षकांचे आभार मानते. तसेच पाटण अर्बन बँकेतील कर्मचाऱ्यांचेही आभार मानते.

बँक मॅनेजमेंटची विद्यार्थिनी व इंटर्नशिप करण्यापूर्वी एक ग्राहक म्हणून बँकेविषयी माझे मत खूप वेगळे होते. मला बँकेविषयी फारशी माहिती नव्हती. मला फक्त खाते खोलणे, मुदत ठेव, आवर्ती ठेव व कर्जावरील व्याजदर याच गोष्टी माहीत होत्या. पण बँक मॅनेजमेंटला प्रवेश घेतल्यानंतर मला बँक म्हणजे काय ? बँक कशी काम करते तसेच बँकेचे कामकाज दैनंदिन जीवनात कसे चालते या गोष्टी समजल्या व याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

इंटर्नशिपमुळे मला कामाचा अनुभव घेता आला आणि वास्तविक जीवनातील कामकाजाच्या परिस्थितीत व्यावहारिक जीवनातील कामकाजाच्या परिस्थितीत व्यावहारिक ज्ञान मिळाले. इंटर्नशिपमुळे मला सर्व प्रकारची खाती समजली गेली. उदाहरण - चालू ठेव, लक्षधिश ठेव योजना, मंथली व्याज आकारणे इ. तसेच वेगवेगळ्या चलनाविषयी माहिती मिळाली. शाखेतील सहकाऱ्यांबरोबर काम करण्याचा अनुभव आला. आलेल्या ग्राहकांना वागणूक कशाप्रकारे द्यायची हेही शिकण्यास मिळाले.

बँकेकडून ग्राहकांना अत्याधुनिक काळात आवश्यक असलेल्या सुविधा उदाहरणार्थ - एटीएम, मोबाईल बँकिंग, फोन पे, गुगल पे, आर.टी.जी.एस., एन.इ.एफ.टी. व डी.डी. इ. प्रकारच्या सुविधा देण्यात येतात. बँकेच्या विविध कर्जासंबंधी माहिती मिळाली. उदाहरणार्थ - सोनेतारण, ठेवतारण इ. तसेच कॅश क्रेडिट व बँकेचे व्याजदर कशाप्रकारे असतात याची ही माहिती मिळाली. अशा बँकेच्या विविध कामकाजांविषयी माहिती व प्रशिक्षण मला इंटर्नशिप कालावधीत बँक कर्मचाऱ्याकडून मिळाली. मला खूप काही शिकण्याची संधी मिळाली.

*इंटर्नशिप ही एक संधी आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रातील कामाची प्रात्यक्षिक जाणीव करून देते. ही संधी विद्यार्थ्यांना त्यांच्या करीअरच्या सुरूवातीला मिळते. ज्यामुळे ते आपल्या क्षेत्रातील कामाची सुरूवात करण्यासाठी तयार होतात.*

इंटर्नशिप ही एक संधी आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रातील कामाची प्रात्यक्षिक जाणीव करून देते. ही संधी विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या सुरूवातीला मिळते. ज्यामुळे ते आपल्या क्षेत्रातील कामाची सुरूवात करण्यासाठी तयार होतात. इंटर्नशिपमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी कसे व्यवहार करावे ? कसे काम करावे ? हे शिकायला मिळते. त्यांच्या कौशल्याची जाणीव त्यांना इंटर्नशिप कालावधीत होते आणि त्यांना त्यांच्या करिअरच्या सुरूवातीलाच योग्य मार्गदर्शन मिळते. त्यांना आपल्या क्षेत्रातील अनुभवी लोकांशी संपर्क साधता येतो आणि त्यांच्याकडून खूप काही शिकायलाही मिळते. इंटर्नशिप काळात विद्यार्थी व्यावसायिक जीवनाची आव्हाने समजून घेऊ शकतात आणि त्यासाठी ते तयार होतात. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर व्यावसायिक अनुभव इंटर्नशिपमुळे मिळतो.




**इंटर्नशिप काळाची गरज खालीलप्रमाणे :**

**व्यावसायिक अनुभव :**

इंटर्नशिप काळात विद्यार्थी व्यावसायिक जीवनाचा अनुभव मिळवू शकतात. हा अनुभव त्यांना भविष्यातील कारकिर्दीसाठी मदतीला येतो.

**कौशल्य विकास :**

इंटर्नशिप काळात विद्यार्थी विविध कौशल्ये विकसित करू शकतात. जसे की संवाद कौशल्य, संघटन कौशल्य आणि समस्या समाधान कौशल्य.

**व्यावसायिक ज्ञान :**

इंटर्नशिप काळात विद्यार्थी व्यावसायिक ज्ञान मिळवू शकतात. हे ज्ञान त्यांना पूर्ण आयुष्यात खूप महत्त्वाचे ठरते.

**नेटवर्किंग :**

इंटर्नशिप काळात विद्यार्थी व्यावसायिक नेटवर्क तयार करू शकतात. हे नेटवर्क त्यांना भविष्यातील कारकिर्दीसाठी मदतीला येते.

**आत्मविश्वास वाढ :**

इंटर्नशिप काळात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

■ ■ ■ ■

## मैत्री म्हणजे काय..... ?



**विनयराज विजय लोंढे**
बी.कॉम.-२ (आय.टी.)



मैत्री म्हणजे नात्यांच्याही पलीकडचं नातं
जे कोणाशीही, कुठेही, केव्हाही बनलं जातं.

मैत्री म्हणजे एक वेगळीच दुनिया असते
याला तोडणारे या जगात कोणीही नसते

मैत्री म्हणजे एक भारी, भक्कम विश्वास
या नात्यामध्ये काही तरी असतं खास

मैत्री म्हणजे एक वेगळेच प्रेम असते
याला कमी करणारे या जगात कोणीही नसते

मैत्री म्हणजे एक मोठं असं आकाश
त्यामध्ये असतो फक्त विश्वासाचा प्रकाश

वैचारिक



# सोशल मिडिया - व्यसनमुक्तीची गरज

रश्मी देशमाने, बी.कॉम.-२ (आय.टी.)

*आपल्याला अपेक्षित ज्ञान मिळविण्यासाठी अथवा प्रचार-प्रसारासाठी जाणिवपूर्वक आणि सजगतेने तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने करतानाही अनेक संस्था, शास्त्रज्ञ, विचारवंत तसेच कलावंत दिसतात. त्यातूनही आपण स्वतःसाठी खूप काही शिकू शकतो.*

भविष्यात मानव जातीला सर्वात मोठा संभाव्य धोका कुठला असू शकतो ? अणुयुद्ध ? जागतिक तापमानवाढ ? पाणी प्रश्न ? की अगदी परग्रहावरील जीवसृष्टीकडून होणारा हल्ला ? माझ्या मते, मानव जातीच्या मेंदूचा ताबा जगातील काही मोजक्या लोकांच्या हाती जात आहे. १९९० मध्ये संगणक शास्त्र टिम वर्नर्स-ली याने वर्ल्ड-वाइड-वेब चा शोध लावला. १९९५-२००० च्या काळात 'डॉट.कॉम' युग उदयास आले. तेव्हा इंटरनेटवरील अधिकतर माहिती एकतर्फी आणि स्थिर स्वरूपात होती. व्यवसायविषयक प्रबोधन व्हावे, एवढाच त्यामागचा हेतू होता. पुढे जसजसे तंत्रज्ञान प्रगत होत गेले, तसे इंटरनेटचे स्वरूप परस्परसंवादी होऊ लागले. स्थिर माहितीने गतिमान स्वरूप घेतले. माहितीचे आदान-प्रदान वाढू लागले, त्यामुळेच पुढे डेटाचे महत्त्वदेखील तंत्रज्ञान कंपन्यांच्या लक्षात आले. पैसा, मानव, संसाधन पायाभूत सुविधा यासोबत डेटादेखील एक संपत्ती आहे, हे कळून चुकल्याचा हा महत्त्वाचा क्षण होता.



आज सोशल मिडियावर आपल्या प्रत्येक हालचालीवर तंत्रज्ञानाची बारीक पाळत असते. आपण उठतो कधी, झोपतो कधी, कुठे जातो, कुणाशी बोलतो, काय बोलतो, आपल्या आवडीनिवडी, प्रतिक्रिया आपण कुठल्या कारणाने आनंदी होतो, व्यथित होतो, उल्हासित होतो अशी आपली आणि आपल्या एकंदरीत सवयी-स्वभाव व नातेसंबंधाची कुंडलीच सोशल मिडियावर नियंत्रण असणाऱ्यांकडे असते. आपला ऑनलाईन वापर, माहितीचे आदान-प्रदान, आर्थिक व्यवहार, सांस्कृतिक चालीरिती, आर्थिक स्तर, सामाजिक, राजकीय मते याचे सखोल आणि सूत्रबद्ध विश्लेषण केले जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा वापर प्रभावी करून आपल्याला काय हवं, नको ते ठरवलं आणि दाखवलं जाते. आपल्या वर्तणुकीचा अभ्यास करून कुठल्या गोष्टीस आपण कसे प्रतिसाद देऊ याचे अंदाज बांधले जातात. त्यानुसार आपल्यावर भावनिक व मानसिक प्रयोग केले जातात.

सोशल मिडिया डिलीट करणे, सोडणे हा काही यावरचा उपाय होऊ शकत नाही. 'वैयक्तिकीकरण' ही सामाजिक माध्यम विश्वात जमेची बाजू आहे. आपले सामाजिक वर्तन पाहूनच सामाजिक माध्यमे आपल्याविषयी शिकत असतात. त्यामुळे आपल्यासाठी तो उपयुक्त करणे, खरे तर खूप सोपे आहे. फेसबुक,

इंन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, ट्विटर डिलीट करण्याऐवजी आपण त्याचा उपभोक्ता या नात्याने प्रभावी वापर कसा करू शकतो ? आपल्यासाठी काय महत्त्वाचे आहे हे आपण निर्मात्यांच्या कसे लक्षात आणून देऊ शकतो ? आपण प्रभावित होण्याऐवजी सामाजिक माध्यम प्रणालीच कशी प्रभावित होईल ? हे पाहणं अधिक महत्त्वाचं आहे. आपल्याला अपेक्षित ज्ञान मिळवण्यासाठी अथवा प्रचार-प्रसारासाठी जाणीवपूर्वक आणि सजगतेने तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने करतानाही अनेक संस्था, शास्त्रज्ञ, विचारवंत तसेच कलावंत दिसतात. त्यातूनही आपण स्वतःसाठी खूप काही शिकू शकतो.

'स्वतंत्र विचार करण्याची क्षमता हे मानवाचे वैशिष्ट्य आहे ही क्षमताच जर मानव गमावून बसला तर ? त्या क्षमतेवरच नियोजनबद्ध पद्धतीने कुणी नियंत्रण मिळवू पाहत असतील तर ? लोकशाही आधारित जगातील दोनशेहून अधिक निवडणुकांमध्ये केंब्रिज ॲनॉलिटीका सहभागी होती. फेसबुकच्या कोट्यवधी वापरकर्त्यांच्या डेटाचा ॲनॅलिटीकाने कसा वापर केला, हे नजीकच्या काळात टप्प्याटप्प्याने उघड होईलच. परंतु सोशल मिडियाच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण अपेक्षित असताना उलट केंद्रिकरण होत असेल तर ? एकविसाव्या शतकातील मानव हा अभिव्यक्ती स्वातंत्र्य व माहिती तंत्रज्ञान युगाचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे डेटा सुरक्षेच्या उपाययोजना तर अपरिहार्य आहेतच ; परंतु त्यासोबतच सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून आभासी जगात व्यक्तिगत पातळीवर आपण किती व कसे सामाजिक व्हावे यावर वेळीच विचार होणे शहाणपणाचे नाही का ?

■ ■ ■ ■

## मज मराठीची गोडी.....

मज मराठीची गोडी
तिज जगी तोड नाही
तिजपरी रसाळतेची
बाकी कुणा तोड नाही

मज मराठीची गोडी
नसे तिजसम अमृत
मिसळता स्वर व्यंजने
तव निर्मिते पंचामृत

मज मराठीची गोडी
भासे दुधावरली सायी
भावते मला तशी ती
जसे बाळ समजे आई

मज मराठीची गोडी
काय सांगू तिचा थाट
देई जगण्याचा वसा
दावे पाखरांना वाट

मज मराठीची गोडी
तिने आजन्म वाचिले
होण्याजरा उतराई
साईने पंचक रचिल



**साईश्वरी लक्ष्मण पाटील**
बी.एस्सी.-३ (सुक्ष्मजीवशास्त्र)

## अश्रू

माणसांच्या भावनांशी अश्रू असतात जोडलेले,
मुक्याने भावना व्यक्त करत नकळत वाहिलेले
अत्यानंद झाल्यावर
आनंदाने वाहणारे
अन् दुःख झाल्यावर
जणू ते ओसंडून येणारे.



कधी कधी अश्रूंच्या कारणांचा लागेना ठाव
कधी पश्चाताप तर कधी दुःखाचे त्याला नाव
कधी अश्रूंनी हुंदक्यासोबत ओसंडून वहावं
अन् जळजळणारे डोळे मिटून शांतपणे निजावं.

अश्रू व्यक्त करतात मनातलं बरंच काही
गालावरती ओघळणारं आठवणींच पाणी
कधी रागाने, द्वेषाने अश्रू होतात जमा
थांबवावं म्हटलं तरी वाहतात पुन्हा

कधी अभिमानाने
डोळ्यात टचकन् पाणी दाटावं,
चमकणाऱ्या थेंबांनी अभिमानाने हसावं,
अश्रूंच्या वाहण्याने मन मोकळं व्हावं,
शब्दांपेक्षा अश्रूंनीच सारं काही सांगावं.



**मधुरा संभाजी माळी**
बी.सी.एस.-१



# शिवनेत्र बहिर्जी - पुस्तक परीक्षण

विवेक राजेश शिंदे, बी.कॉम.-३

शिवबाच्या खडतर वाटेवरले, पायहाड जे जहाले
एक जन्मी हजार रूपांचे, भाग्य तयांना लाभले ।।

वैराग्याचा शोक न केला, लालसा ना किर्तीची
रहस्य हेच जयांचे लौकिक, ऐसे ते शिवनेत्र बहिर्जी ।।

शिवछत्रपतींच्या स्वराज्य यज्ञात सहभागी झालेल्या अनेक ज्ञात, अज्ञात नरवीरांपैकी एक म्हणजे 'बहिर्जी नाईक'.' शिवरायांचे चित्रपट बघताना, त्यांचा इतिहास वाचताना 'बहिर्जी नाईक हे नाव आपण नेहमी ऐकतो, वाचतो. स्वराज्याचे गुप्तहेर प्रमुख - बहिर्जी नाईक. वेश पालटून शत्रूच्या गोटात जाताना, शत्रूची गुप्त माहिती काढताना आपण त्यांना पाहिले आहे. बहिर्जींचे कार्य अतिशय गुप्तपणे चाले. त्यामुळे त्यांच्या कार्याचे लिखित संदर्भ मिळणे अतिशय अवघड आहे. ते मोहिमा कशा आखत असतील, स्वराज्याचे हेर कसे पेरत असतील, संदेश कसे पोहोचवत असतील हे सगळं कल्पनाशक्तीद्वारेच समजून घ्यायला हवं. यासाठी मोठी प्रतिभासंपन्न व्यक्ती हवी. अशी प्रतिभासंपन्न व्यक्ती म्हणजे प्रेम धांडे.

नाविन्याचा सतत ध्यास असणारे लेखक प्रेम धांडे यांच्या अमोघ लेखन शैली, अफाट कल्पनाशक्ती आणि सखोल अभ्यासपूर्ण मांडणीची ओळख म्हणजे 'शिवनेत्र बहिर्जी' ! पुस्तकाच्या सुरूवातीलाच त्यांनी स्पष्ट केले आहे की, ही कथा इतिहासातील मूळ कथा आणि लोककथांवर आधारित असली तरी त्यातील प्रसंग हा लेखकाचा कल्पनाविस्तार आहे. लेखकाने ही कल्पनारम्यता अतिशय सुंदर शब्दात मांडली आहे. बहिर्जी नाईकांवरील कथामालिकेतील ही प्रथम कादंबरी आहे. ऐतिहासिक तपासणी आणि प्रेरणादायक कथांचा संग्रह असणारी बहिर्जी खंड १ कादंबरी ऐतिहासिक कादंबरीच्या प्रेमींसाठी एक अत्यंत वाचनानंद देणारा अनुभव ठरतो.

*लेखकाने ही कल्पनारम्यता अतिशय सुंदर शब्दात मांडली आहे. बहिर्जी नाईकांवरील कथामालिकेतील ही प्रथम कादंबरी आहे. ऐतिहासिक तपासणी आणि प्रेरणादायक कथांचा संग्रह असणारी 'बहिर्जी खंड १'ही कादंबरी ऐतिहासिक कादंबरीच्या प्रेमींसाठी एक अत्यंत वाचनानंद देणारा अनुभव ठरतो.*

कादंबरीची सुरूवात अत्यंत उत्कंठावर्धक प्रसंगाने होते तो प्रसंग असतो की, ज्यामध्ये बहिर्जी नाईकांचे अंतिम क्षण चित्रित करण्यात आले आहेत. हा प्रसंग अक्षरशः अंगावर रोमांच उभा करतो. या प्रसंगामध्ये बहिर्जींच्या डोळ्यासमोरून त्यांचे अखख आयुष्य जात असत. त्यांनी आखलेल्या मोहिमा, युद्धे, स्वराज्य, राजे सारं काही त्यांना आठवत असतं. हळूहळू हे सारे प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोर साकार होतात व इथूनच खऱ्या अर्थाने कादंबरीला सुरूवात होते.

कादंबरीच्या सुरूवातीला तरूण दौलतरावांची भेट तरुण शिवबांशी होते. जिजाऊ आणि शिवबा दौलतरावाच्या युद्धकौशल्याची पारख करतात आणि तो शिवबाचा सवंगडी होतो इथून कथेला सुरूवात होते. शिवबा दौलतरावातील सुप्त गुणांची परीक्षा घेऊन त्याला हेरगिरीच्या कार्यासाठी निवडतात. याकामी कान्होजी जेधे दौलतरावला गुप्तहेरांच्या कामात प्रशिक्षित करतात. कान्होजी जेधेंच्या मार्गदर्शनाखाली हेरगिरीच्या कार्यात पूर्णपणे प्रशिक्षित झाल्यानंतर मग शिवाजी महाराज दौलतरावाच्या प्रामुख्यासह स्वराज्याच्या गुप्तहेर पथकाची स्थापना करण्याची जबाबदारी दौलतरावास देतात व त्यास 'बहिर्जी' हे नाव देतात.



बहिर्जी पथकाच्या स्थापनेनंतर बहिर्जी मावळातल्या योग्य व्यक्तींना हेरतात. त्यांना स्वराज्य कामी वळवतात. त्यांना प्रशिक्षित करतात. काही वेळा प्रसंगोपात शूर व्यक्तींशी (त्यात स्त्रियासुद्धा आहेत) गाठ पडते. अशांनाही ते आपल्या पथकात समाविष्ट करतात. शौर्य, धैर्य, स्वराज्यावरील प्रेम, चतुराई, धिटाई, स्वार्थत्याग, भावनांवर नियंत्रण असे गुण ह्या हेरांमध्ये विकसित केले जातात. ह्या प्रसंगांचे अतिशय सुंदर वर्णन ह्या पुस्तकामध्ये केले आहे. हे हेर एखाद्या ठिकाणी कसे शिरत असतील, एखाद्या गावात कारागिर म्हणून, शिपाई म्हणून काम करत आपल्या मालकाचा विश्वास संपादन करून गोपनीय माहिती कशी गोळा करत असतील; सांकेतिक पद्धतीने निरोपांची देवाणघेवाण कशी करत असतील यांचे रोमांचक प्रसंग पुस्तकात आहेत.

पुस्तकातील हे प्रसंग वाचत असताना आपण त्यात गुंगून जातो. पुढे काय घडेल याची उत्सुकता लागून राहते. ऐतिहासिक संदर्भांनी परिपूर्ण असलेली ही कादंबरी रहस्य, पटकथा असलेला चित्रपटच वाटते. हेर असो वा छत्रपती शिवाजी महाराज; सगळे शेवटी भावना असणाऱ्या व्यक्तीच. पण स्वराज्याच्या कामासाठी मनावर दगड ठेवून, आपल्या भावनांना मुरड घालत त्यांना काम कराव लागतं. ते करताना त्यांच्या मनाचा कसा कोंडमारा होत असेल याबद्दलचे प्रत्यकारी प्रसंग आणि संवाद पुस्तकात आहेत.

लेखकाची भाषा सरस असली तरी त्यांनी ऐतिहासिक घटनांना साहित्यिक रंग देण्याचा प्रयत्न केला आहे. कथानकतातील प्रत्येक पात्र यामुळे जिवंत वाटते. विशेषतः बहिर्जी नाईक यांच्या व्यक्तिरेखेची उभारणी अतिशय प्रभावी आहे. परंतु क्वचित ठिकाणी कथानक वेगाने पुढे सरकतांना दिसते. की ज्यामुळे काही पात्रांच्या विकासाला पुरेशी जागा मिळत नाही. ही त्रुटी सोडता कादंबरी उत्तम आहे. ही कादंबरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची एक चांगली समज देण्यास मदत करते.

शिवकालीन इतिहासाची झलक देणारी ‘शिवनेत्र बहिर्जी’ ही एक अद्वितीय कादंबरी आहे. इतिहास व मराठी वाङ्मयाच्या वाचकांसाठी ही कादंबरी एक उत्तम निवड आहे.

■ ■ ■





## तरुण

काजू, बदाम सोडून आता
गुटखा प्रसिद्ध झाला.
अजय, अक्षय, शाहरूखसुद्धा
विमलचं खा म्हणाला ।।१।।

बंद झाल्या शिक्षण जाहिराती
बंद झाल्या शिक्षण जाहिराती
जुगार प्रसिद्ध झाला
हिंदी, मराठी कलाकारसुद्धा
Rummy च खेळा म्हणाला ।।२।।

जॉकीसुद्धा गायछाप खातो
जॉकीसुद्धा गायछाप खातो
तोही तेच म्हणाला,
जंगली रमी पे आओ ना महाराज
डायलॉग हाही फेमस झाला ।।३।।

गुटख्यामुळे झारीवालसुद्धा इतका श्रीमंत झाला
गुटख्यामुळे झारीवालसुद्धा इतका श्रीमंत झाला
पण या व्यसनांमुळे भारताचा तरुण मात्र वाया गेला....
तरुण मात्र वाया गेला....

**प्रियांका जगन्नाथ महापुरे**
बी.ए.-३(मराठी)

माहितीपर



# 'माइंडफुलनेस' : दैनंदिन जीवनाची गरज

रहिना रशीद सय्यद, बी.ए.-३ (मानसशास्त्र)

''माइंडफुलनेस'' हा नेहमी आनंदी राहण्याचा एक राजमार्ग आहे. आपण सगळे विचार करत असाल की हे काय आहे ? कसे असते ? 'माइंडफुलनेस' ही एक अशी पद्धत आहे, ज्याद्वारे आपण आपल्या आत, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना किंवा परिस्थितीबद्दल जागरूकता निर्माण करतो. एखाद्या विशिष्ट वेळी स्वतंत्रपणे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी माइंडफुलनेसमध्ये आपण आपले लक्ष त्या क्षणावर केंद्रित केले पाहिजे. आपण जिथे आहोत, त्याच स्थितीत तो क्षण अनुभवणे आणि जगणे आवश्यक आहे.

*'माइंडफुलनेस' ही एक अशी पद्धत आहे, ज्याद्वारे आपण आपल्या आत आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना किंवा परिस्थितीबद्दल जागरूकता निर्माण करतो. एखाद्या विशिष्ट वेळी स्वतंत्रपणे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी माइंडफुलनेसमध्ये आपण आपले लक्ष त्या क्षणावर केंद्रित केले पाहिजे.*

असे मानले जाते की, माइंडफुलनेस तंत्राच्या नियमित सरावाने आपण आनंदी राहू शकतो, वास्तविक याद्वारे आपण वर्तमान क्षणाशी जोडतो आणि परिस्थिती जशी आहे तशीच स्वीकारतो. आपण स्वतःची किंवा इतरांची परिस्थिती बदलू शकत नाही, पण आपली जी प्रतिक्रिया आहे, ती नक्कीच बदलू शकतो. एखाद्या परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टिकोणही बदलू शकतो. यामुळे आपण हळूहळू का होईना प्रत्येक परिस्थिती स्वीकारायला आणि त्यात आनंदी राहायला शिकतो. कारण आपण त्याची निवड केलेली असते.

''मी आनंदी आहे कारण मी आनंदी राहण्याची निवड केली आहे. मला आनंदी राहायचे आहे. म्हणून मी मला ज्या ज्या गोष्टींमधून आनंद मिळतो, त्या गोष्टी करण्याकडे भर दिला. आपण भूतकाळ किंवा भविष्यकाळाविषयी जास्त विचार करतो, तेव्हा हाती असलेल्या कामाकडे किंवा अनुभवाकडे आपले पुरेसे लक्ष नसते, मात्र खरे जगणे हे वर्तमान क्षण अनुभवण्यात असते आणि हेच असते माइंडफुलनेस जगणे.

आपण भूतकाळाविषयी किंवा भविष्यकाळाविषयी जास्त विचार करतो, तेव्हा आत्ता प्रत्यक्ष करत असलेल्या कामाकडे/ आत्ताच्या अनुभवाकडे आपले पुरेसे लक्ष नसते. मात्र खरे जगणे हे वर्तमानात जगणे हे असते. त्यासाठी पूर्ण जागरूकतेने आत्ताच्या क्षणाचा सखोल अनुभव घ्यायचा प्रयत्न करणे म्हणजे माइंडफुल राहणे. मेंदूला अशी वर्तमान क्षणात राहण्याची सवय प्रयत्नपूर्वक आणि हेतूपूर्वक लावता येते. माइंडफुल विचाराने आपण लक्ष जास्त चांगले एकाग्र करू शकतो. यामुळे सारासार विचारक्षमता वाढते. मन शांत राहिल्याने जास्त पर्याय सुचतात आणि लक्षातही जास्त राहते.

माइंडफुली अनुभव घेताना मागचे - पुढचे विचार मनात येतात. तरी त्या विचारांकडे चक्क दुर्लक्ष करायचे. त्या विचारांमागे धावायचे नाही. त्या विचारांना मनाचा ताबा घेऊ द्यायचा नाही. आपले लक्ष फक्त आणि फक्त आपण आत्ता करत असलेल्या कृतीवर लक्ष केंद्रित करायचे.

**माइंडफुलनेसचे फायदे :**

१. ताण-तणावापासून मुक्तता मिळते.

२. स्मरणशक्ती सुधारते

३. एकाग्रता वाढते

४. भावनिक स्थिरता येते

५. शांतता आणि आनंदाची भावना वाढीस लागते.

६. चंचलता आणि अस्थिरता कमी होते.

७. रागावर नियंत्रण येते

८. एकमेकांना समजून घेण्याची क्षमता वाढते.

९. निर्णय क्षमता वाढते.

१०. चांगली झोप येण्यास मदत होते.

**माइंडफुलनेसच्या पद्धती -**

**१. श्वासोच्छ्वासावर लक्ष केंद्रित करणे :**
**(किमान १० मिनिटे) -**



आपले लक्ष श्वासावर केंद्रित करा. श्वास आत, बाहेर सहज जाताना जाणवेल. श्वासातील चढ-उतार अनुभवा. आपले मन अतिशय चंचल असते आणि ते एका जागी सिथर राहत नाही. परंतु विचलित झाल्यानंतर पुन्हा आपले मन श्वासावर केंद्रित करा. तुमच्या श्वासाविषयी जागरूक राहा आणि जेव्हा जेव्हा तुमचे मन भटकते तेव्हा ते श्वासाकडे पर आणा. हे करत असताना दीर्घ श्वास न घेता सामान्य पद्धतीने श्वास घ्या.

**२. सक्रीयपणे ऐकणे :**
**(किमान १० मिनिटे) -**

या प्रक्रियेदरम्यान आपल्या सभोवतालच्या आवाजाकडे लक्ष द्या. रहदारीचा आवाज, चिमण्यांचा आवाज, आपल्या सभोवतालचा कोणाताही आवाज, पहा कोणत्या प्रकारचे आवाज येत आहेत, कोणत्या दिशेने येत आहेत. फक्त आवाजावर लक्ष केंद्रित करा.

जर मन वारंवार वेगवेगळ्या आवाजाकडे जात असेल तर अस्वस्थ होऊ नका आणि कोणत्याही एका आवाजावर स्वतःला थांबविण्याचा प्रयत्न करू नका. याचा फायदा असा आहे की, आपल्या सभोवतालच्या आवाजाकडे लक्ष देवून आपल्याला वर्तमानाची जाणीव होते आणि सतत सराव करून आपल्या मेंदूच्या लक्ष केंद्रिकरण करणाऱ्या भागाला प्रशिक्षण देत असतो. हे आपल्याला कोणतेही काम अधिक चांगल्या पद्धतीने करण्याची प्रवृत्ती प्रदान करते.

**३. जाणीवपूर्वक निरिक्षण करणे :**
**(किमान १० मिनिटे)**

याचा अर्थ आपण जे काही पाहत आहोत, ते जसे आहे तशाच स्वरूपात पाहणे. आपल्या आजूबाजूला पहा, आपण काय पाहत आहोत ? प्रत्येक गोष्टीचा क्रमाने विचार करा. वस्तूंचा आकार आणि रंगाकडे लक्ष द्या. सहसा जेव्हा आपण एखादी गोष्ट पाहतो तेव्हा आपण काही पूर्वकल्पना बनवतो आणि योग्य-अयोग्य गोष्टीचा चांगला/वाईट विचार न करता त्या गोष्टीच्या वास्तविक स्वरूपाकडे लक्ष द्यायला हवे.

**४. विचारांवर लक्ष केंद्रित करणे :**
**(किमान १० मिनिटे)**

आपलं मन खूप चंचल आहे ते नेहमी माकडांसारखे उड्या मारत असते. मनाला एका विचारावर स्थिर करणे कठीण आहे. परंतु आपल्याला ते करावे लागेल. आपल्या मनात येणाऱ्या विचारांवर लक्ष केंद्रित करा. आपले मन हे निरंतर विचार करणारे रेडिओ स्टेशन आहे. त्यामध्ये एक विचार संपण्यापूर्वी दुसऱ्या विचाराने जागा घेतलेली असते. (झोन गुरू थिक नाट हान : Silence : The power of quiet in a world full of noise)

आपल्या मनातील विचार थांबवू नका. त्याबद्दल मत बनवू नका. जरी ते सकारात्मक मत असले तरीही त्याविषयी कोणतेही मत बनवू नका. सततच्या सरावाने मनात येणारे विचार काही वेळात आपोआप स्थिर होतील, यासाठी काही कालावधी जावा लागेल. पण याच्या सरावाने आपण नकारात्मक विचारांना दूर ठेवू शकतो.

**५. शारीरिक स्ट्रेचिंगवर लक्ष केंद्रित करा :**
**(सुमारे २ मिनिटे)**

उभे राहा आणि आपले हात डोक्याच्या दिशेने सरळ वर घ्या. मग आपले लक्ष ताणलेल्या हातांवर केंद्रित करा आणि हाताच्या बोटांपासून ते खांद्याकडे लक्ष द्या. त्यानंतर जमिनीवर बसा आणि आपले पाय सरळ रेषेत समोर घ्या. हात-पाय ताणल्याने शरीरात चपळता येते, मनही स्थिर होते. तत्पर शरीर आणि स्थिर मन आपणास कोणतेही काम यशस्वीपणे करण्यास मदत करते आणि जीवनात आनंद आणते.

तुम्हाला मनावर ताबा मिळवून मनातील नकारात्मक, दुःखद, त्रासदायक विचारांची साखळी तोडता येईल, तो खरा समाधानकारक अनुभव मिळेल. अशा प्रकारे ''माइंडफुलनेस'' साध्य आहे. तुम्ही जर असे वागलात तर ''तुमचे जगणे सुंदर झाले....'' याचा अनुभव नक्कीच तुम्हाला येईल.

अनुभवकथन



# यंदा चषक एस.जी.एम. चाच !

आदित्य उमेश लट्ठे, बी.ए.-२ (मराठी)

''कलागुणांचे रंग लुटाया रंगभूमीशी बंध जोडण्या
युवा सज्ज हा झाला.''

''तरुणाईच्या उन्मेषाचा, युवा महोत्सव आला
युवा महोत्सव आला.....''

'युवा महोत्सव' म्हटलं की, आम्हां कलाकार विद्यार्थ्यांच्या आनंदाला ठाव-ठिकाणा लागत नाही. अहो मंडळी यात जल्लोष, आनंद, उत्साह, नवरस, कलाविष्कार यांचे मिश्रण आणि त्यात तरुणाईचा असणारा उत्सफूर्त सहभाग म्हणजे 'दुग्धशर्करायुक्त' योगच जणू !

माझे बी.ए. चे दुसऱ्या वर्षातील शिक्षण चालू झालं आणि लगेचच ऑगस्ट महिन्यातच नोटीस लागली ती 'युवा महोत्सव २०२४-२५ ची. या वर्षीचा ४४ वा सातारा जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन सप्टेंबर महिन्यात करण्यात आले होते. यातील सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव हा कोरेगाव शहरातील रयतचे 'डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव' येथे तर मध्यवर्ती युवा महोत्सव हा कोल्हापूर जिल्ह्यातील 'आजरा महाविद्यालय, आजरा' या ठिकाणी होणार होता.

यावर्षी आमच्या कलामंडळाला मागील वर्षीच्या उत्तुंग कामगिरीबद्दल स्तुतीसुमने मा.प्राचार्य डॉ. मोहन राजमाने साहेब व सर्व प्राध्यापक वृंदांनी दिली होती. त्याच उत्साहात याही वर्षी आपण उत्तुंग यश संपादन करावे, याकरिता 'कलामंडळ समितीची' स्थापना करण्यात आली होती व या कलामंडळ व सांस्कृतिक विभागाच्या चेअरमनपदी आमचे मार्गदर्शक व संस्कृत विषयाचे प्राध्यापक श्री.अनंत निकम सर, यांची नियुक्ती करण्यात आली होती.

मग काय ! झाली की तयारी चालू युवा महोत्सवाची. आम्ही सर्व जुन्या मंडळींनी वर्गा-वर्गात जाऊन युवा महोत्सवाबद्दल मुलांना माहिती देऊन सहभागी होण्याचे आवाहन करत होतो. यंदा आम्ही सर्वांनी ठरवलेले की, आपण यावर्षी मध्यवर्तीला जायचं आणि चषक जिंकून आणायचाच ! म्हणून आमच्यातील प्रत्येकजण लागला की जोमाने तयारीला......

*जिल्ह्याच्या युवा महोत्सवात विजयाचा डंका वाजवून आम्ही तयार झालो होतो ते आजऱ्याला अजरामर करायला, म्हणजेच मध्यवर्ती जिंकायला. मग काय, २८ सप्टेंबरला रात्रीच्या प्रवासाने गेलो आणि पुन्हा एकदा सज्ज झालो. त्याच जोमात, उत्साहात कारण सर्वांच्या मनात आणि मस्तकात एकच विचार तो म्हणजे : यंदा चषक एस.जी.एम. चाच !*

यावर्षी सुद्धा आम्हाला आमचे प्रिय असे सर्व 'कलास्पंदन क्रिएशन्स्, कराड' या ग्रुपचेच कलादिग्दर्शक लाभले होते. यात नाट्य विभागाची संपूर्ण जबाबदारी ही 'कलास्पंदन' कडेच होती. यामध्ये पथनाट्य - निलेश सर, लघुनाटिका - प्रतीक सर, मूकनाट्य - सागर सर तर एकांकिका - सुमित सर यांच्याकडे कार्यभार होता. माझा यावर्षीचा सहभाग पुन्हा एकदा लघुनाटिकेत होता व यावेळी पथनाट्यामध्येपण मला पात्र मिळाले. लघुनाटिका ही 'मराठी भाषेवर' आधारित होती. 'म.म. मराठीचा' आम्ही सर्व कलाकार कंबर कसून तयार झालो या स्पर्धेकरिता. आम्ही तब्बल महिनाभर सराव करून उतरलो अखेर या स्पर्धेत..... !

शेवटी तो दिवस उजाडला, दि.२५/०९/२०२५ रोजी 'सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव, २०२४-२५ चे आयोजन




डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगावला होते व म्हणून याकरीता आम्ही लवकर कराडमधून निघालो ! मसूर मार्गे कोरेगावचा रस्ता पकडला आणि वेळेवर सकाळी ठिक १०.०० ला पोहोचलो आणि आता आम्हाला वेध फक्त स्पर्धेचे आणि आपल्या उत्तम अशा सादरीकरणाचे.... ! आमचा नंबर होता ३४३ आणि तो पण शेवटच्या दुसऱ्या-तिसऱ्या नंबरला म्हणून आम्हाला पुरेसा वेळ मिळत होता. संगीत, नाट्य, नृत्य, वाङमय, शिल्प, छायाकृती या सर्वच विभागतल्या कलाकार विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर अशा प्रकारे सादरीकरण केले व परिक्षकांचे आणि प्रेक्षकांचे मन जिंकले.

आमचे सर्व सादरीकरण करून आम्ही रात्री परतीच्या प्रवासाला निघालो आणि १० वाजता रात्री सरांच्या फोनवर व्हॉट्सॲप ग्रुपला निकाल पाठविण्यात आला. पाहतो तर काय एक नाही, दोन नाही, तब्बल नऊ कलाप्रकारांत एस.जी.एम.ने बाजी मारली होती. महाविद्यालयाच्या आत्तापर्यंतच्या कारकिर्दीत इतिहासात पहिल्यांदाच एवढे यश मिळालं होते..... !

जिल्ह्याच्या युवा महोत्सवात विजयाचा डंका वाजवून आम्ही तयार झालो होतो, ते आजऱ्याला अजरामर करायला, म्हणजेच मध्यवर्ती जिंकायला, मग काय २८ सप्टेंबरला रात्रीच्या प्रवासाने गेलो आणि पुन्हा एकदा सज्ज झालो, त्याच जोमात, उत्साहात. कारण सर्वांच्या मनात आणि मस्तकात एकच विचार तो म्हणजे 'यंदा चषक एस.जी.एम.चाच !'

जिल्ह्याच्या युवा महोत्सवात जसा जोर लावला अगदी त्याच्याहून जास्त पटीने मध्यवर्तीला जोर लावत उत्तम प्रकारे सादरीकरण केले आणि तब्बल ११ कलाप्रकारांत घवघवीत असे यश संपादन केले. यामध्ये : पथनाट्य, मातीकाम - प्रथम; लघुनाटिका, रांगोळी, मेहंदी - द्वितीय, शास्त्रीय नृत्य, लोककला, मूकनाट्य - तृतीय, एकांकिका, नकला - उत्तेजनार्थ अशी व सर्वोत्कृष्ट अभिनेत्री - यशश्री माने अशी ११ पारितोषिके आणि नाट्यविभागाचा फिरता चषक हा 'एस.जी.एम. कॉलेज'ला मिळाला. 'यंदा चषक एस.जी.एम.चाच' हे वाक्य सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीने सत्यात उतरवून दाखविले.

या विजयाचा आनंद आम्हाला तसेच आमच्या कलादिग्दर्शक, प्राध्यापक, विभागप्रमुख, सहकारी या सर्वांनाच झाला होता.

आजऱ्याला अजरामर करण्याचे आणि 'यंदा चषक एस.जी.एम.चाच !' म्हणण्याचे स्वप्न हे साकार होताना पाहत होतो. विजयाचा आनंद सोबत घेत आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. रात्री महाविद्यालयांत उपप्राचार्य मा.श्री.एस.ए.पाटील सर यांनी कौतुक सुमने वाहत सर्वांचे स्वागत व अभिनंदन केले.

दुसऱ्या दिवशी सन्माननीय प्राचार्य डॉ.मोहन राजमाने साहेबांच्या हस्ते सत्कार व अभिनंदन करण्यात आले आणि 'कलामंडळाला' पुन्हा एकदा नव्याने मानाचे स्थान प्राप्त झाले. आम्हा सर्वांना मात्र एकच गोष्टीचा आनंद व अभिमान होता की आम्ही सिद्ध करून दाखवले की.....,

'कलाकार हे असेच असतात.....!'

■ ■ ■ ■

व्यक्तीवर्णन



# 'स्वराज्याचा छावा : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज'

श्रेया दिलीप जगताप, बी.एस्सी.-१

मृत्यूचे आव्हान पेलूनी,
तोच वारसा आम्हाला दिला ।
शिवरायांचा शंभू छावा,
हिंदू म्हणूनी अमर जाहला ।।

हवा वेगाने नव्हती, हवेपेक्षाही त्याचा वेग होता,
अन्यायाविरूद्ध लढण्याचा इरादा नेक होता,
असा शिवबाचा छावा लाखात नाही तर,
जगात एक होता......

आजकाल असे म्हणतात की, जिथे मस्तक टेकवावं अशा नमस्काराच्या जागा हल्ली खूप कमी होत चालल्या आहेत, पण ज्याचे नाव ऐकताच हे मस्तक नतमस्तक झाल्याशिवाय राहत नाही त्या माँ साहेब जिजाऊ ! ३३ कोटी देवांची कोट्यावधी मंदिरे असतील, पण यांची पण पूजा फार कमी लोक करतात. पण माझ्या राजाचे असे एकही मंदिर नाही, पण कोट्यावधी माणसे माझ्या राजाची पूजा करतात ते जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज ! संभा मर सकता हैं, लेकीन बेईमान नहीं हो सकता । ते छत्रपती संभाजी महाराज या सर्वांना माझा,

मानाचा मुजरा !
मानाचा मुजरा !
मानाचा मुजरा !

संभाजीराजांचा जन्म मे १४ इ.स. १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. शिवाजी महाराजांसारख्या युगपुरूषाचे पुत्र असल्यामुळे रणांगावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले. संभाजीराजांच्या आईचे, सईबाईंचे निधन राजे अगदी लहान असतानाच झाले. त्यानंतर पुण्याजवळील कापूरहोळ गावची धाराऊ नावाची स्त्री त्यांची दूध आई बनली. त्यांचा सांभाळ त्यांची आजी जिजाबाई यांनी केला. सुरूवातीच्या काळात त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीदेखील त्यांच्यावर खूप माया केली.

*राजाचे चारित्र्य इतके शुद्ध, निखळ आणि नितळ होते की, आज साडेतिनशे वर्षांनंतरही इतिहासात चारित्र्यवान म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव घ्यावे लागते. 'चारित्र्यसंपन्नता' या शब्दाला जेवढे महत्त्व दिले जाते, तसे त्याचे सत्यात उतरविण्याचे काम माझ्या छत्रपती संभाजी महाराजांनी केले.*

छत्रपती संभाजी महाराज यांना लहानपणासून अन्याय, अत्याचाराचा खूप राग येई. छत्रपती संभाजी महाराज यांनी भावनेपेक्षा सर्वप्रथम कर्तृत्वाला श्रेष्ठ मानले.

सिंहाची चाल, गरूडाची नजर,
स्त्रियांचा आदर, शत्रूचे मर्दन,
असे असावे मावळ्याचे वर्तन
हीच छत्रपती संभाजी महाराजांची शिकवण......

छत्रपती संभाजी महाराज जेवढे आपल्या आईला मानतात तसे ते समाजातील इतर स्त्रियांकडे 'आई' म्हणून पाहात. एकदा एका मुलाला मुलाखतीमध्ये प्रश्न विचारला गेला की, ''संपूर्ण जगात छत्रपती संभाजी महाराजांना प्रेरणास्थान मानले जाते, म्हणून आज २५ व्या शतकात छत्रपती संभाजी महाराजांची तुलना नेपोलियन व अलेक्झांडर यांच्यासोबत होते. तर यामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे वेगळेपण काय आहे ? उत्तर एका शब्दात सांगा'', तो मुलगा हुशार होता, तो मुलगा म्हणाला, ''होय



**छत्रपती संभाजी महाराजांची तुलना या सगळ्यांबरोबर होते, पण त्यांच्यामध्ये आणि संभाजी महाराजांचे वेगळेपण सांगायचे झाले तर ते म्हणजे, 'चारित्र्य' होय.''**

**होय**, माझ्या **राजाचे** चारित्र्य इतके **शुद्ध**, निखळ **आणि** नितळ होते की, आज साडेतिनशे वर्षानंतरही इतिहासात **'चारित्र्यवान' म्हणून**, छत्रपती **संभाजी महाराजांचे** नाव घ्यावे लागते. आजकालच्या नवीन पिढीला माहिती असणे गरजेचे आहे. 'चारित्र्यसंपन्नता' या शब्दाला जेवढे महत्त्व दिले जाते, तसे त्याचे सत्यात उतरवण्याचे काम माझ्या छत्रपती संभाजी महाराजांनी केले.

छत्रपती संभाजी महाराजांनी दिलेल्या काही दानपत्रावरून त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी माहिती मिळते. संभाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी 'बुधभूषण' हा ग्रंथ लिहिला. तीन भागांतील 'बुधभूषण' या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. तसेच राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लागार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर वगैरेंची माहिती दिली आहे. याशिवाय गागाभट्टांकडून नीतीपर 'समयनय' हा ग्रंथ संभाजी राजेंनी लिहून घेतला. 'धर्म कल्पलता' हा धर्म शास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजी राजांसाठी लिहिला. युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ॲबे कॅरे या परकीय लेखकाने संभाजी महाराजांची प्रशंसा केली आहे. भाषांवरील प्रभुत्व, धर्माभिमान यांचा अंदाज लावता येऊ शकतो.

छत्रपती संभाजी महाराज हे राज्यकारभारातही अत्यंत निपुण होते. ते कुशल संघटक होते. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांनीही अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती. यामध्ये पंतप्रधान म्हणून निळोपंत पिंगळे, चिटणीस म्हणून बाळाजी भावजी, सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते, न्यायाधीश म्हणून प्रल्हाद निराजी, पंत सुमंत म्हणून जनार्दन पंत, पंडितराव दानाध्यक्ष म्हणून मोरेश्वर पंडितराव, पंत सचिव म्हणून आबाजी सोनदेव, पंत अमात्य म्हणून दत्ताजी पंत, पंत अमात्य म्हणून आण्णाजी दत्तो यांची नियुक्ती करण्यात आली होती. ''श्री श्री. शंभो : शिवजातस्य मुद्राधौरिव राजते ।यदं कसेविनी लेखा वतर्ते कास्यनोपरी ।'' अशी छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांची मुद्रा होती.

श्री
श्री शंभो :
शिवजातस्य
मुद्राधौरिव राजते ।
यदं कसेविनी लेखा
वतर्ते कास्यनोपरी ।।

छत्रपती संभाजी महाराजांच्या मेहुण्यामुळे राजे औरंगजेबाच्या कैदेत सापडले. संभाजी राजे आणि कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादुरगड येथे नेले. संभाजीराजांनी धर्मांतर केल्यास जीवनदान देण्याची अट औरंगजेबाने घातली होती. मात्र संभाजीराजेंनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. औरंगजेबाचे अनन्वित अत्याचार असह्य होऊन सुमारे ४० दिवसांनी फाल्गुन अमावास्या म्हणजेच ११ मार्च, १६८९ रोजी संभाजी महाराजांची प्राणज्योत अखेर मावळली. असह्य यातना सहन करूनही संभाजी राजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही. म्हणून त्यांना भारतवर्षाने धर्मवीर ही पदवी बहाल केली.

म्हणूनच मला म्हणावेसे वाटते की,

''पाहूनी शौर्य तुझंपुढे
मृत्यूही नतमस्तक झाला
स्वराज्याच्या मातीसाठी
माझा शंभू अमर झाला.''

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय !!!

■ ■ ■ ■

आत्मकथन



# ‘हॉटेल मॅनेजमेंट कोर्स शिकताना’

यश सचिन लटिंगे, बी.व्होक.-२ (हॉटेल मॅनेजमेंट)

*शेवटी पुढे इंजिनिअर, डॉक्टर न होता आपण आपल्या आवडत्या विषयात शिकायचे हा निर्धार केला आणि वडिलांच्यासमोर ते बोलून दाखवले. ह्या विषयामध्ये माझी आवड होती, म्हणून मी ह्या क्षेत्रामध्ये यायचा निर्णय घेतला.*

दिवसभराच्या ठरलेल्या वेळेप्रमाणे आजचा अभ्यास झाला होता. निवांत बसलो होतो. नेहमीप्रमाणे आजच्या दिवसभरात काय काम केले ते लिहित होतो. लिहिता-लिहिता माझ्या भूतकाळातील म्हणजे चार वर्षांपाठीमागे गेलो आणि ते कोरोनाचे दिवस आठवले.

२०२० ला कोरोना लागला अन् आमची शाळा ही कोरोनामय झाली. शाळा बंद, शाळेचे तास ऑनलाईन होत होते. अन् आम्ही ऑनलाईन तासाला याच काळात, न कळत्या वयात मोबाईल हातात आला अन् इतरांच्यासारखे मोबाईलने आधिराज्य केले. तास नसला की, मोबाईल बघणे उद्योग सुरू झाला. कोरोनामुळे बाहेर पडता येत नव्हते अन् कुठे जाताही येत नव्हते. मोबाईल बघून बघून विविध गोष्टी घरच्या घरी प्रयोग म्हणून करू लागलो होतो.



माझा एक कुंभाराचा मित्र होता. त्यांच्याकडे गणपती काळात सहज गेलो होतो. तेव्हा त्यांच्या घरी तो मला ‘केक’ बनवताना दिसला. माझी उत्सुकता म्हणून त्याच्याकडून त्या केकसाठी लागणारी माहिती विचारून घेतली. नंतर मी माझ्या घरी येऊन मोबाईलवर केक बनवणारे अनेक व्हिडिओ पाहिले अन् ते पाहून प्रयोग म्हणून घरच्या घरी एक केक बनवला. घरच्यांनाही मी बनवलेला केक खूप आवडला. कोरोना काळात असल्याने रिकाम्या वेळेत केक बनवता येतील आणि चार पैसेही मिळतील या विचाराने मी मोबाईल वरूनच जाहिरात केली. हळूहळू माझेच मित्रपरिवारातील अनेकजणांकडून केकच्या ऑर्डर येऊ लागल्या. त्यातून पैसे मिळत होते. काही दिवसांनी माझी दहावीची परिक्षा झाली. जूनला निकाल लागला. चांगल्या मार्कांनी दहावी पास झालो होतो. पुढे पाचगणीत कॉलेजला प्रवेश घेऊन घरी बसूनच अभ्यास करत होतो. पुढे दोन वर्षात बारावी विज्ञान शाखेतून चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झालो अन् माझ्या समोर आता पुढे काय ? हा प्रश्न पडला.

जो-तो यायचा आपलं मत मांडायचा. आता महिना झाला तरी काय करायचे हे माझे मलाही ठरवता येत नव्हते. शेवटी पुढे इंजिनिअर, डॉक्टर न होता आपण आपल्या आवडत्या विषयात शिकायचे हा निर्धार केला आणि वडिलांच्यासमोर ते बोलून दाखवले. ह्या विषयामध्ये माझी आवड होती म्हणून मी ह्या क्षेत्रामध्ये यायचा निर्णय घेतला.

बारावी परिक्षेनंतर गावाजवळच्या ‘हौसाई’ नावाच्या हॉटेलवर सुट्टीमुळे काम करत होतो. यामुळेच मी बारावीनंतर ‘हॉटेल मॅनेजमेंट’ करण्याचा निर्णय घेतला. सुरूवातीला पुण्यात

हडपसरला 'हॉटेल मॅनेजमेंट' कोर्सला प्रवेश घेण्याचे ठरवले होते ; पण कोर्स फी, राहणे, जेवण, प्रवास खर्च याचा हिशोब केल्यावर माझ्या ध्यानात आले की, येथे आपला टिकाव लागणार नाही. त्यामुळे हा कोर्स कमी खर्चात कोठे शिकता येईल हा विचार करू लागलो. अन् शोधता शोधता मला कराडच्या एस.जी.एम. कॉलेजला हा कोर्स आहे हे समजले. येथे आपल्याला शिकता येईल असे वाटले. पुढे येथेच प्रवेशाची चौकशी करून प्रवेश पूर्तता केली अन् येथेच कॉलेजशेजारी कॉट बेसेस वर राहू लागलो. मला माझ्या आवडत्या विषयात शिकायला मिळणार हा आनंद झाला होता. उत्साहाने कॉलेज करत होतो. हळूहळू मित्र बनवू लागलो. कॉलेज करताना काही काम मिळेल का ? याचाही मी शोध घेत होतो, पण काही केल्या काम मिळत नव्हते अन् मिळाले तर ते अवेळी असायचे. हाच घोळ होत होता. कॉलेजमध्ये एके दिवशी सांगण्यात आले की, हॉटेल मॅनेजमेंट शिकणारी मुलं यांना शिकत-शिकत हॉटेलवर मॅनेजमेंट व प्रोफेशनल काम करता येईल व पैसेही मिळतील. यामुळे हळूहळू काम मिळत गेले.

आज सुद्धा त्या दिवसाकडे बघून माझं मला हसू येते की, आपण कसे काय या क्षेत्राकडे वळलो. आज 'रयतचे असलेले 'कमवा व शिका' वचन मी माझ्या जीवनात अंमलात आणले होते व त्या रस्त्याने जाताना आनंद मिळत होता.

■ ■ ■ ■



# आयुष्य

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही,
एकमेकास दिसत नाही.

हरवला तो आपसातला,
जिव्हाळ्याचा संवाद.
एकमेकास दोष देऊन,
नित्य चाले वादविवाद.

धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
हृदयाचे पाऊल कधी,
हृदयाकडे वळत नाही.

इतकं जगून झालं पण,
जगायलाच वेळ नाही.
जगतो आहोत कशासाठी,
काहीच कसला मेळ नाही.

क्षण एक येईल असा,
घेऊन जाईल हा श्वास.
अर्ध्यावरच थांबलेला,
असेल जीवन प्रवास.

अजूनही वेळ आहे,
थोडं तरी जगून घ्या.
सुंदर अशा जगण्याला,
डोळे भरून बघून घ्या.



**मानसी सुहास लाड**
बी.ए.-३

माहितीपर



# कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) : आधुनिक तंत्रज्ञानाची क्रांती

श्रीकांत कदम, बी.कॉम.-१ (आय.टी.)

कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) हा आधुनिक तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्याने आपले जीवन पूर्णपणे बदलून टाकले आहे. मानवी बुद्धिमत्तेच्या धर्तीवर संगणक आणि यंत्रे कार्य करण्यास सक्षम होण्यासाठी विकसित करण्यात आलेली ही तंत्रज्ञानाची शाखा आज अनेक क्षेत्रांत क्रांती घडवून आणत आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा इतिहास :**

कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना प्रथम १९५६ मध्ये डार्टमाउथ कॉन्फरन्समध्ये सादर करण्यात आली. त्या वेळी संगणकाच्या मर्यादित क्षमतेमुळे AI चा विकास मर्यादित होता. मात्र, नंतरच्या काळात संगणकीय शक्ती वाढल्यामुळे AI मध्ये झपाट्याने प्रगती झाली.

**AI चा उपयोग :**

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग आज अनेक क्षेत्रांमध्ये होत आहे**

**१. शिक्षण क्षेत्र :**

ऑनलाईन शिक्षण प्लॅटफॉर्म्सवर AI आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करून वैयक्तिक शिक्षणाचा अनुभव समृद्ध केला जातो.

**२. आरोग्य सेवा :**

वैद्यकीय निदानासाठी आणि उपचारांसाठी AI तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

**३. वाहनचालन :**

स्वयंचलित वाहनं म्हणजेच ड्रायव्हरलेस कार ही AI चा अत्युत्तम नमुना आहे.

**४. गृहउपयोग :**

स्मार्ट होम डिव्हायसेस जसे की Alexa आणि Google Home हे AI आधारित उपकरणं आहेत.

*कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक युगातील एक महत्त्वाची देणगी आहे. याचा योग्य वापर करून आपण समाजाचा आणि देशाचा सर्वांगीण विकास साधू शकतो. तंत्रज्ञानाने आपले जीवन सुलभ केले आहे, परंतु त्याच वेळी त्याचा संतुलित वापर करून मानवतेला अग्रक्रम देणे आपले कर्तव्य आहे.*

**५. व्यवसाय :**

ग्राहक सेवा, डेटाची विश्लेषणे आणि विपणन क्षेत्रांमध्ये AI ची मदत होते.



**फायदे :**

१. कार्यक्षमता वाढवते.

२. वेळेची बचत होते.

३. किचकट कामे सोपी होतात.

४. धोका असलेल्या ठिकाणी माणसांच्या जागी यंत्रांचा उपयोग करता येतो.

**तांत्रिक आव्हाने :**

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामध्ये अनेक फायदे असले तरी, काही आव्हानेही आहेत :

१. बेरोजगारी वाढण्याची शक्यता.

२. डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेचा प्रश्न.

३. नैतिकता आणि जबाबदारीशी संबंधित मुद्दे.

**भविष्य :**

कृत्रिम बुद्धिमत्ता भविष्यात अधिक विकसित होईल. शिक्षण, आरोग्य, शेती, ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांत तिचा उपयोग वाढेल. परंतु, या तंत्रज्ञानाचा योग्य प्रकारे उपयोग करणे ही काळाची गरज आहे.

**निष्कर्ष :**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक युगातील एक महत्त्वाची देणगी आहे. याचा योग्य वापर करून आपण समाजाचा आणि देशाचा सर्वांगीण विकास साधू शकतो. तंत्रज्ञानाने जीवन सुलभ केले आहे, परंतु त्याच वेळी त्याचा संतुलित वापर करून मानवतेला अग्रक्रम देणे आपले कर्तव्य आहे.

■ ■ ■ ■

## न विसरणारे ग्रंथालय

हो पाहिले मी तुला पहिल्यांदा, थोडे वेगळे वाटले
थोडे अनोळखी वाटले, प्रश्न होते असंख्य मनात

तुला पाहिल्यावर असे वाटले उत्तर आहेस तू,
थोड बोलावं वाटलं, पण विचार केला
कुठून सुरूवात करू बरं......

सर्व काही जाणणारा आहेस तू,
मग ठरवलं थोड बोलून बघावं,
तू कोण आहेस हे जाणून घ्यावं

असंख्य आहेत तुझे मित्र,
जे एक जगण्याची नवी दिशा दाखवतात
घेतो तू सगळ्यांना सांभाळून,
तुझ्यामुळे माणसांचे जीवन सोपे होते

मग विचार केला थोडा,
कसं सांभाळतो हे सर्व
सगळ्यांना सोबत घेऊन कसं चालतो बरं.....

मग तुझ्याबद्दल अजून जाणून घ्यावसं वाटलं
वाटले मित्र व्हावे, तुझ्यासोबत राहावे
बघूया तुझे जीवन कसे आहे, आहेस तरी कोण तू.....

जो माणसाच्या वाईट विचारांना
नष्ट करणारा एक ज्ञानी
तर एक भटकणाऱ्याला
मार्ग दाखविणारा एक मार्गदर्शक
तर एक सोबती जो सतत सोबत राहणारा.....

जेव्हा माणूस जगण्याची इच्छा सोडून देतो
तेव्हा जगण्याची एक उमेद दाखवणारा तू
सल्ला देणारा तू, भले सुखात नसेल
पण दुःखात आधार देणारा तू......

हो हो तूच तो, जो माझा सारथी
जो माझा सोबती,
जे मी कधीही न विसरणारे ग्रंथालय
हो हो तूच तो, हो हो तूच तो......



**तेजस्वी अरूण थोरवडे**
बी.ए.-३

व्यक्तीवर्णन



# डॉ. मनमोहन सिंग

श्रुती संदीप दराडे, बी.एस्सी.-३ (वनस्पतीशास्त्र)

*स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानल्या जाणाऱ्या १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताचे अर्थमंत्रीपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात डॉ. मनमोहन सिंग यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ डॉ. मनमोहन सिंग यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला आहे.*

भारताचे १४ वे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग हे एक विचारवंत व अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला व्यासंग व शैक्षणिक दृष्टिकोण जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचरणामुळे त्यांच्याकडे आदराने बघितले जाते. अशा महान व्यक्तीचा जन्म २६ सप्टेंबर, १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे शैक्षणिक कर्तृत्व पंजाब विद्यापीठापर्यंत विस्तारलेले आहे. १९५७ साली त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर १९६२ साली डॉ. मनमोहन सिंग यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी.फील. पदवी संपादन केली. त्यांचे 'इंडियाज एक्सपोर्ट ट्रेंड्स अॅण्ड प्रोस्पेक्टस फॉर सेल्फ सस्टेन्ड ग्रोथ' हे पुस्तक भारताच्या अंतस्थ व्यापारी धोरणाची समीक्षा करणारे आहे. पंजाब विद्यापीठ व प्रथितयश दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून काम करत असताना डॉ. मनमोहन सिंग यांची शैक्षणिक ओळख अधिक समृद्ध झाली. या काळात यु.एन.सी.टी.ए.डी. सचिवालयात त्यांनी काही काळ काम पाहिले होते. त्यातूनच त्यांची १९८७ आणि १९९० या काळात जिनिव्हा येथील साऊथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. डॉ.सिंग यांनी १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली व त्यांचा सरकारमध्ये प्रवेश झाला. त्यातून १९७२ साली त्यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. डॉ.सिंग यांनी अर्थमंत्रालयात भूषविलेल्या अनेक महत्त्वाच्या पदांमध्ये अर्थ मंत्रालयाचे सचिवपद, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद, पंतप्रधानांचे प्रमुख आर्थिक सल्लागार व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्षपद आदी पदांचा समावेश होता.

स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मैलाचा दगड मानल्या जाणाऱ्या १९९१-१९९६ या पाच वर्षांच्या काळात डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताचे अर्थमंत्रिपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष धोरण तयार करण्यात सिंग यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ डॉ.सिंग यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला आहे. त्यांच्या कारकिर्दीत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अनेक महत्त्वाच्या पुरस्कारांपैकी भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्विभूषण पुरस्कार (१९८७), भारतीय विज्ञान काँग्रेसमध्ये देण्यात येणारा जवाहरलाल नेहरू जन्मशताब्दी सन्मान (१९९५), अर्थमंत्र्यांसाठी दिला जाणारा आशिया मनी अॅवॉर्ड (१९९३ व १९९४) केंब्रिज विद्यापीठाचा अॅडम स्मिथ पुरस्कार (१९५६) केंब्रिजमधील सेंट जॉन महाविद्यालयाचा उल्लेखनीय कार्याबद्दल राईट पुरस्कार असे काही विशेष पुरस्कार



सिंग यांचा सिंहाचा वाटा आहे. डॉ.मनमोहन सिंग यांना वित्तमंत्रीपदाची, मंत्री पदाची जबाबदारी १९९१ मध्ये नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली सरकारने सोपवली. डॉ.मनमोहन सिंग यांचा अनुभव आणि आंतरराष्ट्रीय बँकिंग क्षेत्रातील उपयोग देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी करण्यात आला. ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर राहिले होते. तसेच त्यांनी आर्थिक धोरणावर आधीच मोठे काम केले होते. त्याचबरोबर त्यांनी २८ जुलै, १९९१ रोजी सादर केलेल्या बजेटमुळे अर्थव्यवस्थेत मोठे परिवर्तन घडून आले. त्यामुळे त्यांना अर्थव्यवस्थेला बळकटी आणणारा 'सिंह' असल्याचे म्हटले जाते. १९९१ च्या बजेटमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण बदल केले गेले. त्यात लायसन्स परमिट राज्याचा शेवट करण्यात आला. ज्यामुळे उद्योग व्यावसायिक गुंतवणूकीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी आयात-निर्यात धोरणांमध्ये बदल करण्यात आले. ज्यामुळे परकीय धोरणात सुधारणा झाली. परकीय गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी भारताने परकीय कंपनींना आकर्षित करण्याचे पाऊल उचलले. ज्यामुळे रोजगार निर्मितीला चालना मिळाली. याशिवाय सॉफ्टवेअर उद्योगाला विशेष सवलती देण्यात आल्या. ज्यामुळे भारत सॉफ्टवेअर निर्यातीमध्ये एक महत्त्वपूर्ण केंद्र बनला. या सुधारणांमुळे भारताची अर्थव्यवस्था जागतिक स्तरावर अधिक खुली आणि प्रतिस्पर्धी बनली. याचा मोठा फायदा भारताला झाला. या सुधारणा केवळ देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यास उपयुक्त ठरल्या नाहीत, तर त्यांनी भारताला तीन दशकात, जगातील प्रमुख अर्थव्यवस्थेमध्ये स्थान मिळवून दिले. या सुधारणांमुळे लाखो रोजगार निर्माण झाले. कोट्यावधी लोक दारिद्र्य रेषेवरून वर आले. १९९१ च्या या बदलांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या नव्या युगाचा प्रारंभ झाला.

आहेत. डॉ.सिंग यांनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि संघटनांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी १९९३ मध्ये सायप्रस येथे राष्ट्रकुल प्रमुखाच्या बैठकीत आणि व्हिएन्ना येथे मानवाधिकारावरील जागतिक परिषदेत भारतीय प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. डॉ.सिंग यांनी १९९१ पासून राज्यसभा या वरिष्ठ सभागृहात खासदारपद भूषविले आहे. १९९८-२००४ च्या दरम्यान त्यांनी राज्यसभेत विरोधी पक्ष नेत्यांची भूमिकाही पार पाडली आहे. २२ मे, २००४ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर डॉ.मनमोहन सिंग यांनी भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. २००८ मध्ये केंद्रातील काँग्रेस आघाडीच्या सरकारमध्ये डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान होते, तर ज्येष्ठ नेते शरद पवार कृषीमंत्री होते. त्यावेळी शेतकऱ्यांना सर्वप्रथम कर्जमाफी देण्यात आली. २२ मे २००९ रोजी त्यांनी दुसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

**भारताची अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी केलेले कार्य :**

१९९० च्या दशकाच्या सुरूवातीला भारताला एक गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. त्यावेळेला परदेशी गुंतवणूक कमी झाली होती. त्यामुळे उद्योगधंदे सुरू करणे कठीण होऊन बसले होते आणि देशाची अर्थव्यवस्था दिवाळीखोरीच्या उंबरठ्यावर होती. अशा स्थितीत भारताच्या आर्थिक धोरणांना एक मोठी परीक्षा द्यावी लागत होती. पण डॉ.मनमोहन सिंग यांच्या आर्थिक धोरणांनी हे सिद्ध केले की, योग्य दिशा आणि नेतृत्वासोबत कोणत्याही संकटाचा सामना केला जाऊ शकतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी डॉ.मनमोहन

अशा या देशाच्या महान सुपुत्राचे निधन वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने झाले. दिल्लीतील एम्स रूग्णालयात गुरूवार दि.२६ डिसेंबर, २०२४ रोजी रात्री ९.४१ वाजता उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अशा या महान सुपुत्राची प्राणज्योत मालवली. असा अर्थतज्ज्ञ परत होणे नाही. अशा या देशाच्या महान मानवाला कोटी कोटी प्रणाम !

■ ■ ■

वैचारिक

# भारतीय संविधानाचे महत्त्व



प्रथमेश गुरव, बी.सी.एस.-३

*भारतीय संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांच्या मुलभूत हक्क, अधिकार, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यांची दिशा ठरविणारा ऐतिहासिक ग्रंथ आहे. संविधानाने सर्व जाती, धर्म, पंथांना एकत्र गुंफले आहे. संविधानामुळेच देश चालतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जोपासना संविधानानेच केली आहे.*

''दलितांचे ते तलवार होऊन गेले,
अन्यायाविरूद्ध प्रहार होऊन गेले,
होते एक ते गरीबच;
पण या जगाचा कोहिनूर होऊन गेले,
जग खूप रडवीत होतं त्यांना;
पण ते या जगाला घडवून गेले.
अरे या मूर्खांना अजून कळत कसं नाही,
वर्गाच्या बाहेर बसूनसुद्धा त्यांनी
या 'भारताचे संविधान लिहून गेले !''

ज्या डॉ.बाबासाहेबांना या देशात शिकण्यासाठी पुस्तक दिली जात नव्हती, त्याच डॉ.बाबासाहेबांनी एक असे पुस्तक लिहिले की, त्याच पुस्तकावर आज हा भारत देश चालतो..... ते म्हणजे 'भारतीय संविधान'. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान म्हणून ओळखले जाते. संविधान म्हणजे देशाच्या राज्यकारभारासंबंधीच्या तरतुदींचा लिखित दस्तऐवज होय.

भारताच्या संविधान निर्मितीला इ.स. १९४६ पासून सुरूवात झाली. 'स्वतंत्र भारताचा राज्यकारभार ब्रिटिशांनी तयार केलेल्या कायद्यानुसार चालेल' असा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचा आग्रह होता. त्यानुसार भारताचे संविधान तयार करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. ती समिती म्हणजे 'संविधान सभा' होय. या सभेत एकूण २९९ सदस्य होते. 'डॉ.राजेंद्रप्रसाद' हे संविधान सभेचे अध्यक्ष होते. 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी अहोरात्र अभ्यास व चिंतन करून संविधानाचा मसुदा तयार केला. भारताच्या संविधान निर्मितीतील योगदानामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' असे संबोधले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेला संविधानाचा मसुदा संविधान सभेपुढे मांडण्यात आला. अनेक बैठकांनंतर अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान सभेद्वारे स्वीकारला गेला. म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. २६ जानेवारी, १९५० पासून संविधानातील तरतुदीनुसार देशाचा राज्यकारभार चालवण्यास सुरूवात झाली. या दिवसापासूनच भारताचे 'प्रजासत्ताक राज्य' अस्तित्वात आले. संविधान निर्मितीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाविषयी मला लिहावेसे वाटते की,

''घटना अशी लिहली की,
सूर्य, चंद्र असेपर्यंत मिटणार नाही,
ऋण बाबासाहेबांचे या जन्मांत फिटणार नाहीत !''

सुरूवातीला एकूण ३८९ सदस्यांपैकी फाळणीनंतर २९९ सदस्यांनी १०८२ दिवसांत म्हणजे २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवसांत जवळपास १२,००० पानांचे महान असे 'भारतीय संविधान' लिहिले. भारतीय संविधानात एकूण १ प्रस्ताविका, ८ अनुसूची, २५ भाग आणि ३९५ कलमे होती. सध्या भारतीय घटनेत १ प्रस्ताविका, १२ अनुसूची, २५ भाग आणि ४४८ कलमे

व ५ परिशिष्टे आहेत. संविधान म्हणजे प्रत्येक भारतीयांचा जणू धर्मग्रंथ !

भारतीय संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांच्या मुलभूत हक्क, अधिकार, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यांची दिशा ठरविणारा ऐतिहासिक ग्रंथ आहे. संविधानाने सर्व जाती, धर्म, पंथांना एकत्र गुंफले आहे. संविधानामुळेच देश चालतो. स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची जोपासना संविधानानेच केली आहे. संविधानामुळे मिळालेल्या अधिकारांची जाणीव प्रत्येक नागरिकाला व्हावी, याकरिता शालेय अभ्यासक्रमामध्येसुद्धा 'संविधानाचे महत्त्व' या विषयाचा समावेश केला जातो. देशात विविधता असतानाही प्रत्येकाला स्वाभिमानाचे हक्क संविधानानेच प्रदान केले आहेत. म्हणूनच मला लिहावेसे वाटते की,

''आदर्शवादी संविधान हे,
महान स्वतंत्र भारताचे,
जगी महान विस्ताराने,
लाभले प्रज्ञासूर्यांच्या ज्ञानाने !''

आपले संविधान हे लोकशाही तत्त्वावर चालणारे आहे. म्हणजे काय ? तर लोकशासन ''Democracy is the Goverment of the people by the people and for the people'' म्हणजेच लोकशाहीमध्ये शासन हे लोकांचे आहे आणि लोकांनी चालविलेले व लोकांसाठीचे शासन होय. आज संपूर्ण जगामध्ये भारतीय राज्यघटनेचा सन्मान केला जातो. का नाही करणार ? विविध जाती, धर्म, वंश, रूढी, परंपरांनी नटलेला आपला भारत देश डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधानामुळेच एकसंघ उभा आहे. मानवाची मूल्य जपणारे, त्यांना स्वातंत्र्य बहाल करणारे, त्यांची रक्षा करणारे, ''स्त्री असो किंवा पुरूष सर्वजण समान....' या समानतेचा अवलंब करणारे, एकमेकांशी बंधुभावाने वागायला शिकवणारे आणि प्रत्येक जातीचा, धर्माचा आणि वर्गाचा आदर करणारे संविधान खरोखरच श्रेष्ठ आहे, याची आपल्याला जाणीव होते. याच संविधानामुळेच आपला देश प्रगतीपथावर आहे, यात काडीमात्रही शंका नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, ''संविधान हे एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज असून ते राज्याची तिन्ही अंग म्हणजेच कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांची स्थिती व शक्ती स्पष्ट करते. त्यांच्या अधिकारांची सीमा निश्चित करून त्यावर नियंत्रण ठेवीत असते व व्यक्तीच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करीत असते.'' आपल्या संविधानाला बारकाईने जाणून घेतले ; तर ते एक उत्तम मार्गदर्शक आणि एक अद्भुत प्रवर्तक असल्याचे प्रत्ययाला येईल. म्हणून मला नमूद करावेसे वाटते की,

''संविधान को पढ़कर,
मानवता को जानो,
अधिकारों के साथ जुड़े,
कर्तव्यों को पहचानो''

'भारतीय संविधान' हा देशाचा सर्वश्रेष्ठ कायदा असून त्याबद्दल भारतीय जनतेच्या मनात पवित्र भावना असलेली दिसून येते. भारताच्या पुढे मागे स्वतंत्र झालेल्या दक्षिण आशियातील अन्य विविध देशांतील संविधानेही सतत गडगडत असताना 'भारतीय संविधान' हे आजपर्यंत टिकून आहे. काळानुसार बदलण्याची लवचिकता अंगी असल्याने आजपर्यंत भारतीय संविधानात ९९ घटना दुरूस्त्या होऊनही आज भारतीय संविधानाची मूळ चौकट ही अबाधितच राहिलेली दिसून येते. याचे श्रेय संविधानकारांच्या दूरदृष्टीला आणि त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक निर्माण केलेल्या संविधान निर्मितीच्या कार्याला द्यावे लागेल. कारण जगात कोठेही जे काही सर्वोत्तम असेल ते त्यांनी भारतीय संविधानात आणले. परंतु हे करीत असताना येथील स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्यायांशी निगडीत प्रश्नांचा व परिस्थितीचा मात्र मुळीच विसर पडू दिला नाही.

भारतीय संविधानकारांनी दूरदृष्टीचा विचार करून स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय या मूल्यांचा समावेश भारतीय राज्यघटनेचे प्रस्तावनेत केल्याचे दिसून येते. भारतीय राज्यघटनेचे सार ही भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना असून यामध्ये व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता आणि सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायाच्या प्राप्तीची हमी देण्यात आलेली दिसून येते. म्हणून संविधानातील मूल्याविषयी आवर्जून लिहावेसे वाटते की,

''मनस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य,
नागरिकांना दिले संविधानाने,
देशबांधणीचा हा पाया,
लाभला समितीच्या सहकार्याने !''

शासन व्यवस्थेचे स्वरूप संविधानात निश्चित करण्यात आले असल्यामुळे या संदर्भात डॉ. पायली म्हणतात की, 'इतक्या निवडक शब्दांत इतके सुंदर विचार व श्रेष्ठतम आदर्श हे अपवादानेच आढळेल. एवढेच नव्हे तर भारतीय राज्यघटनेचा सरनामा हा आपल्या घटनेच्या चौकटीत बसविण्यात आलेले एक मौल्यवान रत्न आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, ''ध्येयवादाचा मूर्तिमंत अविष्कार म्हणजे भारतीय संविधान होय.'' लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूलतत्त्वांच्या आधारावरच त्याची उभारणी झालेली आहे आणि रक्ताचा एकही थेंब न सांडता या देशात आमूलाग्र सामाजिक बदल घडवून आणणारी राज्यप्रणाली या संविधानातून आपण सुरू करीत असल्याचे बाबासाहेबांनी सांगितले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या पुढे असाही इशारा दिला होता की, ''जगातील इतर संविधानाने ही फक्त राजकीय, प्रशासकीय व आर्थिक चौकटी मुक्रर करतात. परंतु भारतीय संविधान हे मूलतः आज एक सामाजिक दस्तऐवज असून येथे येऊ घातलेल्या मन्वंतराची ती एक नांदी आहे. आपण राजकीय लोकशाहीचा प्रयोग सुरू केला आहे. पण आपले सामाजिक, आर्थिक जीवन मात्र विषमतापूर्ण आहे. अशा रितीने आपण अनेक अंतरविरोधाच्या धुमश्चक्रीत पदार्पण करीत आहोत आणि हे अंतरविरोधी आपण मिटवले नाही तर आपला राजकीय लोकशाहीचा डोलारा कोसळून पडेल आणि स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय यांसारखी मूल्ये ही ऱ्हास पावतील.'' या विधानावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील या मूल्याचे स्थान प्रतिपादित करून या मूल्यांभावी भारतीय लोकशाहीला निर्माण होणारा धोका स्पष्ट केला आहे.




''हक्काबरोबर जाणा स्वजबाबदारी,
करून कायद्याचे पालन,
स्थैर्य, शांतता राष्ट्रा लाभण्या,
करा विधायक आचरण.''

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानातील आदर्श मूल्यांचा मनापासून अंगिकार करूया आणि प्रगत लोकशाही राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देऊया ! शेवटी एवढेच लिहिन की,

''हमारा देश का संविधान है,
हमारी आण-बाण और शान है ।''

■ ■ ■ ■



# माझी जन्मठेप : पुस्तक परीक्षण

अनुराग राजेंद्र माने, बी.कॉम.-३ (बँक मॅनेजमेंट)

''माझी जन्मठेप'' हे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी लिहिलेले आत्मकथनात्मक पुस्तक आहे, ज्यात त्यांनी अंदमानच्या काळकोठडीतील आपले अनुभव मांडले आहेत. १९२७ साली प्रथम प्रकाशित झालेले हे पुस्तक भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारी विचारधारेचे अमूल्य दस्तऐवज मानले जाते. सावरकरांच्या शब्दातून व्यक्त झालेला त्यांचा साहस, संघर्ष, आणि स्वातंत्र्यासाठी दिलेली अपार त्यागाची कथा वाचकाला प्रेरित करते.

हे पुस्तक केवळ एक कैद्याची कहाणी नाही तर क्रांतिकारी विचारांचा एक अभूतपूर्व प्रवास आहे, जो भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास समजून घेण्यासाठी महत्त्वाचा आहे सावरकरांची लेखनशैली प्रभावी, संवेदनशील आणि विचार प्रवर्तक असून, ती वाचकाला खोलवर प्रभावित करते.

**लेखक आणि पुस्तकाची ओळख :**

''माझी जन्मठेप'' हे प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र्यसंग्राम सेनानी आणि विचारवंत विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित आत्मकथन आहे. या पुस्तकात सावरकर यांनी आपल्या जीवनातील विविध संघर्ष, प्रतिकूलतेवर, शौर्य आणि धैर्याची कहाणी अत्यंत प्रामाणिकपणे सांगितली आहे. सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी भगवती (माजी नाव : नाशिक) जिल्ह्यातील भगूर गावात झाला.

सावरकर हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते. १९०९ मध्ये त्यांनी ब्रिटिश साम्राज्यविरुद्ध बंडाचे षडयंत्र रचले होते, त्यामुळे त्यांना अंदमान येथील काळा पाणी (अंदमान) मध्ये बंदीवासाचा दंड सोसावा लागला. ''माझी जन्मठेप'' हे पुस्तक त्या वेळीच्या त्यांच्या कारागृहातील अनुभवांची एक अडचणींशी आणि मानसिक संघर्षाशी संबंधित

*''माझी जन्मठेप'' हे विनायक दामोदर सावरकर यांचे आत्मकथन आहे, जे त्यांच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संघर्षमय काळ दर्शवते. सावरकर हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते आणि त्यांना त्यांच्या विद्रोही वर्तनासाठी ब्रिटिश सत्तेने अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये जीवनभर कारावास ठोठावला होता. या पुस्तकात त्यांनी आपले कारागृहातील अनुभव, अत्याचार, आणि मानसिक संघर्ष याचे तितक्याच प्रगल्भतेने वर्णन केले आहे.*

कथा आहे. या पुस्तकात त्यांनी त्यांच्या संघर्षपूर्ण जीवनाची थोडक्यात पण प्रभावी रूपात मांडणी केली आहे.

सावरकर यांच्या लेखनशैलीत त्यांचा तिखटपणा, धैर्य, देशप्रेम आणि अत्यंत सुस्पष्टता दिसून येते. ''माझी जन्मठेप'' हे पुस्तक आजही भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या ऐतिहासिक संदर्भात एक महत्त्वाचे दस्तऐवज मानले जाते.

**पुस्तकाची रचना आणि विषयवस्तू :**

''माझी जन्मठेप'' या पुस्तकाची रचना आत्मकथनात्मक आहे. या पुस्तकात सावरकर यांनी आपल्या जीवनातील विविध टप्प्यांवरचा अनुभव, विचार आणि संघर्ष यांची सुसंगत मांडणी केली आहे. हे पुस्तक दोन प्रमुख भागांमध्ये विभागलेले आहे : पहिले, सावरकरांच्या शिक्षण जीवनाचे आणि त्यानंतरच्या क्रांतिकारी प्रयत्नांचे वर्णन आणि दुसरे, अंदमानच्या कडवट कारावासातील त्यांचे कष्ट आणि मानसिक संघर्ष.

सावरकर या पुस्तकात त्या काळातील भारताच्या स्थितीचा, स्वातंत्र्यसंग्रामातील संघर्षांचा, ब्रिटिश साम्राज्या-विरुद्धची गुप्त चळवळींची आणि अंदमानाच्या तुरुंगातील आपली मानसिक स्थितीचे चित्रण करतात. त्यांच्या अनुभवांद्वारे एक अत्यंत मर्मस्पर्शी आणि जिद्दपूर्ण जीवनाचे दर्शन घडते.

सावरकरांनी आपल्या संघर्षाचे नायकत्व स्वीकारले असून, त्या संघर्षाच्या पाठीमागे असलेल्या वेदना, दुःख, अपयश आणि यशाची समर्पणशीलता दाखवली आहे. यात त्यांनी देशप्रेम, क्रांतिकारकांच्या एकतेचे महत्त्व आणि आत्मनिर्भरतेचा संदेश दिला आहे. ''माझी जन्मठेप'' हे केवळ एक ऐतिहासिक दस्तऐवजच नाही, तर भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या प्रेरणादायी गोष्टींचे महत्त्वपूर्ण पुस्तक आहे.

**मुख्य विभाग :**

''माझी जन्मठेप'' या पुस्तकाचे मुख्य विभाग दोन प्रमुख टप्प्यांमध्ये विभाजित आहेत. पहिला विभाग सावरकरांच्या तरुण वयातील आणि शालेय जीवनातील आहे, ज्यात त्यांचे क्रांतिकारी विचार आणि ब्रिटिश साम्राज्याविरुद्धचा त्यांचा लढा दाखवला आहे. या भागात सावरकरांनी आपल्या लहानपणीच्या शालेय जीवनाची, स्वातंत्र्यसंग्रामाच्या पहिल्या लढ्यांतील सहभागाची आणि त्यातून मिळालेल्या प्रेरणेची मांडणी केली आहे. त्यावेळी त्यांनी 'रिव्हॉल्यूशनरी' चळवळीला महत्त्व दिले आणि इंग्रजी साम्राज्याविरुद्ध बंडाचा कट रचला.

दुसरा मुख्य विभाग म्हणजे अंदमानच्या कडवट कारागृहातील सावरकरांच्या कारावासाचे वर्णन. या भागात सावरकरांनी अंदमानच्या तुरुंगातील अपमानजनक परिस्थिती, शारीरिक कष्ट, मानसिक त्रास, आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे तडजोडीचे क्षण यांचे सजीव वर्णन केले आहे. त्याच वेळी, त्यांनी त्याच्या मानसिक स्थिरतेचा सामना कसा केला, ते कसे बळकट झाले आणि कसे त्यांनी अंधकाराच्या काळातही स्वतःला प्रेरित ठेवले, याची सुस्पष्टता दर्शवली आहे.

या पुस्तकातील मुख्य विभागांतून सावरकरांच्या मानसिक संघर्षाची, त्यागाची आणि समर्पणाची गोष्ट सांगितली आहे. यामुळे माझी जन्मठेप हे पुस्तक केवळ एक ऐतिहासिक दस्तऐवज नाही, तर एक प्रेरणादायी जीवनकथा आहे.

**पुस्तकाचा सारांश :**

''माझी जन्मठेप'' हे पुस्तक विनायक दामोदर सावरकर यांचे आत्मकथन आहे, ज्यामध्ये त्यांनी आपल्या जीवनातील संघर्ष, स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका आणि अंदमानी कारावासातील त्यांचे अनुभव मांडले आहेत. सावरकर यांचा जन्म १८८३ मध्ये झाला. लहानपणापासूनच त्यांनी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध संघर्षाचे ध्येय घेतले आणि स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. १९०९ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना अटक करून अंदमानच्या काळा पाणी तुरुंगात पाठवले.

या पुस्तकात, सावरकर यांनी त्यांच्या अंदमानच्या तुरुंगातील भयंकर जीवनाची सुस्पष्ट आणि प्रामाणिक कथा सांगितली आहे. तुरुंगातील कडक शारीरिक आणि मानसिक यातनांचा सामना करतांना, त्यांचे बळकट मनोबल, देशप्रेम आणि स्वातंत्र्यलढ्याबद्दलची असाधारण निष्ठा दर्शवली आहे. पुस्तकात त्यांनी स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचे क्षण, क्रांतिकारकांचे संघर्ष, त्यांचे विचार आणि तुरुंगातील दररोजच्या जीवनाचा तपशीलवार आणि भावनिक अनुभव दिला आहे.

सावरकर यांचे हे आत्मकथन एक प्रेरणा आहे, जे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज मानले जाते. त्यात भारताच्या स्वातंत्र्यासाठी केलेला त्याग आणि संघर्ष उचललेले प्रगल्भ विचार स्पष्ट होतात. ''माझी जन्मठेप'' हे पुस्तक त्याच्या शौर्याची, धैर्याची आणि देशप्रेमाची गाथा आहे.

**भाषाशैली, वर्णशैली आणि लेखनशैली :**

''माझी जन्मठेप'' हे विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनाची आणि संघर्षाची दहशतपूर्ण आणि प्रेरणादायक कथा सांगणारे आत्मकथन आहे. या पुस्तकात सावरकर यांनी आपल्या जीवनातील महत्त्वाच्या क्षणांचे वर्णन केले आहे.

- **भाषाशैली :**
  सावरकर यांच्या भाषाशैलीत साधेपण, गूढता आणि तीव्रतेचा समावेश आहे. त्यांनी शब्दांची निवडकता आणि अर्थपूर्णतेची जपणूक केली आहे. त्यांच्या लेखनात वैचारिकतेचा गंधही दिसतो.
- **वर्णनशैली :**
  पुस्तकातील वर्णन प्रगल्भ आहे. लेखकाने त्यांच्या जीवनातील प्रसंगांची स्पष्टता आणि उत्कंठा निर्माण केली आहे. यातील ऐतिहासिक प्रसंग, संघर्ष, आणि खचलेले मनोविज्ञान दिले आहे.

- **लेखनशैली :**
  सावरकर यांच्या लेखनशैलीत साहस, कडवटपणा आणि राष्ट्रभावनेचा आग्रह दिसतो. त्यांनी दिलेल्या अनुभवांचे वर्णन थेट, खरे आणि प्रभावी आहे. त्यांच्या लेखनातून एक राष्ट्रप्रेमाची गोडी वाचकांपर्यंत पोहोचते.

**पुस्तकातील ठळक मुद्दे :**

''माझी जन्मठेप'' या आत्मकथनात विनायक दामोदर सावरकर यांनी आपल्या संघर्षपूर्ण जीवनाची आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील सहभागाची कहाणी सांगितली आहे. पुस्तकातील काही ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत :

१. **जन्म आणि प्रारंभिक जीवन :**
सावरकर यांनी आपल्या बालपणातील संघर्ष, शिक्षण आणि राष्ट्रप्रेमाची भावना कशी निर्माण झाली हे स्पष्ट केले आहे.

२. **स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग :**
सावरकर यांनी ब्रिटिश साम्राज्याविरोधात लढा दिला आणि भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय सहभाग घेतला.

३. **अंदमान सजा :**
सावरकर यांना अंदमानच्या काळा पाणी कारागृहात भयंकर छळ सहन करावा लागला. या अनुभवाचे विवेचन त्यांनी केले आहे.

४. **कारागृहातील जीवन :**
त्यांच्या कारागृहातील कठोर शारीरिक आणि मानसिक यातनांचा तपशील त्यांनी दिला आहे.

५. **स्वतंत्रता संग्रामाचे तत्त्वज्ञान :**
सावरकर यांच्या पुस्तकात स्वातंत्र्य, राष्ट्रभावना आणि भारतीय संस्कृतीची गोडी आहे.

६. **पारिवारिक संबंध :**
सावरकर यांनी आपल्या कुटुंबाच्या सहकार्याचे महत्त्व सांगितले आणि त्यांच्या पाठिंब्याची कदर केली.

७. **वर्तमानकाळातील संघर्ष :**
ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध सुरू असलेल्या संघर्षाच्या दरम्यान, सावरकरांनी त्यांचे विचार आणि संघर्षशक्ती व्यक्त केली.

८. **धैर्य आणि आत्मविश्वास :**
पुस्तकात त्यांचे धैर्य, मानसिक सामर्थ्य आणि आत्मविश्वास कसा वाढवला, हे समजते.

९. **विनाश आणि नवा आरंभ :**
सावरकर यांनी प्रत्येक अपयशातून कसे शिकले आणि त्याच प्रेरणेने पुढे संघर्ष सुरू ठेवला.

१०. **भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्व :**
सावरकर यांनी स्वातंत्र्य संग्रामातील आपल्या योगदानाचा गौरव केला आहे.

संपूर्ण पुस्तकात सावरकर यांनी आपले अनुभव, संघर्ष आणि प्रेरणा प्रगल्भतेने व्यक्त केली आहे, ज्यामुळे ते आजही भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक प्रेरणास्त्रोत मानले जातात.

**लेखकाची विचारसरणी, प्रेरणा आणि संदेश :**

''माझी जन्मठेप'' या आत्मकथनात विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारसरणी, प्रेरणा आणि संदेश स्पष्टपणे व्यक्त झाले आहेत. सावरकर हे एक द्रष्टा, देशभक्त आणि साहसी नेते होते. त्यांच्या विचारसरणीचा मुख्य आधार स्वातंत्र्यप्रेम आणि भारतीय समाजाचा उठाव होता. त्यांचे विचार संघर्षशील होते आणि ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रत्येक प्रयत्न करण्यास तत्पर होते.

**सावरकर यांच्या विचारसरणीत मुख्यत्त्वे तीन गोष्टी लक्षात घेतल्या जातात :**

१. **स्वातंत्र्याचे महत्त्व :**
सावरकरांनी भारताच्या स्वातंत्र्याची प्राप्ती एक पवित्र कर्तव्य मानली. त्यांचा विश्वास होता की स्वातंत्र्य मिळविण्याचा एकमेव मार्ग प्रतिकार आणि बलिदान आहे.

२. **राष्ट्रीय एकतेची आवश्यकता :**
त्यांचे विचार राष्ट्रीय एकता आणि समाजाच्या सर्व घटकांमध्ये एकजुटीवर आधारित होते. सावरकरांनी भारतीय समाजातील भेदभाव दूर करण्याचे आणि एक समृद्ध राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न केले.

३. **आत्मविश्वास आणि संघर्ष :**
त्यांनी त्याच्या अनुभवांद्वारे दाखवले की, प्रत्येक संकटात आपला आत्मविश्वास कायम ठेवणे आणि संघर्ष करणे आवश्यक आहे. त्यांनी स्वतःच्या जीवनातील प्रत्येक क्षण कठोर संघर्षांमध्ये घालवला आणि इतरांना प्रेरित केले.

सावरकरांचा प्रेरणादायक संदेश हा आहे की, कधीही संकटांना थोपवून घ्यायला नको. स्वातंत्र्याचे आणि देशभक्तीचे आदर्श कायम ठेवून, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उच्च नैतिकतेचे

पालन करणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय, राष्ट्रसेवा आणि स्वातंत्र्यलढ्यात झोकले आणि तोच संदेश त्यांनी आपल्याला दिला.

**पुस्तकाचे ऐतिहासिक महत्त्व :**

''माझी जन्मठेप'' हे विनायक दामोदर सावरकर यांचे आत्मकथन आहे, जे त्यांच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि संघर्षमय काळ दर्शवते. सावरकर हे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते आणि त्यांना त्यांच्या विद्रोही वर्तनासाठी ब्रिटिश सत्तेनं अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये जीवनभर कारावास ठोठावला होता. या पुस्तकात त्यांनी आपले कारागृहातील अनुभव, अत्याचार, आणि मानसिक संघर्ष याचे तितक्याच प्रगल्भतेने वर्णन केले आहे.

सावरकर यांनी या पुस्तकात भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे ऐतिहासिक महत्त्व, त्यावेळेचे राजकीय परिप्रेक्ष्य, तसेच एक भारतीय नागरिक म्हणून त्यांचा संघर्ष सांगितला आहे. त्यांचा त्याग, धैर्य आणि स्वातंत्र्यप्रेम हे पुस्तकाच्या प्रत्येक पानावर व्यक्त होते. तसेच, हे आत्मकथन राष्ट्रीय अस्मिता, स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरतेसाठी असलेल्या भारतीयांच्या संघर्षाचे प्रतीक आहे. ''माझी जन्मठेप'' हे एक असे पुस्तक आहे, जे भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महत्त्वपूर्ण घटनांचे आणि त्या घटनांमधील मानवी मूल्यांचे प्रतीक बनले आहे.

**पुस्तकाची वैशिष्ट्ये आणि महत्त्व :**

''माझी जन्मठेप'' हे विनायक दामोदर सावरकर यांचे एक अत्यंत महत्त्वाचे आत्मकथन आहे, जे त्यांच्यासाठी आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामासाठी ऐतिहासिक दृष्टिकोणातून अनमोल ठरले आहे. हे पुस्तक सावरकर यांच्या जीवनातील कारागृहातील अनुभवांची साक्ष आहे. या पुस्तकात सावरकरांनी आपल्या जीवनातील संघर्ष, जेलमधील दुःखद प्रसंग आणि त्यावर कशी मात केली याचे थोडक्यात, पण प्रभावी वर्णन केले आहे.

**पुस्तकाची प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत :**

१. **आत्मकथन शैली :**
सावरकर हे एक उत्कृष्ट लेखक होते आणि त्यांच्या लेखनशैलीत भावना, अनुभव, आणि ऐतिहासिक संदर्भ प्रभावीपणे एकत्र आले आहेत.

२. **देशभक्तीचा संचार :**
या पुस्तकातून त्यांचं देशभक्तीचं प्रेम आणि स्वातंत्र्यप्रेम चांगल्या प्रकारे व्यक्त होतं.




३. **मानसिक संघर्ष :**
सावरकर यांनी जेलमधील मानसिक आणि शारीरिक यातना कशा प्रकारे सहन केल्या, याचे विवेचन आहे.

४. **जेलमधील शारीरिक कष्ट :**
त्यांच्या पुस्तकात सेल्युलर जेलमधील भयानक परिस्थिती, बंदिस्त जीवन आणि क्रूर शारीरिक व मानसिक यातनांचा उल्लेख आहे.

५. **स्वातंत्र्य लढ्याचे ऐतिहासिक महत्त्व :**
सावरकर यांच्या आत्मकथनात स्वातंत्र्य लढ्याची एक अत्यंत महत्त्वपूर्ण बाब स्पष्ट होते.

या पुस्तकाचे महत्त्व भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या ऐतिहासिक दृष्टिकोणातून आहे. सावरकर यांचे जीवन आणि त्यांचा त्याग भारतीय जनतेसाठी प्रेरणा बनला आहे. ''माझी जन्मठेप'' हे पुस्तक राष्ट्रीय अस्मितेची आणि संघर्षाची एक गाजलेली कहाणी आहे. यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा एक गहिरा आणि मानवी पैलू समोर येतो, जो वाचकांना त्याग, धैर्य आणि देशप्रेमाचे महत्त्व शिकवतो.

**पुस्तकाचा प्रभाव आणि समाजावरचा परिणाम :**

''माझी जन्मठेप'' हे विनायक दामोदर सावरकर यांचे

आत्मकथन आहे, जे वाचकावर गडद प्रभाव टाकते. या पुस्तकामुळे सावरकर यांचे जीवन आणि त्यांच्या संघर्षाची खरी ओळख वाचकांना मिळते. त्यांचे अनुभव, विशेषतः अंदमानच्या सेल्युलर जेलमधील शारीरिक आणि मानसिक यातना, वाचकांच्या मनावर खोल ठसा सोडतात.

सावरकर यांच्या पुस्तकात व्यक्त केलेली देशभक्ती, स्वातंत्र्यप्रेम आणि त्याग वाचकांना प्रेरित करतात. ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या कडवट्या संघर्षाची जाणीव करतात आणि एकात्मतेची भावना जागवतात. जेलमधील असहाय्य परिस्थितीतही सावरकरांनी मनोबल गमावले नाही, त्यांचा हा दृढ निश्चय वाचकांमध्ये आपले कर्तव्य, धैर्य आणि देशासाठीचे कष्ट यांचा आदर्श निर्माण करतो.

पुस्तक वाचताना, वाचकांच्या मनात अनेक प्रश्न उभे राहतात : कसे एका व्यक्तीने इतक्या कठीण परिस्थितीतही त्याच्या देशासाठी आत्मत्याग केला ? जेलमधील अत्याचार कशाप्रकारे त्यांना मानसिक दृष्टिकोणातून सशक्त बनवले ? या प्रश्नांची उत्तरे वाचकांना त्यांच्या आयुष्यात बदल घडवण्याची प्रेरणा देतात.

संपूर्ण पुस्तकाचा प्रभाव वाचकावर गडद असतो, कारण ते एकाच वेळी ऐतिहासिक दृष्टिकोण, संघर्ष, आणि मनोबल यांचे मिश्रण आहे. हे पुस्तक प्रत्येक भारतीयाला स्वातंत्र्य, देशभक्ती आणि आत्मनिर्भरतेच्या महत्त्वाची जाणीव करून देते. ''माझी जन्मठेप'' हे पुस्तक कधीही न विसरणारा अनुभव आहे, जो वाचकांच्या जीवनावर दीर्घकालिक परिणाम करतो.

**निष्कर्ष :**

''माझी जन्मठेप'' हा विनायक दामोदर सावरकर यांचा आत्मकथनात्मक ग्रंथ आहे. या पुस्तकात सावरकर यांनी आपल्या जीवनातील दुःखद प्रसंग, स्वातंत्र्य संग्रामातील योगदान आणि ब्रिटीश साम्राज्याच्या कारागृहांतील अनुभव व्यक्त केले आहेत. त्यांनी ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधातील आपल्या लढ्याची दखल घेत, राष्ट्रवाद आणि स्वातंत्र्य प्राप्तीच्या महत्त्वावर भाष्य केले आहे. या पुस्तकात सावरकरांच्या मानसिक आणि शारीरिक यातना, त्यांचे विचार आणि त्यातील दृढता स्पष्टपणे व्यक्त केली आहे. सावरकरांच्या जीवनातील संघर्ष, त्यांची प्रेरणा आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील त्यांची भूमिका या पुस्तकाच्या केंद्रस्थानी आहेत. हे पुस्तक वाचकाला इतिहासाची खरी ओळख आणि त्याच्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव करून देते. सावरकरांच्या अडचणी आणि त्यांच्या विचारांचा गाढा प्रभाव आजही समाजावर आहे. ''माझी जन्मठेप'' हे पुस्तक भारतीय इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण दस्ताऐवज आहे.

**अंतिम विचार :**

''माझी जन्मठेप'' हे पुस्तक विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनातील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा साक्षात्कार आहे. या पुस्तकात सावरकरांनी आपले कारावासातील अनुभव, स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग आणि त्यातील लढाईचे दर्दनाक पण प्रेरणादायी कृत्य समोर आणले आहेत. यामुळे त्यांचे धैर्य, संघर्ष आणि स्वातंत्र्यप्रेम याचे दर्शन घडते. सावरकरांची लेखणी केवळ एक ऐतिहासिक दस्तऐवज नसून ती आपल्या स्वातंत्र्यवीरतेची प्रेरणा आहे. या पुस्तकातील प्रत्येक ओळ ऐतिहासिक संदर्भांचा शोध घेत आहे आणि प्रत्येक भारतीयाला आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या बलिदानाची कदर करण्यास प्रवृत्त करत आहे. सावरकरांच्या लेखनात जी प्रगल्भता आहे, ती त्यांचे जीवन आणि संघर्ष यांना अधिक गोडीने आणि महत्त्वाने पेश करते. ''माझी जन्मठेप'' एक ऐतिहासिक गाथा असून ती एका सच्च्या स्वातंत्र्य सेनानीच्या मानसिकतेचे प्रतिक आहे.

■ ■ ■ ■

वैचारिक



# आयुष्य आणि मोबाईल : एक संघर्ष

## (एक कथा आजच्या विद्यार्थ्याची)

दिपीका रामदास बाचल, बी.कॉम.-३

आजच्या डिजिटल युगात मोबाईल हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र याचा अतिरेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर वाईट परिणाम करत आहे. मोबाईलच्या सवयीमुळे आपली स्वप्न आणि आवडीनिवडी गमावली जातात.

आजच्या पिढीतील विद्यार्थी म्हणजे डोळ्यात स्वप्न असलेले, नव्या संधी शोधणारे, पण मोबाईलच्या आहारी गेलेले तरुण त्यांच्या हसण्यात आणि रडण्यातही मोबाईल हा एक मुख्य कारण बनतोय.

मी माझ्या मैत्रिणीला अनेकदा सांगते की, ''मोबाईलचा वापर कमी कर, पण ती हसून उत्तर देते, मी मोबाईल वापरत नाही, मोबाईल मला वापरतो.'' हे ऐकून मला आश्चर्य वाटले. तिने समजावले, ''मी नेहमी ठरवते की, मोबाईल कमी वापरायचा, पण ते होत नाही. कारण मोबाईल ही माझी सवय बनली आहे आणि ती मला कंट्रोल करते.''



मी तिला विचारलं, ''मग तू काय करणार ?'' ती म्हणाली, ''अगं मोबाईल जसा चांगला आहे, तसाच वाईटही होतो. त्याचा वापर कसा करायचा, याचे भान ठेवायला हवं. पण एक गोष्ट आहे - हे सगळं समजूनही वळत नाही.''

तेव्हा मी तिला माझा अनुभव सांगितला. काही वर्षापूर्वी मलाही मोबाईलची अतिसवय लागली होती. मी दिवसाढवळ्या इन्स्टाग्राम स्क्रोल करत राहायचे. माझा दिवस उगवायचा तो मोबाईलसोबत आणि मावळायचाही त्याच्याबरोबर. हळूहळू मला त्याचा परिणाम जाणवायला लागला. डोळ्यावर ताण, मनावर थकवा, अभ्यास आणि आवडीच्या गोष्टींसाठी वेळच उरत नव्हता.

*आजच्या विद्यार्थ्यांनाही हेच सांगायचे आहे - मोबाईल जितका उपयोगी आहे. तितकाच धोकादायकही आहे. तो फक्त गरजेसाठी वापरा. रिकाम्या वेळेत वाचन, खेळ, नृत्य किंवा कलेत रमवा. स्वतःच आयुष्य सजवा. कारण आयुष्यातील क्षण परत येत नाहीत.*

एक दिवस इंटरनेट बंद झाले. मी शांतपणे बसले तेव्हा जाणवले की, माझी स्वप्ने कुठेतरी हरवली आहेत. वाचनाची आणि अभ्यासाची आवड मी मागे टाकली होती. तेव्हा मी ठरवले, ''मोबाईलच्या नादातून बाहेर पडायचे.''

मी स्वतःवर मेहनत घेतली, मोबाईलवर घालवणारा वेळ कमी केला आणि त्या वेळेत वाचन, लेखन, नृत्य आणि नवीन गोष्टी शिकणे सुरू केले. हळूहळू माझ्या आयुष्याला एक नवीन दिशा मिळाली.

आजच्या विद्यार्थ्यांनाही हेच सांगायचे आहे - मोबाईल जितका उपयोगी आहे, तितकाच धोकादायकही आहे. तो फक्त गरजेसाठी वापरा. रिकाम्या वेळेत वाचन, खेळ, नृत्य किंवा कलेत रमवा. स्वतःचं आयुष्य सजवा, कारण आयुष्यातील क्षण परत येत नाहीत.

शेवटी हेच सांगायचे आहे :

''आयुष्य असं जगा की, निरोप घेताना
लोकांच्या डोळ्यांत कौतुकाचं पाणी असावं.''

■ ■ ■

लालित



# आयुष्य जगावं तरी कसं.....

दिपश्री संजय जाधव, बी.कॉम.-२ (आय.टी.)

कुठेतरी आणि केव्हातरी सतत मनामध्ये भासत असते की, नको आता आयुष्य, मला फार कंटाळा आलाय या आयुष्याचा, असे आपण आपल्याच मनामध्ये बोलत असतो. पण आपण कधी विचार केलाय का ओ..... आपल्याला आपलेच आयुष्य नकोसे का वाटायला लागते बरं ! याला मात्र दोनचं कारणे कारणीभूत ठरतात. पहिले म्हणजे तर, आपल्या मनाला हवीहवीशी जी गोष्ट आहे ती जर नाही मिळाली तर तसे वाटते आणि दुसरे कारण म्हणजे जेव्हा आपल्या मनामध्ये एखादे दडपण रूचलेले असते अर्थात आपले मन हे उदास असते, तेव्हा या दोन कारणांमुळेच आपण आपले आयुष्य नाकारत असतो.

पण विचार करा ना, आपल्याला हे मौल्यवान आयुष्य मिळालयं तरी कशासाठी ? मला कंटाळा आलाय आयुष्याचा असं म्हणण्यासाठी, का कोणती ना कोणती कारणे शोधून सतत त्यावर रडण्यासाठी. विचारा प्रश्न स्वतःला ?



प्रत्येक गोष्टीला काही ना काही तरी मार्ग हा असतोच. आयुष्याच्या वाटेवर किती जरी संकटे आली तरी, त्याला घाबरून कधीच खचून जायचे नसते तर त्याला सामोरे जावून कसे धुडकवता

*प्रत्येक गोष्टीला काही ना काही तरी मार्ग हा असतोच. आयुष्याच्या वाटेवर किती जरी संकटे आली तरी, त्याला घाबरून कधीच खचून जायचे नसते, तर त्याला सामोरे जाऊन कसे धुडकवता येईल हे पारखायचे असते. प्रत्येक गोष्टींमध्ये आपण जर चुकाच शोधत बसलो तर आयुष्याची वाटसुद्धा वाट लागण्यातच बसेल.*



येईल हे पारखायचे असते. प्रत्येक गोष्टीमध्ये आपण जर चुकाच शोधत बसलो तर आयुष्याची वाटसुद्धा वाट लागण्यातच बसेल. त्यामुळे प्रत्येक गोष्टीला थोडा वेळ द्या, संयम ठेवा. तेव्हाच कुठेतरी आपल्या या अनमोल जीवनाला लखलखीत प्रकाशाची किरणे लाभतील आणि हे तेव्हाच घडेल जेव्हा तुम्ही तुमच्या आयुष्यात 'स्वावलंबी' राहण्याचा प्रयत्न कराल.

फक्त एकदाच आपल्या मनाला म्हणून बघा माझे आयुष्य खूप अनमोल व सुंदर आहे. 'तेव्हाच तुमचे हे अनमोल आयुष्य अनमोल जीवनाला अनमोल अनुभव देऊन शिकवेल ते ही न घाबरता !'

■ ■ ■ ■

